प्रास्ताविक डॉ.एच.के. आवताडे यांनी केले. डॉ. ओम प्रकाश राय यांनी गुप्त अहवालाची प्रत प्र. प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांच्याकडे सुपूर्त केली. प्राचार्या डॉ. रेखा भारद्वाज, समन्वयक डॉ. हरिश चंद्र पोखरियाल, डॉ. ओम प्रकाश राय यांनी विचार व्यक्त केले. डॉ. राय यांनी महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीचा थोडक्यात आढावा घेतला. शेवटी प्रा. प्रसाद लोहार यांनी आभार मानले. संस्थाध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील, महाविद्यालयाच्या विकास समितीचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील व शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली जय्यत तयारी केली होती.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413 1 1 * Library

नवराष्ट्र | पुणे, २३ सप्टेंबर २०२१




# विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करावा

■ डॉ. दीपक तुपे यांचे आवाहन : शंकरराव मोहिते महाविद्यालयात हिंदी दिवस साजरा ■

अकलूज, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. हिंदी विषयाच्या विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञाना सुयोग्य वापर करून नोकरीच्या संधी प्राप्त करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. भाषेच्या विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाकडे रोजगाराच्या नजरेने पहावे, असे विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त) येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ. दीपक तुपे यांनी केले.

येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि २०२१ चा हिंदी दिवस कार्यक्रम (ऑनलाइन) साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे 'तंत्रज्ञान आणि हिंदी विषयाचे विद्यार्थी' या विषयावर [1] बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य दत्तात्रय बागडे होते. डॉ. तुपे म्हणाले, आज तंत्रज्ञानामुळे अनेक क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे.

आज तंत्रज्ञान काळात ही जे रोजगार अबाधित आहेत ते म्हणजे भाषाधारित रोजगार. म्हणजेच मस्तिष्क आधारित रोजगार हे नव्या युगाची संधी आहे हे ही भाषेच्या विद्यार्थ्यांनी आवर्जून लक्षात घेणे गरजेचे आहे.

## तेरा जिल्ह्यातील शिक्षक, विद्यार्थी सहभागी

प्रास्ताविक प्रा निवृत्ती लोखंडे यांनी केले. सुत्रसंचालन प्रदर्शन विभाग प्रमुख डॉ. अपर्णा कुचेकर यांनी केले. ऑनलाइन समारंभासाठी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख व धर्मशाला (हिमाचल प्रदेश), केरळ, गुरूदासपूर (पंजाब), मोगा (पंजाब), दिल्ली, पंजाब नॅशनल बँकेचे अधिकारी यांच्यासह महाराष्ट्रातील तेरा जिल्ह्यातील एकूण ११५ प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सलीम शेख, डॉ. अण्णासाहेब नल्वडे, प्रा. शिवाजी राजगुरु, नितीन सुरवसे आणि महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे योगदान लाभले.

सुराज्य सोलापूर

गुरुवार, दि. ३० सप्टेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Akluj Library



# मोहिते महाविद्यालयास नॅक कमिटीची भेट

✓ सुराज्य/अकलूज : अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयास बेंगलोर येथील राष्ट्रीय मूल्यांकन समितीच्या (नॅक) कमिटीने भेट दिली. महाविद्यालयास भेट दिलेल्या कमिटीचे प्रमुख डॉ.ओम प्रकाश राय,प्र-कुलगुरू,सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ साउथ बिहार,समन्वयक डॉ.हरिश चंद्र पोखरियाल,संचालक, स्कूल ऑफ ओपन लर्निंग,दिल्ली विद्यापीठ आणि सदस्या डॉ.रेखा कालिया भारद्वाज,प्राचार्या लयालपुर खालसा कॉलेज कपूरथाला,जालंधर (पंजाब) यांचा समावेश होता. समितीच्या भेटीस सुरुवात झाली.या भेटीदरम्यान त्यांनी महाविद्यालयातील विविध विभाग,ग्रंथालय,कार्यालय,राष्ट्रीय सेवा योजना(एन. एस. एस.) राष्ट्रीय छात्र सेना(एन.सी.सी) स्पोर्ट्स/ जिमखाना व सांस्कृतिक विभागांची पाहणी केली.सायंकाळी सांस्कृतिक विभागातील मुला मुलींनी भारदार कार्यक्रम सादर केला. त्यात लोकगीत, लावणी, कोव्हिड या विषयावरील पथनाट्य व ३७० व्या कलमावर आधारित नाटिका सादर केली.तसेच महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या विद्यार्थी केंद्रित सेवा,सुविधा व योजना यांची पाहणी करुन माहिती येतली.यात बोटानिकल गार्डन,रेप्रोग्राफी सेंटर, नेटवर्क रिसोर्स सेंटर,महर्षी स्पर्धा परीक्षा केंद्र,मुक्त विद्यापीठ केंद्र व कर्मवीर मैदान इ. गोष्टींचा समावेश होता. यावेळी संस्थेच्या संचालिका स्वरुपाराणी मोहिते पाटील,सचिव अभिजीत रणवरे,सदस्य राजाभाऊ लव्हाळे,उत्कर्ष शेटे व नारायण फुले आदी उपस्थित होते. या भेटी दरम्यान विद्यापीठाच्या कुलगुरू मृणालिनी फडणवीस, डॉ. राहुल बावगे तसेच महाविद्यालयाचे पंचवीस वर्ष प्राचार्य पद सांभाळलेले डॉ. आबासाहेब देशमुख उपस्थित होते. प्रा. प्रसाद लोहार यांनी आभार मानले. या समारोप समारंभास माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख उपस्थित होते.

# जनमत
## सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे - मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

e-mail - dainikjanmat@gmail.com

दैनिक **सोलापूर** शुक्रवार ०१ ऑक्टोबर २०२१ वर्ष १२ अंक ८९ पृष्ठे ८ किंमत ४ रुपये


Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj * Library

# अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयास नॅक कमिटीची भेट

संग्रामनगर दि २९ (प्रतिनिधी) येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयास दिनांक २७ व २८ सप्टेंबर रोजी बेंगलोर येथील राष्ट्रीय मूल्यांकन समितीच्या (नॅक) कमिटीने भेट दिली. महाविद्यालयास भेट दिलेल्या कमिटीचे प्रमुख डॉ.ओम प्रकाश राय,प्र–कुलगुरू,सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ साउथ बिहार,समन्वयक डॉ.हरिश चंद्र पोखरियाल,संचालक, स्कूल ऑफ ओपन लर्निंग,दिल्ली विद्यापीठ आणि सदस्या डॉ.रेखा कालिया भारद्वाज,प्राचार्या लयालपुर खालसा कॉलेज कपूरथाला,जालंधर (पंजाब) यांचा समावेश होता.

समितीच्या भेटीस सुरुवात झाली.या भेटीदरम्यान त्यांनी महाविद्यालयातील विविध विभाग,ग्रंथालय,कार्यालय,राष्ट्रीय सेवा योजना(एन. एस. एस.)राष्ट्रीय छात्र सेना(एन.सी.सी) स्पोर्ट्स/जिमखाना व सांस्कृतिक विभागांची पाहणी केली. सायंकाळी सांस्कृतिक विभागातील मुला मुलींनी भारदार कार्यक्रम सादर केला. त्यात लोकगीत, लावणी, कोव्हिड या विषयावरील पथनाट्य व ३७० व्या कलमावर आधारित नाटिका सादर केली.तसेच महाविद्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या विद्यार्थी केंद्रित सेवा,सुविधा व योजना यांची पाहणी करुन माहिती घेतली.यात बोटानिकल गार्डन,रेप्रोग्राफी सेंटर, नेटवर्क रिसोर्स सेंटर,महर्षी स्पर्धा परीक्षा केंद्र,मुक्त विद्यापीठ केंद्र व कर्मवीर मैदान इ. गोष्टींचा समावेश होता.या राष्ट्रीय मूल्यांकन समितीने महाविद्यालयाच्या आजी विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांशी स्वतंत्रपणे भेटी घेऊन, त्यांची महाविद्यालयाबद्दलची मते जाणून घेतली.महाविद्यालयात टीम आल्यानंतर एन.सी.सी. च्यावतीने शिस्तबद्ध संचलन करून, त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्राचार्यांच्या कार्यालयात प्र. प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी संस्था व महाविद्यालयाने केलेल्या दैदिप्यमान कामगिरीचा आढावा आपल्या सादरीकरणातून समितीसमोर मांडला.महाविद्यालयाच्या खठउ चे समन्वयक डॉ. हनुमंत आवताडे व त्यांचे सहकारी डॉ. आप्पासाहेब बाबर,प्रा.प्रसाद लोहार व प्रा.रविराज सोनवणे यांनी समितीसमोर स्वयं मूल्यांकन अहवाल सादर करून, महाविद्यालयासंदर्भातील सविस्तर माहिती सादर केली.दुपारी एक वाजता शिक्षण प्रसारक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांबरोबर भोजन व चर्चा यांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेच्या संचालिका कु. स्वरुपाराणी मोहिते पाटील,सचिव अभिजीत रणवरे,सदस्य राजाभाऊ लव्हाळे,उत्कर्ष शेटे व नारायण फुले आदी उपस्थित होते.



या भेटी दरम्यान पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू मा. सौ. मृणालिनी फडणवीस, सोलापूर विभागाचे विभागीय शिक्षण संचालक डॉ. राहुल बावगे तसेच महाविद्यालयाचे पंचवीस वर्ष प्राचार्य पद सांभाळलेले डॉ. आबासाहेब देशमुख आवर्जून उपस्थित होते.

नॅक मूल्यांकन समितीच्या भेटीच्या दुसऱ्या व शेवटच्या दिवशी समितीने महाविद्यालयाच्या संदर्भातील सविस्तर अहवालाचे लेखन केले. सायंकाळी एक्झिट मिटींगचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एच. के. आवताडे यांनी केले. यावेळी मूल्यांकन समितीचे प्रमुख डॉ. ओम प्रकाश राय यांनी आपल्या गुप्त अहवालाची प्रत प्र. प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांच्याकडे सुपूर्त केली. त्यानंतर समितीच्या सदस्या प्राचार्या डॉ. रेखा भारद्वाज, समन्वयक डॉ. हरिश चंद्र पोखरियाल व प्रमुख डॉ. ओम प्रकाश राय यांनी मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले. आपल्या मनोगतातून डॉ. राय यांनी महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीचा थोडक्यात आढावा घेतला व काही मार्गदर्शनपर सूचना केल्या. शेवटी प्रा. प्रसाद लोहार यांनी आभार मानले.या समारोप समारंभास माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख, विविध विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.

महाविद्यालयास बेंगलोर येथील राष्ट्रीय मूल्यांकन समिती भेट देणार असल्यामुळे महाविद्यालयाने गेल्या वर्षभरापासून शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील,महाविद्यालयाच्या विकास समितीचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील व शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली जय्यत तयारी केली होती.

जनसत्य

गुरुवार, दि. ३० सप्टेंबर २०२१

Library

# शंकरराव मोहिते महाविद्यालयास नॅक कमिटीची भेट

जनसत्य प्रतिनिधी



**अकलूज :** येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयास दिनांक २७ व २८ सप्टेंबर रोजी बेंगलोर येथील राष्ट्रीय मूल्यांकन समितीच्या (नॅक) कमिटीने भेट दिली.महाविद्यालयास भेट दिलेल्या कमिटीचे प्रमुख डॉ. ओम प्रकाश राय,प्र-कुलगुरू,सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ साउथ बिहार, सम न्वयक डॉ.हरिश चंद्र पोखरियाल, संचालक, स्कूल ऑफ ओपन लर्निंग, दिल्ली विद्यापीठ आणि सदस्या डॉ.रेखा कालिया भारद्वाज, प्राचार्या लयालपुर खालसा कॉलेज कपूरथाला,जालंधर (पंजाब) यांचा समावेश होता.

त्यांनी महाविद्यालयातील विविध विभाग, ग्रंथालय, कार्यालय, राष्ट्रीय सेवा योजना(एन. एस. एस.), राष्ट्रीय छात्र सेना(एन.सी.सी) स्पोर्ट्स/जिमखाना व सांस्कृतिक विभागांची पाहणी केली. सायंकाळी सांस्कृतिक विभागातील मुला मुलींनी बहारदार कार्यक्रम सादर केला. त्यात लोकगीत, लावणी, कोव्हिड या विषयावरील पथनाट्य व ३७० व्या कलमावर आधारित नाटिका सादर केली.प्रास्ताविक डॉ. एच. के. आवताडे यांनी केले. यावेळी मूल्यांकन समितीचे प्रमुख डॉ. ओम प्रकाश राय यांनी आपल्या गुप्त अहवालाची प्रत प्र. प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांच्याकडे सुपूर्त केली. त्यानंतर समितीच्या सदस्या प्राचार्या डॉ. रेखा भारद्वाज, सम न्वयक डॉ. हरिश चंद्र पोखरियाल व प्रमुख डॉ. ओम प्रकाश राय यांनी मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले. आपल्या मनोगतातून डॉ. राय यांनी महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीचा थोडक्यात आढावा घेतला व काही मार्गदर्शनपर सूचना केल्या. शेवटी प्रा. प्रसाद लोहार यांनी आभार मानले.या समारोप समारंभास माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख, विविध विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.

महाविद्यालयास बेंगलोर येथील राष्ट्रीय मूल्यांकन समिती भेट देणार असल्यामुळे महाविद्यालयाने गेल्या वर्षभरापासून शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील,महाविद्यालयाच्या विकास समितीचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील व शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली जय्यत तयारी केली होती.

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्य प्रसिद्धी सप्ताह संपन्न

Library Akluj 413




अकलूज (कटूसत्य वृत्त):- अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. 24 सप्टेंबर 2021 ते 2 आक्टोबर 2021 या कालावधीमध्ये कार्य प्रसिद्धी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्य प्रसिद्धी सप्ताहाचे उदघाटन स्वच्छता अभियानातून करण्यात आले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी पहिल्या दिवशी महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली व राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा केला. त्यानंतर या कार्य प्रसिद्ध सप्ताहामध्ये वृक्षारोपण, प्लास्टिक निर्मूलन, काटेरी झुडपांचे निर्मूलन, साफसफाई, रांगोळी स्पर्धा, इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तर 2 ऑक्टोबर 2021 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणजेच महात्मा गांधी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.गांधी जयंती कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून सांस्कृतिक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ आवड हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बागडे डी. एस.हे उपस्थित होते.प्रमुख वयांनी महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने आपल्या व्याख्यानातून महात्मा गांधी,समज-गैरसमज व सद्यकालीन उपयुक्तता या विषयावर महात्मा गांधीजींचे देश स्वातंत्र्यातील योगदान,त्यांच्या बाबतीत असणारे वैचारिक मतभेद आणि देश प्रेमाविषयी गांधीजींची असणारी भावना त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केली.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.दत्तात्रय बागडे यांनी अध्यक्षीय भाषणातून सांगितले की गांधीजींच्या विचारांचे पालन करीत विद्यार्थ्यांनी आपले जीवन जगले पाहिजे.आपल्या गरजा मर्यादित ठेवल्या पाहिजेत.तरच खऱ्या अर्थाने ही त्यांना भावपूर्ण आदरांजली होऊ शकेल.

या कार्यक्रमासाठी मराठी विभागाचे डॉ. जनार्दन परकाळे,प्रा दादासाहेब कोकाटे डॉ. सविता सातपुते, महर्षी अकॅडमीचे संचालक प्रा.अजित चंदनकर, प्रा. रोहित देशमुख प्रा.पंकज पवार, अमोल खरात राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग व महर्षी अकॅडमीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. चंकेश्वर लोंढे यांनी केले तर आभार प्रा दादासाहेब कोकाटे यांनी मानले.

पुण्य नगरी
SMART
शुक्रवार,१ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413 101 *
Library

## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सारस लव्हाळे तृतीय

अकलूज / प्रतिनिधी



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापीठ संलग्नित शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित शंकरराव मोहिते महाविदयालय आयोजित राष्ट्रीय व राज्यस्तरीय ऑनलाईन खुल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये रत्नाई कृष्णा महाविद्यालयचा विद्यार्थी सारस रविराज लव्हाळे यांस तृतीय पुरस्कार मिळाला. संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे यांनी त्याचे अभिनंदन केले.

२ पुढारी MY सोलापूर सोलापूर, शनिवार, २ ऑक्टोबर २०२१

संक्षिप्त

Shri Vijaysinh Mohite Patil Mahavidyalaya Library Akluj 413 101

# अकलूजच्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर

**अकलूज : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूरविद्यापीठ सोलापूर व अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यस्तरीय सहकारमहर्षी करंडक वक्तृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर झाला. शालेय गट व खुल्या गटात या स्पर्धा झाल्या.

शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा गतवर्षी कोरोनाच्या प्रादुर्भावमुळे ऑनलाईन घेण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे- शालेय गट प्रथम क्रमांक:- शांभवी मालकर(कोल्हापूर), रोहिणी नगरकर (पंढरपूर), भारत पिसे (फलटण), द्वितीय क्रमांक:- आर्या शिंदे (जिजामाता कन्या प्रशाला अकलूज), विपिन बोरावके (माढा), साई सतीश भोसले(अकलूज), तृतीय क्रमांक:- अर्पित सुरेश कांबळे (कोल्हापूर), तन्मय नाईक (मोहोळ), यशस्विनी नंदकुमार देशमुख, उत्तेजनार्थ:- ईश्वरी गायकवाड (सांगोला), तर खुल्या गटात प्रथम क्रमांक:-प्रज्ञा मालकर (कोल्हापूर), मालती व्यवहारे (उस्मानाबाद), शंकर पटवारी (सांगली), द्वितीय क्रमांक:- आशुतोष निकम, मानसी गावडे, बाळासाहेब शिकारे (माळशिरस), तृतीय क्रमांक:-वैष्णवी हागोणे, सारस लव्हाळे (अकलूज), ज्ञानदा धारूरकर, उत्तेजनार्थ अश्विनी मगर. या स्पर्धेच्या परिक्षणाचे काम डॉ. अपर्णा कुचेकर, डॉ. जनार्दन परकाळे, डॉ. विशाल साळुंखे यांनी पाहिले. स्पर्धकांचे जयसिंह मोहिते-पाटील, सभापती संग्रामसिंह मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, हर्षवर्धन खराडे पाटील यांनी अभिनंदन केले.

# जनमत
## सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

शनिवार ०२ ऑक्टोबर २०२१


# अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर

संग्रामनगर, दि.०१ (प्रतिनिधी)– पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर संलग्नित व शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सहकार महर्षी करंडक शालेय गट व खुल्या गटात राष्ट्रीय ऑनलाईन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.त्याचा निकाल नुकताच जाहिर झाला आहे.दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चालु आसते.पण गतवर्षी कोरोनाच्या प्रादुर्भावमळे ही स्पर्धा ऑनलाईन घेण्यात आली होती.

या स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे शालेय गट प्रथम क्रमांक:– शांभवी मालकर (कोल्हापूर), रोहिणी नगरकर (पंढरपूर),भारत पिसे(फलटण),व्दितीय क्रमांक:–आर्या शिंदे (जिजामाता कन्या प्रशाला अकलूज), विपिन बोरावके (माढा),साई सतीश भोसले (अकलूज), तृतीय क्रमांक:–अर्पित सुरेश कांबळ (कोल्हापूर)तन्मय नाईक (मोहोळ), यशस्विनी नंदकुमार देशमुख, उत्तेजनार्थ:–ईश्वरी गायकवाड (सांगोला)तर खुल्या गटात प्रथम क्रमांक:– प्रज्ञा मालकर (कोल्हापूर), मालती व्यवहारे (उस्मानाबाद), शंकर पटवारी(सांगली), व्दितीय क्रमांक:– आशुतोष निकम,मानसी गावडे, बाळासाहेब शिकारे (माळशिरस), तृतीय क्रमांक:– वैष्णवी हागोणे, सागर लव्हाळे (अकलूज), ज्ञानदा धारूरकर, उत्तेजनार्थ आश्विनी मगर (माळशिरस) यांनी बक्षीस पटकावली आहेत या स्पर्धेच्या परिक्षणाचे काम डॉ.अपर्णा कुचेकर, डॉ.जनार्दन परकाळे, डॉ.विशाल साळंखे यांनी पाहिले.

यश संपादन केलेल्या स्पर्धकांचे अभिनंदन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयसिंह मोहिते,स्थानिक व्यवस्थापन समितीचे सभापती संग्रामसिंह मोहिते पाटील,सचिव अभिजीत रणवरे,सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील,प्र.प्राचार्य दत्तात्रय बागडे यांनी केले तर हि स्पर्धा पार पाडण्यासाठी प्रा.विश्वनाथ आवाड,प्रा. निवृती लोखंडे,रोहित देशमुख, औदुंबर भिसे, रविन्द्र नागटिळक, वैभव आंबेकर, मनोज वर्दम,अमोल खरात,महेश वाघमारे,समाधान काळे,सागर वाघमारे यांनी घेतले.



8 ऑक्टोबर 21-22 (सुराज्य)

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413101 * Library

सुराज्य



# अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील

✓ सुराज्य / अकलूज

> आदरणीय जयसिंह मोहिते-पाटील यांनी शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था परिवार म्हणून सांभाळली, त्याच प्रमाणे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या लौकीकास शोभेल असे काम करणार आहे. संस्था या पुढेही प्रगती पथावर नेण्याचा आपला मानस आहे.
>
> – संग्रामसिंह मोहिते पाटील
> (नूतन अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ)

महाराष्ट्रातील नामवंत शिक्षण संस्थांपैकी एक समजल्या जाणाऱ्या अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ मुख्य कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची कार्यकारणी सभा पार पडली. यावेळी विषय क्रमांक दोन नुसार संचालक बाळासाहेब सणस यांनी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची अध्यक्षपदी निवड करण्याचे सुचविले. याला संचालक सुभाष दळवी, राजाभाऊ लव्हाळे, सौ. निशा गिरमे, उत्कर्ष शेटे यांनी अनुमोदन दिले. यावेळी सर्व सदस्यांनी या मताला अनुमोदन दिले. त्यानंतर अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे नाव जाहीर केले. जवळपास 55 शाखा असणाऱ्या शिक्षण प्रसारक मंडळाचा संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकीक आहे. विविध सांस्कृतिक कला क्रीडा कार्यक्रम राबविणे यामध्ये या संस्थेचा हातखंडा समजला जातो. संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रम या संस्थेने आज पर्यंत ऐतिहासिकरित्या राबवले आहेत. आता अध्यक्षपदाची धुरा संग्रामसिंह मोहिते-पाटील हे सांभाळणार असून त्यांची अध्यक्षपदी निवड होताच फटाक्यांची आतषबाजी करत या निवडीचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी संचालीका कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील, पांडुरंग एकतपुरे, नारायण फुले, वसंत जाधव, रामदास गायकवाड, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील उपस्थित होते.

सदरच्या निवडीनंतर संग्रामसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी दिपकराव खराडे पाटील, प्रदिपराव खराडे-पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

Daily Tarun Bharat (Solapur)

Date 8 ऑक्टोबर

Shankarrao Mohite Mahavidyalaya Akluj 413101 Library

# शि.प्र. मंडळ अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील

**तभा वृत्तसेवा,**

**अकलूज, दि. ८ ऑक्टोबर-**



अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्राम सिंह मोहिते-पाटील यांची निवड करण्यात आली.

कार्यकारी संचालक मंडळाची सभा संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेत संचालक बाळासाहेब सणस यांनी अध्यक्षपदासाठी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे नाव सूचवले. संचालक सुभाष दळवी, राजाभाऊ लव्हाळे, निशा गिरमे, उत्कर्ष शेटे यांनी अनूमोदन दिले. सर्वच संचालकांनी पाठिंबा दर्शविला. त्यानंतर जयसिंह मोहिते-पाटील यांनी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची निवड जाहीर केली. शंकरराव मोहिते-पाटील यांनी १९४८ साली शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापन केली होती. भाजपनेते विजयसिंह मोहिते-पाटील व जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणार असल्याचे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले. निवडीनंतर संग्रामसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांचा सत्कार झाला. दिपकराव खराडे पाटील, प्रदिपराव खराडे पाटील, पांडूरंग एकतपूरे, नारायण फले, वसंत जाधव, रामदास गायकवाड, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील उपस्थित होते.

सकाळ | सोलापूर सोलापूर, शनिवार, ९ ऑक्टोबर २०२१

TODAY

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj 413 101



अकलूज : शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करताना जयसिंह मोहिते-पाटील स्वरूपाराणी मोहिते-पाटील, अभिजित रणवरे, हर्षवर्धन खराडे.

# शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह

अकलूज ता.८ : अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली.

अकलुज शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यकारी संचालक मंडळाची सभा संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत संचालक बाळासाहेब सणस यांनी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षपदाबाबत प्रस्ताव मांडला त्यास संचालक सुभाष दळवी, उत्कर्ष शेटे, निशा गिरमे यांनी सर्व सदस्यांच्या अनुमोदन दिले. त्यानुसार जयसिंह मोहिते-पाटील यांनी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची अध्यक्ष पदासाठी निवड होत असल्याचे जाहीर केले. यावेळी संचालिका स्वरुपराणी मोहिते पाटील, संचालक राजाभाऊ लव्हाळे, नारायण फुले, पांडुरंग एकतपुरे, रामदास गायकवाड, वसंत जाधव सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे आदी मान्यवर उपस्थित होते. या निवडीनंतर संग्रामसिंह मोहिते-पाटील,जयसिंह मोहिते - पाटील, कु.स्वरुपराणी मोहिते-पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

> माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या लौकिक आणखी वाढविण्याचा तसेच संस्था प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न करू व माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवू.
>
> – संग्रामसिंह मोहिते- पाटील,
> नूतन अध्यक्ष, अकलूज शिक्षण प्रसारक मंडळ

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj 413 101

लोकमत हॅलो सोलापूर
शनिवार ०९.१०.२०२१
epaper.lokmat.com

# शिक्षण मंडळ अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

अकलूज : अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची एकमुखाने निवड करण्यात आली.



शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यकारिणीची सभा संस्थाध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ही निवड करण्यात आली. निवडीनंतर मावळते अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी फेटा, शाल, हार, श्रीफळ देऊन सत्कार केला.

याप्रसंगी संचालिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील, निशा गिरमे, राजाभाऊ लव्हाळे, पांडुरंग एकतपुरे, नारायण फुले, बाळासाहेब सणस, सुभाष दळवी, उत्कर्ष शेटे, रामभाऊ गायकवाड, वसंत जाधव, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, दीपक खराडे-पाटील, प्रदीप खराडे-पाटील आदी उपस्थित होते. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी १९९२ साली संस्थेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी दिली. ती जबाबदारी २९ वर्षे यशस्वीपणे पार पाडून संस्थेला प्रगतिपथावर नेण्याचे काम केले असल्याचे जयसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.

आपण सर्वांनी संस्थेच्या अध्यक्षपदाची माझ्यावर जबाबदारी दिली असून मार्गदर्शक संचालक विजयसिंह मोहिते-पाटील व जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार आपण यशस्वीपणे जबाबदारी पार पडणार आहे. त्यांच्याप्रमाणेच आदर्शवत काम करुन पदाचा सन्मान ठेवण्याचा आपला सदैव प्रयत्न राहील अशी ग्वाही नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

पुण्य नगरी
SMAR
शनिवार,९ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj 413 101



शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांचा सत्कार करताना जयसिंह मोहिते पाटील, स्वरुपाराणी मोहिते पाटील, अभिजीत रणवरे, हर्षवर्धन खराडे आदी.

# शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांची निवड

अकलूज / प्रतिनिधी

शैक्षणिक उपक्रमासह विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या विविध कलागुणांना वाव देणारी राज्यातील नामवंत शैक्षणिक संस्था म्हणून ओळख असणाऱ्या अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांची निवड करण्यात आली.

शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यालयात कार्यकारी संचालक मंडळाची सभा संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत नवनिर्वाचीत अध्यक्ष पदासाठी संग्रामसिंह मोहिते पाटील यांचे नाव संचालक बाळासाहेब सणस यांनी सूचवले. त्यास संचालक सुभाष दळवी, राजाभाऊ लव्हाळे, निशा गिरमे, उत्कर्ष शेटे यांनी अनुमोदन दिले. त्यास उपस्थित सर्वच संचालकांनी पाठींबा दर्शविला. त्यानुसार जयसिंह मोहिते पाटील यांनी संग्रामसिंह मोहिते पाटील यांचे अध्यक्षपदासाठी निवड जाहीर केली.

यावेळी संचालीका स्वरुपाराणी मोहिते पाटील, पांडूरंग एकतपुरे, नारायण फुले, वसंत जाधव, रामदास गायकवाड, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील उपस्थित होते. सदरच्या निवडी नंतर संग्रामसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते पाटील, स्वरुपाराणी मोहिते पाटील यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर पत्रकारांशी बोलताना नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील म्हणाले, जयसिंह मोहिते पाटील यांनी सदरची संस्था परिवार म्हणून सांभाळली, त्याचप्रमाणे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या लौकीकास शोभेल असे काम आम्ही करु. संस्था या पुढेही प्रगती पथावर नेण्याचा आपला मानस असल्याचेही ते म्हणाले. यावेळी दिपकराव खराडे पाटील, प्रदिपराव खराडे पाटील यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर

शनिवार, दि. ९ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Aktuj 413 101



# अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील

✓ सुराज्य/अकलूज

आदरणीय जयसिंह मोहिते-पाटील यांनी शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था परिवार म्हणून सांभाळली, त्याच प्रमाणे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या लौकीकास शोभेल असे काम करणार आहे. संस्था या पुढेही प्रगती पथावर नेण्याचा आपला मानस आहे.

– संग्रामसिंह मोहिते पाटील
(नूतन अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ)

महाराष्ट्रातील नामवंत शिक्षण संस्थांपैकी एक समजल्या जाणाऱ्या अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ मुख्य कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची कार्यकारणी सभा पार पडली. यावेळी विषय क्रमांक दोन नुसार संचालक बाळासाहेब सणस यांनी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची अध्यक्षपदी निवड करण्याचे सुचविले. याला संचालक सुभाष दळवी, राजाभाऊ लव्हाळे, सौ. निशा गिरमे, उत्कर्ष शेटे यांनी अनुमोदन दिले. याप्रसंगी सर्व सदस्यांनी या मताला अनुमोदन दिले. त्यानंतर अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे नाव जाहीर केले. जवळपास ५५ शाखा असणाऱ्या शिक्षण प्रसारक मंडळाचा संपूर्ण महाराष्ट्रात गाजावाजा आहे. विविध सांस्कृतिक कला क्रीडा कार्यक्रम राबविणे यामध्ये या संस्थेचा हातखंडा समजला जातो. संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रम या संस्थेने आज पर्यंत ऐतिहासिकरित्या राबवले आहेत. आता अध्यक्षपदाची धुरा संग्रामसिंह मोहिते-पाटील हे सांभाळणार असून त्यांची अध्यक्षपदी निवड होताच फटाक्यांची आतषबाजी करत या निवडीचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी संचालीका कु. स्वरुपाराणी मोहिते-पाटील, पांडुरंग एकतपुरे, नारायण फुले, वसंत जाधव, रामदास गायकवाड, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील उपस्थित होते.

सदरच्या निवडीनंतर संग्रामसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, कु. स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी दिपकराव खराडे पाटील, प्रदिपराव खराडे-पाटील यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पुण्य नगरी
SMAR
शनिवार,९ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj 413 101 *



शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांचा सत्कार करताना जयसिंह मोहिते पाटील, स्वरुपाराणी मोहिते पाटील, अभिजीत रणवरे, हर्षवर्धन खराडे आदी.

# शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांची निवड

**अकलूज / प्रतिनिधी**

शैक्षणिक उपक्रमासह विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या विविध कलागुणांना वाव देणारी राज्यातील नामवंत शैक्षणिक संस्था म्हणून ओळख असणाऱ्या अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांची निवड करण्यात आली.

शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यालयात कार्यकारी संचालक मंडळाची सभा संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत नवनिर्वाचीत अध्यक्ष पदासाठी संग्रामसिंह मोहिते पाटील यांचे नाव संचालक बाळासाहेब सणस यांनी सूचवले. त्यास संचालक सुभाष दळवी, राजाभाऊ लव्हाळे, निशा गिरमे, उत्कर्ष शेटे यांनी अनुमोदन दिले. त्यास उपस्थित सर्वच संचालकांनी पाठींबा दर्शविला. त्यानुसार जयसिंह मोहिते पाटील यांनी संग्रामसिंह मोहिते पाटील यांचे अध्यक्षपदासाठी निवड जाहीर केली.

यावेळी संचालीका स्वरुपाराणी मोहिते पाटील, पांडूरंग एकतपुरे, नारायण फुले, वसंत जाधव, रामदास गायकवाड, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील उपस्थित होते. सदरच्या निवडी नंतर संग्रामसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते पाटील, स्वरुपाराणी मोहिते पाटील यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर पत्रकारांशी बोलताना नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील म्हणाले, जयसिंह मोहिते पाटील यांनी सदरची संस्था परिवार म्हणून सांभाळली, त्याचप्रमाणे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या लौकीकास शोभेल असे काम आम्ही करु. संस्था या पुढेही प्रगती पथावर नेण्याचा आपला मानस असल्याचेही ते म्हणाले. यावेळी दिपकराव खराडे पाटील, प्रदिपराव खराडे पाटील यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. ९ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj 413 101



# अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील

✓ सुराज्य/अकलूज

आदरणीय जयसिंह मोहिते-पाटील यांनी शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था परिवार म्हणून सांभाळली, त्याच प्रमाणे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या लौकीकास शोभेल असे काम करणार आहे. संस्था या पुढेही प्रगती पथावर नेण्याचा आपला मानस आहे.

– संग्रामसिंह मोहिते पाटील
(नूतन अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ)

महाराष्ट्रातील नामवंत शिक्षण संस्थांपैकी एक समजल्या जाणाऱ्या अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ मुख्य कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची कार्यकारणी सभा पार पडली. यावेळी विषय क्रमांक दोन नुसार संचालक बाळासाहेब सणस यांनी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची अध्यक्षपदी निवड करण्याचे सुचविले. याला संचालक सुभाष दळवी, राजाभाऊ लव्हाळे, सौ. निशा गिरमे, उत्कर्ष शेटे यांनी अनुमोदन दिले. याप्रसंगी सर्व सदस्यांनी या मताला अनुमोदन दिले. त्यानंतर अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे नाव जाहीर केले. जवळपास ५५ शाखा असणाऱ्या शिक्षण प्रसारक मंडळाचा संपूर्ण महाराष्ट्रात गाजावाजा आहे. विविध सांस्कृतिक कला क्रीडा कार्यक्रम राबविणे यामध्ये या संस्थेचा हातखंडा समजला जातो. संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रम या संस्थेने आज पर्यंत ऐतिहासिकरित्या राबवले आहेत. आता अध्यक्षपदाची धुरा संग्रामसिंह मोहिते-पाटील हे सांभाळणार असून त्यांची अध्यक्षपदी निवड होताच फटाक्यांची आतषबाजी करत या निवडीचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी संचालीका कु. स्वरुपाराणी मोहिते-पाटील, पांडूरंग एकतपुरे, नारायण फुले, वसंत जाधव, रामदास गायकवाड, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील उपस्थित होते.

सदरच्या निवडीनंतर संग्रामसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, कु. स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी दिपकराव खराडे पाटील, प्रदिपराव खराडे-पाटील यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

जनमत
सर्वसामान्यांचे
संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे
शनिवार ०९ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413 101 * Library

# अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांची एकमताने निवड



संग्रामनगर दि.८ (प्रतिनिधी) महाराष्ट्रातील नामवंत शैक्षणिक संस्था म्हणून विशेष ओळख असणाऱ्या अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांची निवड करण्यात आली.

शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यालयांत कार्यकारी संचालक मंडळाची सभा संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.या सभेत नवनिर्वाचीत अध्यक्ष पदासाठी संग्रामसिंह मोहिते पाटील यांचे नाव संचालक बाळासाहेब सणस यांनी सूचवले.त्यास संचालक सुभाष दळवी,राजाभाऊ लव्हाळे,सौ.निशा गिरमे,उत्कर्ष शेटे यांनी अनूमोदन दिले. तर उपस्थित सर्वच संचालकांनी पाठींबा दर्शविला. त्या नूसार जयसिंह मोहिते पाटील यांनी संग्रामसिंह मोहिते पाटील यांचे अध्यक्षपदासाठी निवड होत असल्याचे जाहीर केले.यावेळी संचालीका कु.स्वरुपाराणी मोहिते पाटील, पांडूरंग एकतपुरे,नारायण फुले,वसंत जाधव,रामदास गायकवाड,, सचिव अभिजीत रणवरे,सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील उपस्थित होते. सदरच्या निवडी नंतर संग्रामसिंह मोहिते पाटील,जयसिंह मोहिते पाटील,कु. स्वरुपाराणी मोहिते पाटील यांचा सत्कार करण्यात आला.सत्कारा नंतर पत्रकारांशी बोलताना नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील म्हणाले,जयसिंह मोहिते पाटील यांनी सदरची संस्था परिवार म्हणून सांभाळली,त्याच प्रमाणे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या लौकीकास शोभेल आसे काम करणार आहे.संस्था या पुढेही प्रगती पथावर नेण्याचा आपला मानस असल्याचेही ते म्हणाले.या वेळी दिपकराव खराडे पाटील,प्रदिपराव खराडे पाटील यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



आयपीएलचा रणसंग्राम
सोलापूर, रविवार, १० ऑक्टोबर २०२१ संचार

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413 101 * Library

# शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची निवड

संचार वृत्तसेवा



▶ **अकलूज, दि.९** - येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

दर्जेदार शिक्षण, तज्ज्ञ शिक्षक, ५५ शाखा आणि हजारो विद्यार्थी संख्या असलेल्या शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जयसिंह मोहिते पाटील यांनी सुमारे २९ वर्षे सांभाळली. या काळात संस्थेची मोठी वाढ झाली. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, कृषी, औषध निर्माण, महिला महाविद्यालय व इतर अनेक महाविद्यालये संस्थेने निर्माण केली आहेत.

या भागातील विद्यार्थी पूर्वी पुणे, मुंबईला शिक्षणासाठी जात होते. आता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी अकलूजला शिक्षणासाठी येत आहेत. संस्थेने आनंदयात्रा, विज्ञानयत्रा सारखे मोठे उपक्रम राबवून राज्यभरात अकलूज पटर्न निर्माण केला. शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत अध्यक्ष बदलाची सूचना जयसिंह मोहिते-पाटील यांनी मांडली. याचे स्वागत संचालक बाळासाहेब सणस यांनी केले. तर सूचनेला संचालक उत्कर्ष शेटे, सुभाष दळवी यांनी अनुमोदन दिले. संग्रामसिंह म्हणाले, येथे हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांच्या पालकांच्या संस्थेकडून मोठ्या अपेक्षा आहेत. मोहिते पाटील परिवाराने ही संस्था नावारुपाला आणण्यासाठी फार कष्ट घेतले आहेत. मीही ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या हिताचे निर्णय घेऊन संस्थेची कीर्ती अशीच वाढवत राहीन. यावेळी स्वरुपाराणी मोहिते-पाटील, अभिजित रणवरे, हर्षवर्धन खराडे पाटील, निशा गिरमे, राजाभाऊ लव्हाळे, नारायण फुले, वसंत जाधव, पांडुरंग एकतपुरे, रामदास गायकवाड, प्रदीप खराडे, दीपक खराडे उपस्थित होते.

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj 413 101

लोकमत
शनिवार ०९.१०.२०२१
हॅलो सोलापूर
epaper.lokmat.com

# शिक्षण मंडळ अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**अकलूज** : अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची एकमुखाने



निवड करण्यात आली. शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यकारिणीची सभा संस्थाध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ही निवड करण्यात आली. निवडीनंतर मावळते अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी फेटा, शाल, हार, श्रीफळ देऊन सत्कार केला.

याप्रसंगी संचालिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील, निशा गिरमे, राजाभाऊ लव्हाळे, पांडुरंग एकतपुरे, नारायण फुले, बाळासाहेब सणस, सुभाष दळवी, उत्कर्ष शेटे, रामभाऊ गायकवाड, वसंत जाधव, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, दीपक खराडे-पाटील, प्रदीप खराडे-पाटील आदी उपस्थित होते. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी १९९२ साली संस्थेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी दिली. ती जबाबदारी २१ वर्षे यशस्वीपणे पार पाडून संस्थेला प्रगतिपथावर नेण्याचे काम केले असल्याचे जयसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.

आपण सर्वांनी संस्थेच्या अध्यक्षपदाची माझ्यावर जबाबदारी दिली असून मार्गदर्शक संचालक विजयसिंह मोहिते-पाटील व जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार आपण यशस्वीपणे जबाबदारी पार पडणार आहे. त्यांच्याप्रमाणेच आदर्शवत काम करुन पदाचा सन्मान ठेवण्याचा आपला सदैव प्रयत्न राहील अशी ग्वाही नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

Shankarrao Mohite Mahavidyalaya, Akluj

पुढारी
MY सोलापूर
सोमवार, ११ ऑक्टोबर २०२१

# प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांवर 'सुटा'चे आजपासून आंदोलन

**सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**

न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी व्हावी म्हणून प्राध्यापकांचा लढा उभारला जाणार आहे. नेट, सेटमुक्त प्राध्यापकांना निवृत्तीवेतन मंजूर करावे, असा आदेश असूनही ते दिले जात नाहीत. या पार्श्वभूमीवर सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघटनतर्फे (सुटा) सोमवारी ११ ऑक्टोबरपासून आंदोलन पुकारण्यात आल्याची माहिती सुटा सोलापूरचे अध्यक्ष डॉ. नेताजी कोकाटे आणि प्रमुख कार्यवाह डॉ. वशिष्ठ गुरमे यांनी दिली.

आंदोलनात प्रामुख्याने विशेषांक प्रकाशित करणे, सभा घेणे, अधिकाऱ्यांच्या निषेधाचे ई मेल्स पाठविणे, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना पदाधिकाऱ्यांमार्फत आंदोलन पत्र पाठविणे, जिल्हा सभा घेणे असे टप्पे असणार आहेत. सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आणि राज्यातील एकूण पाच हजार प्राध्यापकांना निवृत्तीवेतन मंजूर करावे, अशी मागणी आहे. नेट, सेटमुक्त प्राध्यापकांना निवृत्तीवेतन मंजूर करण्याबाबत उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश नाकारल्याबद्दल उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव व शिक्षण संचालकांचा तीव्र निषेध करण्याचा ठराव एमफुक्टोच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. उच्च शिक्षण विभागाकडून प्राध्यापकांचे विविध प्रश्न प्रलंबित आहेत. वेळोवेळी पाठपुरावा करूनही त्या प्रश्नांची सोडवणूक झाली नाही. राज्यातील उच्च पान २ वर ▶

## प्राध्यापकांच्या विविध...

न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी प्राध्यापकांना निवृत्तीवेतन मंजूर करावे, असे एकूण २० आदेश दिले आहेत. त्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास राज्यातील सर्वच सहसंचालक कार्यालयांनी जाणीवपूर्वक टाळाटाळ केली आहे. यावेळी डॉ. हनुमंत आवताडे, प्रा. एस. के. मठपती, डॉ. भारत जाधव, डॉ. पंचप्पा वाघमारे, डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. संजय देवकर आदी उपस्थित होते.

लोकमत
epaper.lokmat.com
सोलापूर, बुधवार, दि. १३ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Akluj 413 101 Library

# महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय येत्या २ दिवसांत

**मुंबई :** येत्या २ दिवसांत राज्यातील पदवी महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येणार असून, त्याबाबतची तारीखही जाहीर करण्यात येईल, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी ट्विट करून दिली. महाविद्यालये सुरू करण्याचा प्रस्ताव सध्या मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिवांना पाठविला असून, त्यांच्याकडून तो पुढे मुख्यमंत्र्यांकडे पाठविला जाणार आहे.

राज्यातल्या शाळा सुरू होऊन आठवडा उलटला; मात्र पदवी अभ्यासक्रमाचे अजूनही ऑनलाइन वर्ग सुरू आहेत.

सकाळ TODAY एमएएचएमएआर/२००१/५०५२ सोलापूर, बुधवार, १३ ऑक्टोबर २०२१

AM/413 101 Shankarrao Mohite Mahavidyalaya Library

# 'सुटा'च्या प्राध्यापकांनी उगारले आंदोलन अस्त्र

**सोलापूर, ता. १२ :** नेट-सेटमुक्त प्राध्यापकांना निवृत्तीवेतन मंजूर करावे, असा आदेश असूनही ते दिले जात नसल्याच्या निषेधार्थ सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघटनेतर्फे (सुटा) सोमवारपासून आंदोलन सुरु करण्यात आल्याची माहिती 'सुटा'चे अध्यक्ष डॉ. नेताजी कोकाटे आणि प्रमुख कार्यवाह डॉ. वशिष्ठ गुरमे यांनी दिली.

उच्चशिक्षण विभागाकडून प्राध्यापकांचे विविध प्रश्न प्रलंबित आहेत. वेळोवेळी पाठपुरावा करूनही त्या प्रश्नांची सोडवणूक होत नसल्याने प्रशासनाविरोधात 'सुटा'कडून विविध टप्प्यांमध्ये व्यापक आंदोलन उभारणार असल्याचे त्यांनी सांगितले. सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आणि राज्यातील पाच हजार प्राध्यापकांना निवृत्तीवेतन मंजूर करावे अशी मागणी आहे. ती पूर्ण न झाल्याने ११ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत आंदोलनाचे टप्पे जाहीर केले आहेत. सभा घेणे, निषेधाचे ई-मेल्स पाठविणे, मुख्यमंत्र्यांना निवेदन असे असे टप्पे आहेत. यावेळी डॉ. हनुमंत आवताडे, प्रा. एस. के. मठपती, डॉ. भारत जाधव, डॉ. पंचप्पा वाघमारे, डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. संजय देवकर आदी उपस्थित होते.

सकाळ | सोलापूर सोलापूर, शनिवार, ९ ऑक्टोबर २०२१
TODAY

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj 413 101



अकलूज : शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करताना जयसिंह मोहिते-पाटील स्वरूपाराणी मोहिते-पाटील, अभिजित रणवरे, हर्षवर्धन खराडे.

# शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह

अकलूज ता.८ : अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली.

अकलुज शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यकारी संचालक मंडळाची सभा संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत संचालक बाळासाहेब सणस यांनी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षपदाबाबत प्रस्ताव मांडला त्यास संचालक सुभाष दळवी, उत्कर्ष शेटे, निशा गिरमे यांनी सर्व सदस्यांच्या अनुमोदन दिले. त्यानुसार जयसिंह मोहिते-पाटील यांनी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची अध्यक्ष पदासाठी निवड होत असल्याचे जाहीर केले. यावेळी संचालिका स्वरुपराणी मोहिते पाटील, संचालक राजाभाऊ लव्हाळे, नारायण फुले, पांडुरंग एकतपुरे, रामदास गायकवाड, वसंत जाधव सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे आदी मान्यवर उपस्थित होते. या निवडीनंतर संग्रामसिंह मोहिते-पाटील,जयसिंह मोहिते - पाटील, कु.स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

> माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या लौकिक आणखी वाढविण्याचा तसेच संस्था प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न करू व माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवू
> – संग्रामसिंह मोहिते- पाटील,
> नूतन अध्यक्ष, अकलूज शिक्षण प्रसारक मंडळ

पुण्य नगरी
SMART
गुरूवार,१४ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj 413 101



# २० ऑक्टोबरपासून कॉलेज सुरू होणार



मुंबई : कोरोनामुळे राज्यातील बंद असलेली महाविद्यालये अखेर सुरू होणार आहेत. २० ऑक्टोबरपासून राज्यातील महाविद्यालये सुरू करण्यास राज्य सरकारने मान्यता दिल्याची घोषणा उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केली. लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश देण्यात येणार आहे. ज्यांचे लसीकरण झालेले नाही त्यांच्यासाठी विद्यापीठ, महाविद्यालयांनी पुढाकार घेउन लसीकरण मोहीम राबवायची आहे. तसेच प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रशिक्षण सुरूच राहणार असल्याचेही ते म्हणाले. वसतिगृह देखील टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. महाविद्यालये येत्या २० ऑक्टोबर रोजी सुरू करण्यात येणार असल्याचे सांगून उदय सामंत म्हणाले, ज्या विद्यार्थ्यांचे लसीचे दोन्ही डोस पूर्ण झाले आहेत अशांना प्रत्यक्ष वर्गाला हजर राहता येणार आहे. ज्यांचे लसीकरण झालेले नाही अशांना लसीकरणासाठी विद्यापीठ, महाविद्यालयाने पुढाकार घेऊन मोहीम राबवायची आहे. वर्ग पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त क्षमतेने चालवायचे असल्यास स्थानिक प्रशासनाशी चर्चा करून त्याबाबतचा निर्णय घेता येईल. प्रत्यक्ष हजर राहता येणार नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन वर्ग सुरू ठेवणे हे बंधनकारक असणार आहे. तसेच महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय राज्यासाठी असला तरी काही जिल्ह्यांमध्ये कोरोनाचे प्रमाण अद्यापही वाढते आहे. तिथे स्थानिक प्रशासन स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेऊ शकते, असेही सामंत म्हणाले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे लसीकरण पूर्ण झालेले असले पाहिजे. तसेच वसतिगृहे देखील टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार आहेत, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

## बिगर नेट तसेच सेट अध्यापकांना पेन्शन

राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील बिगर नेट तसेच सेट अध्यापकांना निवृत्तीवेतनाचा लाभ देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला असल्याची माहितीही उदय सामंत यांनी दिली. ४ हजार १३३ प्राध्यापकांना याचा लाभ मिळणार आहे. जे अध्यापक २३ ऑक्टोबर १९९२ ते ३ एप्रिल २००० या कालावधीत नियुक्त होते अशांना हे निवृत्तीवेतन देण्यात येईल. शासन निर्णय १८ ऑक्टोबर २००१ व २७ जून २०१३ नुसार उपरोक्त कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरू ठेवण्यात आल्या असल्याने त्यांच्या मूळनियुक्तीचा दिनांक गृहीत धरून सेवानिवृत्ती वेतन देण्यात येईल.

लोकसत्ता
लोककारण
गुरुवार, १४ ऑक्टोबर २०२१

Mohite Mahavidyalaya * Akluj 413 101 * Library

# महाविद्यालये बुधवारपासून

## लसवंत विद्यार्थ्यांनाच प्रवेश; १८ वर्षांखालील मुलांना मात्र मुभा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** करोनाचा प्रादुर्भाव ओसरल्याने निर्बंध शिथिल करण्यात येत असून, शाळांपाठोपाठ आता महाविद्यालयेही सुरू होणार आहेत. २० ऑक्टोबरपासून (बुधवार) महाविद्यालये सुरू करण्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी केली.

करोनामुळे राज्यातील महाविद्यालये गेल्या दीड वर्षांपासून बंद होती. शाळा सुरू झाल्याने महाविद्यालये कधी सुरू होणार, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले होते. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित *(पान ६ वर)*



### विद्यार्थ्यांना रेल्वेप्रवासाची प्रतीक्षाच

मुंबई महानगर प्रदेशातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उपनगरी रेल्वे प्रवासाची परवानगी देण्याबाबत मुख्य सचिवांकडे प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे उदय सामंत यांनी सांगितले. या विद्यार्थ्यांची प्रवासप्रतीक्षा कायम आहे.

### आव्हान काय?

महाविद्यालयांत प्रत्यक्ष उपस्थित राहता न येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याची सूचना राज्य सरकारने महाविद्यालयांना केली आहे. तसेच लसीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून महाविद्यालयातच विशेष मोहीम राबवत लसीकरण पूर्ण करण्याची सूचना सरकारने केली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष आणि ऑनलाइन शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचे लसीकरण करून घेण्याचे आव्हान महाविद्यालयांपुढे असेल.

# महाविद्यालये बुधवारपासून

*(पान ५ वरून)* पवार यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सामंत यांनी सांगितले.

महाविद्यालये सुरू करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वेही जाहीर करण्यात आली आहेत. महाविद्यालयात येणारे प्राध्यापक, कर्मचाऱ्यांचे पूर्ण लसीकरण बंधनकारक आहे. तसेच करोना प्रतिबंधक लशीच्या दोन मात्रा घेतलेल्या (१८ वर्षांवरील) विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयांमध्ये प्रवेश दिला जाईल. १८ वर्षांखालील विद्यार्थ्यांना लसीकरण झाल्याचा दर्जा देण्यात आल्याने त्यांना लशीच्या दोन मात्रांची अट लागू नाही. त्यांना वर्गात बसता येईल. तसेच विद्यापीठ, महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेही प्राधान्याने लसीकरण करून घ्यावे, असे सरकारने म्हटले आहे.

विद्यापीठ-महाविद्यालयांचे वर्ग पूर्ण की निम्म्या क्षमतेने सुरू करायचे, याबाबत स्थानिक प्राधिकरणाशी चर्चा करून विद्यापीठांनी निर्णय घ्यायचा आहे. करोना प्रतिबंधित क्षेत्रात येणारी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये ही ज्या महानगरपालिका, नगरपालिका किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या अंतर्गत येतात, त्यांनी तेथील आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाशी चर्चा करून निर्णय घ्यायचा आहे. करोनाचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित क्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता याबाबत चर्चा करून महाविद्यालये सुरू करावीत, अशी सूचना करण्यात आली आहे.

सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांनी करोना व्यवस्थापनाबाबतचे केंद्राचे निर्देश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निर्देश, राज्य शासनाने वेळोवेळी जाहीर केलेली मार्गदर्शक तत्वे, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. वसतिगृहे टप्प्याटप्प्याने सुरु करण्याबाबत उच्च शिक्षण आणि तंत्रशिक्षण संचालकांनी आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आल्याचेही सामंत यांनी सांगितले.

लोकमत
गुरुवार १४.१०.२०२१
हॅलो सोलापूर
epaper.lokmat.com

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413 101 * Library

# पुढील बुधवारपासून चला कॉलेजला !

## ५० टक्के विद्यार्थी क्षमतेने भरणार वर्ग

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** लसीकरणाचे वाढते प्रमाण आणि कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने नाट्यगृहे, चित्रपटगृहे विश्व खुले होत आहे. आता महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने बुधवारी घेतला. त्यासाठी नियम जिल्हानिहाय स्वतंत्र असतील, असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

महाविद्यालये सुरू करण्याचा आदेशही बुधवारी जारी झाला. मार्च २०२० पासून बंद महाविद्यालयांची दारे आता उघडणार आहेत. विद्यापीठ/महाविद्यालयांचे वर्ग ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेने सुरू करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणांशी चर्चा करून विद्यापीठांनी निर्णय घ्यावा, असे या आदेशात म्हटले आहे.

लसीचे दोन्ही डोस घेतलेले १८ वर्षे वयावरील विद्यार्थी महाविद्यालयात हजर राहू शकतील. कोरोनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन अनिवार्य असेल. उपस्थित राहता न येणाऱ्यांना ऑनलाईन सुविधा मिळेल. वसतिगृहे टप्प्या-टप्प्याने सुरू करण्यासाठी उच्च शिक्षण विभागाचे संचालक, तंत्रशिक्षण संचालक आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करतील.

> मुंबई आणि परिसरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लोकल प्रवासाची मुभा अद्यापही नाही. त्यामुळे २० ऑक्टोबरपासून महाविद्यालये सुरु होणार असली तरी, त्यांना महाविद्यालयांत उपस्थित राहण्यात अडचणी येणार आहेत. या विद्यार्थ्यांना रेल्वे प्रवासाची मुभा मिळावी, अशी विनंती रेल्वे विभागाला राज्य शासनाकडून केली जाईल.
>
> - उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री

लस न घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठांनी संस्थाचालक, प्राचार्य यांच्या मदतीने व जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून लसीकरणाची मोहीम राबवावी. विद्यापीठ, महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठीही लसीकरण प्राधान्याने करून घ्यावे. प्रतिबंधित क्षेत्रातील महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने विद्यापीठ व प्रशासनाशी चर्चा करून निर्णय घ्यावा, असे सरकारी आदेशात म्हटले आहे.

सुराज्य सोलापूर
गुरुवार, दि.१४ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj 413 101

# महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरु

✓ सुराज्य/मुंबई

राज्यातील शाळा ४ ऑक्टोबरपासून सुरू झाल्यानंतर महाविद्यालये कधी सुरू होणार याकडे सर्वांचंच लक्ष लागून राहिलं होतं. २० ऑक्टोबर पासून राज्यातील कॉलेज सुरु होणार आहेत. मात्र करोना प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस घेणं विद्यार्थ्यांना आवश्यक असणार आहे, असे शिक्षणमंत्री उदय सामंत म्हणाले.

महाविद्यालयं सुरू करण्यासाठी वेगवेगळ्या जिल्ह्यात वेगवेगळी नियमावली असणार आहे. त्या त्या जिल्ह्यातली परिस्थिती पाहून हे ठरवलं जाईल. ज्या विद्यार्थ्यांचं लसीकरण झालेलं नाही किंवा एकच डोस झालेला आहे, त्यांच्यासाठी विशेष लसीकरण मोहीम राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ते पुढे म्हणाले, ज्या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये हजर राहता येणार नाही त्यांची ऑनलाईन शिक्षणाची सोय कॉलेजने करावी. करोनाचा प्रादुर्भाव पाहता महाविद्यालय सुरू ठेवायची का हा निर्णय घेण्याचे अधिकार सर्वस्वी स्थानिक प्राधिकरणाला असतील. डोस पूर्ण झाले नसतील तर महाविद्यालयांनी कॅम्प घेत लसीकरण करावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर वसतिगृहेसुद्धा टप्प्याटप्प्याने सुरू करण्याचे निर्देश विद्यापीठांना देण्यात आले आहेत.

संचार सोलापूर
गुरुवार, १४ ऑक्टोबर २०२१
संस्थापक : अप्पासाहेब काडादी संस्थापक-संपादक : रंगा वैद्य

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413 101 * Library

# राज्यातील महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरु

## लसीचे दोन डोस पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश

**मुंबई, दि.१३-** राज्यातील सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठे येत्या २० ऑक्टोबर २०२१ पासून सुरू करण्यात येणार आहेत, अशी महत्त्वाची घोषणा राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केली.

मात्र ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक उपस्थितीने कॉलेज सुरू करायचे वा नाही याबाबतचा निर्णय स्थानिक प्राधिकरणाशी विचारविनिमय करून विद्यापीठांनी घ्यायचा आहे, असेही सामंत यांनी सांगितले. ज्या विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण झाले आहे, अशा विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात पान १० वर

### राज्यातील महाविद्यालये ...

बोलवावे, अशा राज्य सरकारच्या स्पष्ट सूचना आहेत. ५० टक्क्यांपेक्षा जास्त उपस्थितीनिशी कॉलेज सुरू करायचे असल्यास स्थानिक परिस्थितीचा विचार करून त्यानुसार निर्णय घ्यावा, असे सांगताना ज्या विद्यार्थ्यांचे लसीकरण

४ पुढारी शहर-जिल्हा सोलापूर, गुरुवार, १४ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413 101
Library

# राज्यातील महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरू

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांतील नियमित वर्ग २० ऑक्टोबरपासून सुरू होणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली. दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहता येणार आहे आणि ज्या विद्यार्थ्यांचे लसीकरण अद्याप बाकी आहे अशा विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय आणि विद्यापीठांनी पुढाकार घेऊन स्थानिक पातळीवर विशेष लसीकरण मोहीम राबवून सर्व विद्यार्थ्यांचे लसीकरण करावे, असे आदेशही सामंत यांनी दिले.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने यापूर्वी शैक्षणिक सत्र १ नोव्हेंबरपासून सुरू केले जाईल आणि प्रत्यक्ष महाविद्यालये दिवाळीनंतर सुरू केली जातील, अशी घोषणा केली होती. शालेय शिक्षण विभागाने ४ ऑक्टोबरपासून पाचवी ते बारावी शाळा व कनिष्ठ महाविद्यालये ग्रामीण भागात आणि आठवी ते बारावीपर्यंतचे वर्ग शहरी भागात सुरू केल्याने वरिष्ठ महाविद्यालये सुरू करावीत, अशी मागणी सातत्याने होत होती. याच पार्श्वभूमीवर हा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

जेथे कोरोनाचा प्रादुर्भाव अजूनही आहे अशा परिसरातील स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित क्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता आदी बाबी विचारात घेऊन, विद्यापीठे व महाविद्यालये सुरू करण्याबाबत निर्णय त्या त्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांना असेल. विद्यापीठ, महाविद्यालयांचे वर्ग पूर्ण किंवा ५० टक्के क्षमतेने सुरू करावेत, याबाबत विद्यापीठ तसेच महाविद्यालयांनी या स्थानिक प्राधिकरणांशी विचारविनिमय करून स्थानिकस्तरावर निर्णय घ्यावा. प्रतिबंधित क्षेत्रात येणारी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना सविस्तर मार्गदर्शक सूचना (एसओपी) त्या प्राधिकरणाकडून देण्यात येईल त्यानुसारच निर्णय घ्यावा, असेही सामंत म्हणाले.

**महाविद्यालयास येण्यास अडचणी असलेल्यांचे ऑनलाईन वर्ग**

ज्या विद्यार्थी/विद्यार्थिनींना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, त्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून पान २ वर ▸

## राज्यातील महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरू

देण्याची जबाबदारी महाविद्यालयांची असणार आहे. प्रत्यक्ष वर्ग जरी सुरू झाले, तरी काही विद्यार्थ्यांना उपस्थितीबाबत अडचणी असल्यास त्यांना ऑनलाईन शिक्षण द्यावे, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**लोकल प्रवासासाठी पाठपुरावा :** मुंबईत अनेक उपनगरांतून तसेच ठाणे, कल्याण या ठिकाणाहूनही येणाऱ्या विद्यार्थ्यांना लोकल प्रवासाची सुविधा देण्याचा प्रस्ताव मुख्य सचिवांकडे लवकरच पाठविण्यात येणार आहे.

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



# शंकरराव मोहिते महाविद्यालयात युवा स्वास्थ्य कोविड लसीकरण मोहिमेस प्रारंभ

संग्रामनगर, दि. २४ (प्रतिनिधी) शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व प्राथमिक आरोग्य केंद्र माळीनगर अंतर्गत उपकेंद्र माळेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने शंकरराव मोहिते महाविद्यालयात आज युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले.या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांनी कोविड लसीकरण मोहिमेबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली व लसीकरण पूर्ण करण्याचे आवाहन केले.त्या आवाहनास प्रतिसाद देत शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज वरिष्ठ व कनिष्ठ विभाग,डी. फार्मसी कॉलेज,बी.फार्मसी कॉलेज विभागातील स्टाफ,शिक्षकेतर कर्मचारी,माळेवाडी ग्रामपंचायतीतील रहिवासी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.या लसीकरण मोहिमेत आजच्या पहिल्या दिवशी एकूण ८६ विद्यार्थी व स्टाफ यांना कोविशिल्ड लस देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.चंकेश्वर लोंढे,प्रा.दादासाहेब कोकाटे,डॉ. सविता सातपुते तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.रामचंद्र मोहिते,प्रा.आ.केंद्र माळीनगर वैद्यकीय अधिकारी डॉ. संकल्प जाधव,आरोग्य सहाय्यक- डॉ.दादासाहेब फुंदे,हनुमंत भानवसे, डॉ.तहमीम देशमुख,समुदाय आरोग्य अधिकारी ,श्रीमती ए.व्ही. हिरवे,आरोग्य सेविका झुबेरा बागवान, मनीषा वाघमारे,पुनम पवार- आशा वर्कर, लतिफा पठाण- अर्धवेळ सेवीका,महाविद्यालयातील सर्व स्टाफ व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

जनसत्य
रविवार, दि. २४ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# अकलूज येथे युवा स्वास्थ्य कोविड लसीकरण मोहिम

जनसत्य प्रतिनिधी



**अकलूज** : शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व प्राथमिक आरोग्य केंद्र माळीनगर अंतर्गत उपकेंद्र माळेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने शंकरराव मोहिते महाविद्यालयात आज युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले.या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांनी कोविड लसीकरण मोहिमेबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली व लसीकरण पूर्ण करण्याचे आवाहन केले.त्या आवाहनास प्रतिसाद देत शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज वरिष्ठ व कनिष्ठ विभाग,डी. फार्मसी कॉलेज,बी.फार्मसी कॉलेज विभागातील स्टाफ,शिक्षकेतर कर्मचारी,माळेवाडी ग्राम पंचायतीतील रहिवासी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.या लसीकरण मोहिमेत आजच्या पहिल्या दिवशी एकूण ८६ विद्यार्थी व स्टाफ यांना कोविशिल्ड लस देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.चंकेश्वर लोंढे,प्रा.दादासाहेब कोकाटे,डॉ. सविता सातपुते तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.रामचंद्र मोहिते,प्रा.आ.केंद्र माळीनगर वैद्यकीय अधिकारी डॉ. संकल्प जाधव,आरोग्य सहाय्यक- डॉ. दादासाहेब फुंदे,हंनुमंत भानवसे, डॉ.तहमीम देशमुख,समुदाय आरोग्य अधिकारी ,श्रीमती ए.जी. हिरवे,आरोग्य सेविका झुबेरा बागवान, मनीषा वाघमारे,पुनम पवार- आशा वर्कर, लतिफा पठाण- अर्धवेळ सेवीका,महाविद्यालयातील सर्व स्टाफ व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
मंगळवार, दि. २६ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101



# मोहिते महाविद्यालयात कोव्हिड लसीकरण

✔ सुराज्य/अकलूज : शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व प्राथमिक आरोग्य केंद्र माळीनगर अंतर्गत उपकेंद्र माळेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने शंकरराव मोहिते महाविद्यालयात आज युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी कोव्हिड लसीकरण मोहिमेबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज वरिष्ठ व कनिष्ठ विभाग, डी.फार्मसी कॉलेज, बी.फार्मसी कॉलेज विभागातील स्टाफ, शिक्षकेतर कर्मचारी, माळेवाडी ग्रामपंचायतीतील रहिवासी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या लसीकरण मोहिमेत आजच्या पहिल्या दिवशी एकूण ८६ विद्यार्थी व स्टाफ यांना कोविशिल्ड लस देण्यात आली. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.चंकेश्वर लोंढे, प्रा.दादासाहेब कोकाटे, डॉ. सविता सातपुते तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. रामचंद्र मोहिते, प्रा.आ.केंद्र माळीनगर वैद्यकीय अधिकारी डॉ. संकल्प जाधव, आरोग्य सहाय्यक डॉ.दादासाहेब फुंदे, हनुमंत भानवसे, डॉ. तहमीम देशमुख, समुदाय आरोग्य अधिकारी, श्रीमती ए.जी. हिरवे, आरोग्य सेविका झुबेरा बागवान, मनीषा वायमारे, पुनम पवार, आशा वर्कर, लतिफा पठाण उपस्थित होते.

पुढारी | रविवार,
१० ऑक्टोबर २०२१

बहार

Shankarrao Mohite Mahavidyalaya Akluj

# शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची निवड

**अकलूज : पुढारी वृत्तसेवा**

अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची निवड करण्यात आली.

शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यालयात कार्यकारी संचालक मंडळाची सभा संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत नवनिर्वाचित अध्यक्षपदासाठी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे नाव संचालक बाळासाहेब सणस यांनी सुचवले. त्यास संचालक सुभाष दळवी, राजाभाऊ लव्हाळे, निशा गिरमे, उत्कर्ष शेटे यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सर्वच संचालकांनी पाठिंबा दर्शविला. त्यानुसार जयसिंह मोहिते-पाटील यांनी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची अध्यक्षपदासाठी निवड होत असल्याचे जाहीर केले.

यावेळी संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, पांडुरंग एकतपुरे, नारायण फुले, वसंत जाधव, रामदास गायकवाड, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील उपस्थित होते.



**अकलूज : शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची निवड झाली. यावेळी जयसिंह मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, अभिजित रणवरे, हर्षवर्धन खराडे आदी मान्यवर.**

या निवडीनंतर संग्रामसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर पत्रकारांशी बोलताना नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील म्हणाले, जयसिंह मोहिते-पाटील यांनी ही संस्था परिवार म्हणून सांभाळली. त्याचप्रमाणे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या लौकिकास शोभेल असे काम करणार आहे. संस्था यापुढेही प्रगतिपथावर नेण्याचा आपला मानस असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी दीपकराव खराडे पाटील, प्रदीपराव खराडे-पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
मंगळवार, दि.१२ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413 101 * Library

# स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी गुणवत्ता सिद्ध करावी : नंदिनीदेवी

✓ सुराज्य/अकलूज

सध्याच्या स्पर्धेच्या युगात शिक्षण हे अनोख्या टप्प्यावर आले आहे. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाकडे वळावे. संस्कार व संस्कृती जोपासावी अभ्यासातून आपली गुणवत्ता सिद्ध करावी, असे मत नंदिनीदेवी विजयसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रात नामवंत समजल्या जाणाऱ्या शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा यथोचित सन्मान सोहळा स्मृतिभवन अकलूज येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी त्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होत्या. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, शिवामृत दूध संघाचे मार्गदर्शक राजसिंह मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते-पाटील, सुलक्षणादेवी मोहिते-पाटील, अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, कांचनमालादेवी मोहिते-पाटील, शिवामृतचे चेअरमन धैर्यशिल मोहिते-पाटील, शितलदेवी मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, संचालीका स्वरुपाराणी मोहिते-पाटील, ऋतुजादेवी मोहिते-पाटील, पं.स.माजी उपसभापती अर्जूनसिंह मोहिते-पाटील, वैष्णवदेवी मोहिते-पाटील, देवश्रीदेवी मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील, कृष्णप्रिया मोहिते-पाटील, संस्थेचे सर्व संचालक, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, विविध शाखांचे पदाधिकारी, शाखाप्रमुख आदी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना जयसिंह मोहिते-पाटील म्हणाले, ग्रामीण मुलांना शिक्षण मिळावे यासाठी सहकार महर्षींनी संस्थेची स्थापना १९४८ साली केली.कालांतराने गुणवत्ता वाढीसाठी संस्थेने संयुक्त परीक्षा पध्दत सुरु केली. मागील दहा वर्षात संस्थेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढल्याचा आलेख असून दरवर्षी संस्थेचा विद्यार्थी दिल्लीच्या राजपथावर एन,सी,सी मधे सहभागी असतो. अकलूजचे कृषी महाविद्यालय राज्यात दर्जेदार असून यातील १८३ विद्यार्थी शासनाच्या सेवेत विविध उच्चपदावर कार्यरत आहेत. आनंदयात्रेला सुमारे ३ लाख प्रेक्षकांनी भेट दिली. व त्यातूनच महिला वसतीगृह उभारले.तीनशाखेत वाद्यवृंद सुरु झाले.प्रताप क्रीडा मंडळातून सुमारे ५० हजार कलाकार तयार झाले. यामूळे चित्रपट, विविध मालिकेतून कलाकारांनी ओळख निर्माण केली. तर राज्यस्तरीय लेझीम स्पर्धेतून ७५ हजार खेळाडू तयार झाले. गौरव मराठी मातीचा, गौरव भारतीय लोककलेचा कार्यक्रमातून सांस्कृतिक भव्यता निर्माण झाली. रयतेचा राजा, राजा शिवछत्रपती हा कार्यक्रमाने उच्चांक गाठला. यूट्यूबवर संस्थेच्या लावणी व जोगवा या सांस्कृतीक गीतास १ कोटी ११ लाख रसिकांची पसंती मिळाली. हे सर्व आपण सर्वांनी एकत्र मनापासून कष्ट केले त्यामुळे शक्य झाल्याचे ते म्हणाले. सत्कारानंतर नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील म्हणाले, आपणा सर्वांना सोबत घेऊन संस्थेला प्रगतीपथावर नेण्यासाठी आपला प्रयत्न राहील. प्रस्तावीक सचिव अभिजीत रणवरे यांनी केले. आभार संचालक राजाभाऊ लव्हाळे यांनी मानले. निवृत्त मुख्याध्यापिका शहनाज शेख यांनी संस्थेला एक लाख रुपयांची देणगी दिली.

शिक्षण प्रसारक मंडळ नूतन अध्यक्ष सन्मान सोहळा



लोकमत हॅलो सोलापूर
मंगळवार १२.१०.२०२१
epaper.lokmat.com

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413 101 * Library

# शिक्षण प्रसारक मंडळाच्या नावलौकिकात भर टाकावी

## जयसिंह मोहिते-पाटील : विद्यार्थ्यांच्या गुणात्मक वाढीसाठी विविध उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

अकलूज : स.म. शंकरराव मोहिते-पाटील यांनी सुरू केलेल्या शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेतील विद्यार्थ्यांच्या संख्यात्मक वाढीबरोबरच गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबवून राज्य व राष्ट्रीय पातळीवर विद्यार्थी चमकत आहेत. नूतन पदाधिकाऱ्यांनी सर्वांना सोबत घेऊन संस्थेच्या नावलौकिकात भर टाकावी, अशी अपेक्षा संस्थेचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केली.



शिक्षण प्रसारक मंडळाचे नुतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचा सत्कार करताना विजयसिंह मोहिते-पाटील, नंदिनीदेवी मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील व अन्य.

शंकरनगर-अकलूज येथे शिक्षण प्रसारक मंडळातर्फे नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचा माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व नंदिनीदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विजयसिंह मोहिते-पाटील वाहतूक संघाचे अध्यक्ष राजसिंह मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील, सुलक्षणादेवी मोहिते-पाटील, बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, कांचनमालादेवी मोहिते-पाटील, दि ग्रीन फिंगर्स ग्लोबल स्कूलच्या अध्यक्ष सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, शिवामृत दूध संघाचे चेअरमन धैर्यशील मोहिते-पाटील, डॉटर्स मॉम फाउंडेशनच्या अध्यक्ष शीतलदेवी मोहिते-पाटील, जि.प. सदस्य स्वरूपाराणी मोहिते-पाटील, ऋतुजादेवी मोहिते-पाटील, पं.स.चे माजी उपसभापती अर्जूनसिंह मोहिते-पाटील, माजी सभापती वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, देवश्रीदेवी मोहिते -पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील, कृष्णप्रिया मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक सचिव अभिजीत रणवरे यांनी केले. संचालक राजाभाऊ लव्हाळे यांनी आभार मानले. यावेळी निवृत्त मुख्याध्यापिका शहनाज शेख यांनी संस्थेला एक लाख रुपयांची देणगी दिली.

सकाळ | सोलापूर सोलापूर, बुधवार, १३ ऑक्टोबर २०२१
TODAY

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413 101 * Library



अकलूज : शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचा सत्कार करताना माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते-पाटील आदी.

# शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह यांचा सत्कार

**अकलूज, ता. १२ :** येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचा सन्मान माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

स्मृती भवन येथे झालेल्या सत्कार समारंभास नंदिनीदेवी मोहिते-पाटील, राजसिंह मोहिते पाटील, मदनसिंह मोहिते पाटील, कांचनमाला मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते पाटील, सुलक्षणादेवी मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, शिवामृतचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, शीतलदेवी मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते पाटील, वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, संचालिका स्वरुपराणी मोहिते-पाटील, ऋतुजादेवी मोहिते-पाटील, देवश्री मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील, कृष्णप्रिया मोहिते-पाटील, संयुक्तादीदी मोहिते-पाटील यासह शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक तसेच विविध शाखांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सहकार महर्षींनी १९४८ साली स्थापन केलेल्या शिक्षण प्रसारक मंडळात आज ५५ शाखेतून सुमारे ३० हजार विद्यार्थी शिकत आहेत. संस्थेतील विद्यार्थ्यांचे गुणात्मक वाढीबरोबर क्रीडा व सांस्कृतिक गुणांना ही वाव दिला जात असून अनेक उच्चपदस्थ अधिकारी तसेच राष्ट्रीय पारितोषक मिळविणारे कलाकार घडविले आहेत. नूतन अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी सर्वांना सोबत घेऊन काम करावे, अशी अपेक्षा जयसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केली. प्रास्तविक सचिव अभिजित रणवरे यांनी केले तर आभार संचालक राजाभाऊ लव्हाळे यांनी मानले. निवृत्त मुख्याध्यापिका शहनाज शेख यांनी संस्थेला एक लाख रूपये देणगी दिली.

जनमत सर्वसामान्यांचे
बुधवार, १३ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Akluj 413 101 * Library

जनमत सर्वसामान्यांचे

सोलापूर जिल्हा / ग्रामीण

# स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाकडे वळून गुणवत्ता सिद्ध करावी : नंदिनीदेवी मोहिते-पाटील

शिक्षण प्रसारक मंडळ नूतन अध्यक्ष सन्मान सोहळा उत्साहात

संग्रामनगर दि.१२ (प्रतिनिधी)–सध्याच्या स्पर्धेच्या युगात शिक्षण हे अनोख्या टप्प्यावर आले आहे विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाकडे वळावे. संस्कार व संस्कृती जोपासावी अभ्यासातून आपली गुणवत्ता सिद्ध करावी असे मत सौ नंदिनीदेवी विजयसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रात नामवंत समजल्या जाणाऱ्या शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी संग्रामसिंह मोहिते पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा यथोचित सन्मान सोहळा स्मृतिभवन शंकरनगर–अकलूज येथे आयोजीत करण्यात आला होता.या प्रसंगी त्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होत्या. यावेळी व्यासपीठवर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील,शिवामृत दूध संघाचे मार्गदर्शक राजसिंह मोहिते पाटील,शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील,सौ.सुलक्षणादेवी मोहिते पाटील,अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील,सौ.कांचनमालादेवी मोहिते पाटील,शिवामृतचे चेअरमन धैर्यशिल मोहिते पाटील,सौ. शितलदेवी मोहिते पाटील,सौ. सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, संचालीका कु.स्वरुपाराणी मोहिते पाटील,सौ.रुतुजादेवी मोहिते पाटील,पं.स.माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील,सौ.वैष्णवदेवी मोहिते पाटील,सौ.देवश्रीदेवी मोहिते पाटील,सयाजीराजे मोहिते पाटील,कृष्णप्रिया मोहिते पाटील, संस्थेचे सर्व संचालक, सचिव अभिजीत रणवरे,सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील,विविध शाखांचे पदाधीकारी,शाखाप्रमुख आदी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते नतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते–पाटील यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.यावेळी बोलताना जयसिंह मोहिते पाटील म्हणाले,ग्रामीण मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सहकार महर्षींनी संस्थेची स्थापना १९४८ साली केली. कालांतराने गुणवत्ता वाढीसाठी संस्थेने संयुक्त परीक्षा पध्दत सुरु केली.मागील दहा वर्षात संस्थेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढल्याचा आलेख असून दरवर्षी संस्थेचा विद्यार्थी दिल्लीच्या राजपथावर एन.सी.सीमधे सहभागी असतो.अकलूजचे कृषी महाविद्यालय राज्यात दर्जेदार असून यातील १८३ विद्यार्थी शासनाच्या सेवेत विविध उच्चपदावर कार्यरत आहेत. आनंदयात्रेला सुमारे ३ लाख प्रेक्षकांनी भेट दिली.व त्यातूनच महिला वस्तीगृह उभारले.तीन शाखेत वाद्यवृंद सुरु झाले. प्रताप क्रीडा मंडळातून सुमारे ७५ हजार कलाकार तयार झाले.यामुळे चित्रपट, विविध मालिकेतून कलाकारांनी ओळख निर्माण केली.तर राज्यस्तरीय लेझीम स्पर्धेतून हजार खेळाडू तयार झाले.लेझीमची ग्रीनीज वल्ड रेकार्ड मध्ये नोंद झाली. गौरव मराठी मातीचा,गौरव भारतीय लोककलेचा कार्यक्रम तून सांस्कृतिक भव्यता निर्माण झाली.रयतेचा राजा,राजा शिवछत्रपती हा भव्य कार्यक्रमाने उच्चांक घडविला.यूट्यूबवर संस्थेच्या लावणी व जोगवा या सांस्कृतीक गीतास १ कोटी ११ लाख रसिकांची पसंती मिळाली. हे सर्व आपण सर्वांनी एकत्र मनापासून कष्ट केले त्यामुळे शक्य झाल्याचे ते म्हणाले. सत्कारानंतर नतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील म्हणाले,'आपणा सर्वांना सोबत घेऊन संस्थेला प्रगतीपथावर नेण्यासाठी आपला प्रयत्न राहील.प्रस्तावीकात सचिव अभिजीत रणवरे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. आभार संचालक राजाभाऊ लव्हाळे यांनी मानले.निवृत्त मुख्याध्यापिका सौ.शहनाज शेख यांनी संस्थेला एक लाख रुपयाची देणगी दिली.

### शिक्षण प्रसारक मंडळाच्या लौकीकात भर टाका

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आपण ४२ वर्ष शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्य केले. संस्थेची राज्यात विशेष ओळख निर्माण झाली.नूतन पदाधीकार्यांनीही सर्वांना सोबत घेऊन संस्थेचा लौकीक व गणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा संस्थेचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केली.



पुढारी
MY सोलापूर
बुधवार, १३ ऑक्टोबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413 101 * Library

# शिक्षण प्रसारक मंडळाची राज्यात विशेष ओळख

## जयसिंह मोहिते-पाटील; अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचा अकलूजमध्ये सत्कार

**अकलूज : पुढारी वृत्तसेवा**

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आपण ४२ वर्षे शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्य केले. संस्थेची राज्यात विशेष ओळख निर्माण झाली आहे. नूतन पदाधिकाऱ्यांनीही सर्वांना सोबत घेऊन संस्थेचा लौकीक व गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा संस्थेचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.



**अकलूज : संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचा सत्कार विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी उपस्थित मोहिते-पाटील परिवारातील सदस्य.**

शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, नंदिनीदेवी मोहिते-पाटील, शिवामृत दूध संघाचे मार्गदर्शक राजसिंह मोहिते-पाटील, मार्गदर्शक जयसिंह मोहिते-पाटील, सुलक्षणादेवी मोहिते-पाटील, बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, कांचनमालादेवी मोहिते-पाटील, शिवामृतचे चेअरमन धैर्यशील मोहिते-पाटील, शीतलदेवी मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, संचालिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील, ऋतुजादेवी मोहिते-पाटील, पं.स. माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील, वैष्णवदेवी मोहिते-पाटील, देवश्रीदेवी मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील, कृष्णप्रिया मोहिते-पाटील, संस्थेचे सर्व संचालक, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, विविध शाखांचे पदाधीकारी, शाखाप्रमुख आदी उपस्थित होते.

यावेळी नंदीनीदेवी मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील यांनी मार्गदर्शन केले. सत्कारानंतर नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील म्हणाले की, आपणा सर्वांना सोबत घेऊन संस्थेला प्रगतीपथावर नेण्यासाठी आपला प्रयत्न राहील. निवृत्त मुख्याध्यापिका शहनाज शेख यांनी संस्थेला एक लाख रुपयाची देणगी दिली.

प्रास्ताविक सचिव अभिजित रणवरे यांनी केले. आभार संचालक राजाभाऊ लव्हाळे यांनी मानले.

पुढारी
MY सोलापूर
मंगळवार, ३० नोव्हेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101




अकलूज : प्रा. विष्णू सुर्वे मार्गदर्शन करताना. याप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# अकलूज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा अभ्यासक्रमाला प्रारंभ

**अकलूज : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर संलग्रित, शिक्षण प्रसारक मंडळाच्या शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज येथे संविधानदिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा राष्ट्रीय प्रमाणपत्र अभ्यासक्रमास प्रारंभ झाला.

शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्यावतीने २६ नोव्हेंबर २०२१ ते २६ जानेवारी २०२२ याकालावधीत या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन केले आहे. त्यातील पहिले पुष्प प्रा. विष्णू सुर्वे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्रचरित्र' या विषयावर गुंफले. प्रा. सुर्वे म्हणाले की, जेवढी प्रतिकूल परिस्थिती तेवढीच महान व्यक्तिमत्त्वे घडण्याची शक्यता जास्त असते. हेच डॉ. बाबासाहेबांच्या चरित्रातून आपणास शिकायला मिळते. डॉ. बाबासाहेबांना मिळालेले सामाजिक वातावरण, त्यातून घेतलेले शिक्षण, त्यांचे लढे, त्यांच्या चळवळी, त्यांची अभ्यासूवृत्ती, त्यातून घटनाकार, घटनाकर्ते, असा झालेला प्रवास प्रा. सुर्वे यांनी आपल्या विशेष शैलीत मांडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे होते. प्रास्ताविक डॉ. विश्वनाथ आवड यांनी केले. सूत्रसंचालन नागनाथ साळवे यांनी केले.

# जनमत सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

शनिवार २७ नोव्हेंबर २०२१


Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

## संविधानाने देशातल्या नागरीकास सार्वभौमत्व दिले : प्रा. विष्णू सुर्वे




संग्रामनगर, दि.२६ (प्रतिनिधी) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठ सोलापूर संलग्नित,शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज रांज्यशास्त्र व सामाजिक शास्त्र असोशिएशन आयोजित संविधान दिनानिमीत्त आयोजित डॉ बाबासाहेब आंबेडकर विचारधारा राष्ट्रीय प्रमाणपत्र अभ्यासक्रमामध्ये ते बोलत होते.

शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे वतीने दिनांक २६ नोव्हें.२०२१ ते २६ जाने. २०२२ या कालावधीत वरील प्रमामणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन केलेले आहे त्यातील पहिले पुष्प आज प्रा.विष्णु सुर्वे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समग्र चरीत्र या विषयांवर गुंफले. ते पुढे म्हणाले की,जेव्हडी प्रतिकुल परीस्थीती तेव्हडीच महान व्यक्तीमत्वे घडण्याची शक्यता जास्त असते हेच डॉ बाबासाहेबांच्या चरीत्रातून आपणास शिकायला मिळते.डॉ बाबासाहेबांना मिळालेले सामाजीक वातावरण त्यातुन घेतलेले शिक्षण,त्याचे लढे, त्यांच्या चळवळी,त्यांची अभ्यासुवृत्ती त्यातुन घटनाकार,घटनाकर्ते असा झालेला प्रवास प्रा विष्णू सुर्वे यांनी आपल्या अभ्यासू ओघवती शैलीत मांडला. सुरवातीला शहिदांनी २६.११ रोजी शहिद झालेल्या शहिदांचे प्रतिमापूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले,त्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर व राज्यघटनेचा सरनामा यांचे पुजन करण्यात आले, सरनामा प्रस्ताविकाचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दत्तात्रय बागडे होते त्यांनी महापुरूषांच्या विचारधारा उपक्रमाच्या आयोजनाची आवश्यकता आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ विश्वनाथ आवड यांनी केले. सुत्रसंचलन नागन्नाथ साळवे या विदयार्थ्याने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.बाळासाहेब मुळीक, प्रा.दादासाहेब कोकाटे,डॉ.सज्जन पवार, डॉ आण्णासाहेब नलावडे,डॉ चंकेश्वर लोंढे,डॉ अपर्णा कुचेकर,डॉ शिरीष शिंदे,डॉ चंद्रशेखर ताटे देशमुख,प्रा.निवृत्ती लोखंडे,डॉ रत्नदिप गायकवाड डॉ.भगवान साळुंखे डॉ रामभाऊ सावळजकर, श्री युवराज मालुसरे,सुरेश बन्नपट्टे, रमजान शेख व विदयार्थी मारूती सुर्वे,महादेव चव्हाण,प्रशांत वाघमारे, नागन्नाथ साळवे,केदार लोहकरे, पुजा सुरवसे,ओंकार पवार यांनी प्रयत्न केले.

पुण्य नगरी
SMART
सोमवार,८ नोव्हेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

॥ तेजो सदा ज्ञानमय प्रदीप ॥

Shikshan Prasarak Mandal's

# Shankarrao Mohite Mahavidyalaya, Akluj

Tal:- Malshiras Dist:- Solapur

(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur)

## WALK-IN-INTERVIEW

Eligible Candidates are invited for the following purely temporary posts on Clock Hour Basis (CHB) Two CHB candidates will be appointed against each full time post, (Grant. Non Grant & Post Graduate Non-Grant Section)

| Sr. No. | Designation | Total Post F.T. | Total Post CHB | Sanetioned Post C.H.B. | Reservation |
|---|---|---|---|---|---|
| | Assistant Professor in | | | | Under Graduate Grantable Posts |
| 1. | Physics | 03 | - | 06 | 02 ST, 02 OBC, 02 OPEN |
| 2. | Chemistry | 05 | | 10 | 02 ST, 02 VJNT, 02 OBC, 04 OPEN |
| 3. | Botany | 03 | | 06 | 02 ST, 02 OBC, 02 OPEN |
| 4. | Zoology | 04 | | 08 | 02 ST, 02 OBC, 04 OPEN |
| 5. | Mathematics | 01 | | 02 | 02 OPEN |
| 6. | English | 01 | | 02 | 02 OBC |
| 7. | Economics | 01 | | 02 | 02 OBC |
| 8. | Commerce | 00 | 01 | 01 | 01 SC |
| 9. | Statistics | 01 | | 02 | 02 OPEN |
| | Psychology | 01 | - | 01 | 01 OPEN |
| | **Post Graduate Non - Grant Posts** | | | | |
| 1. | Electronics | 05 | | 10 | 2 SC, 2 OBC, 04 OPEN |
| 2. | Agro Chemicals & Pest Management | 04 | | 08 | 2 SC, 2 OBC, 02 OPEN |

**N.B.:** 1) The appointments will be made as per the terms & conditions mentioned in the Government of Maharashtra G.R.dated 14.11.2018. 2) If reserve candidates will not available the posts will be filled from the available candidates of other categories. 3) No. of posts will depend up on the actual workload..

**Interested candidates may attend the interview along with the original documents & Bio data on 15/11/2021 at 9.30 a.m. at Shankarrao Mohite Mahavidyalaya, Akluj**

**Dr. Dattatraya Bagade**
**I/C Principal**
**Shankarrao Mohite Mahavidyalaya, Akluj**

**Sangramsinh Mohite-Patil**
**President**
**Shikshan Prasarak Mandal, Akluj**

जनसत्य
सोमवार, दि. ८ नोव्हेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj - 413101

# विद्यार्थ्यांना लसीकरण करण्याची जबाबदारी प्राचार्यांवर

## कुलसचिव डॉ. सुरेश पवार यांची माहिती

कॉलेजमधील प्रत्येक विद्यार्थ्याने कोविडवरील प्रतिबंधित लस टोचून घ्यावी, या हेतूने प्राचार्यांना पत्र पाठविले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर मेसेज पाठवून लस घेण्याचे आहवान केले आहे. लस न घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी यादी काढून लसीकरण करण्यात येणार आहे. याची सर्व जबाबदारी महाविद्यालयावर असून, येत्या काही दिवसात विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण करण्यात येणार आहे.

-डॉ. सुरेश पवार,
कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ,सोलापूर

जनसत्य प्रतिनिधी

सोलापूर : दिवाळीनंतर कॉलेज सुरु करण्यात येणार आहे. कॉलेज मध्ये प्रवेश करण्यासाठी कोविड लसीचे दोन डोस घेणे बंधनकारक केले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संलग्नित जिल्ह्यात ९८ महाविद्यालय आहेत. या महाविद्यालयातील ६० हजार विद्यार्थ्यांना कोविड डोससाठी गूगल फॉर्म पाठविले आहे. त्यातील ३७ हजार ५०० विद्यार्थ्यांनी गूगल फॉर्म भरले नाही. आता त्या मुलांना लस टोचून घेण्याची जबाबदारी महाविद्यालयांच्या प्राचार्यांवर सोपविण्यात आली आहे.

दिवाळीनंतर कॉलेज सुरु होणार असून, दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात उपस्थित राहता येणार आहे. कोरोना रोगाचा प्रार्दुभावापासून तरुणवर्ग सुरक्षित राहावेत, त्यांच्यापासून कुटुंबातील इतरांना कोरोनाची बाधा होऊ नये म्हणून मिशन यूथ हेल्थ लसीकरण राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील बहुतेक महाविद्यालयावर विद्यार्थ्यांसाठी कोविड लसीकरणाची सोय करण्यात येत आहे. त्यापूर्वी विद्यापीठ प्रशासनाने ६० हजार विद्यार्थ्यांच्या मोबाईल, ईमेल वर गूगल फॉर्म पाठविला आहे. त्यामध्ये त्यां तरुणाचे नाव, वय, कोरोनावरील प्रतिबंध लस टोचली आहे का, पहिला की दुसरा डोस टोचला आहे, कधी टोचला आहे: असे विविध प्रश्न विचारण्यात आले आहेत. चिंतेची बाब म्हणजे एकूण विद्यार्थ्यांपैकी २२ हजार ५०० विद्यार्थ्यांनी गूगल फॉर्म मध्ये माहिती भरली असून उर्वरित तरुणांनी काहीच माहिती भरलेली नाही. तरुणांच्या लसीकरणासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकास ५० विद्यार्थ्यांनी जबाबदारी सोपविली जाणार आहे. अनेक विद्यार्थ्यांकडे अँडराईड मोबाईल नसल्यामुळे महाविद्यालयाला कोविड विषयी माहिती भरुन घेणारे गूगल फॉर्म भरुन घेण्यास अडचण येण्याची शक्यता आहे. त्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांना महाविद्यालय येथे डोस देण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील बऱ्याच विद्यार्थीनीकडे मोबाईल नाही. त्यामुळे विद्यार्थीकडून गूगल फॉर्म भरुन घेता येणार नाही. महाविद्यालय सुरु झाल्यानंतर मोबाईल नसलेल्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांच्याकडून ऑफलाईन फॉर्म भरुन कोविड डोस टोचण्याची सोय करणे गरजेचे आहे.

सकाळ

सोलापूर, सोमवार,
८ नोव्हेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# विद्यार्थ्यांची हजेरी आता 'महास्टुडन्ट' ॲपवर

**सोलापूर, ता. ७ :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांनी शालेय शिक्षण विभागाला महास्टुडन्ट ॲपसंदर्भात पाठवलेला प्रस्ताव मान्य झाला आहे. राज्यातील शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांची हजेरी आता महास्टुडन्ट ॲपद्वारे नोंदविण्यास शालेय शिक्षण विभागाने मान्यता दिली आहे. त्यामुळे राज्यातील विद्यार्थी व शिक्षकांची उपस्थिती आता एका क्लिकवर समजणार आहे.

राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत तंत्रस्नेही शिक्षकांची आणि डिजिटल शाळांची चळवळ मोठ्या प्रमाणात उभा राहिली आहे. तंत्रस्नेही शिक्षकांच्या मदतीने राज्यात सरल प्रणालीवर सर्व शाळा, शिक्षक व विद्यार्थ्यांची माहिती भरण्यात आली आहे. भारत सरकारने प्रोग्राम्स गार्डिंग इंडेक्स हा निर्देशांक विकसित केला आहे. यामध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांची डिजिटल पद्धतीने उपस्थिती यासाठी गुण आहेत. यासाठी राज्याने विकसित केलेल्या सरल प्रणालीमध्ये शाळांच्या विद्यार्थी व शिक्षक यांच्या माहितीच्या आधारे राज्यातील शाळांमधील विद्यार्थी व शिक्षकांची उपस्थिती नोंदविण्यासाठी सरल प्रणाली आधारित सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांची व शिक्षकांची उपस्थिती डिजिटल पद्धतीने महास्टुडन्ट ॲपवर भरून घेतली जाणार आहे. हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर महास्टुडन्ट नावाने उपलब्ध आहे. या ॲपमध्ये शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती डिजिटल पद्धतीने नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिक्षकाला आपल्या वर्गातील अनुपस्थित विद्यार्थ्यांची माहिती सहजपणे नोंदविता येणार आहे. याच सोबत शाळेमधील सर्व शिक्षकांची उपस्थिती नोंदणीची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



# संग्रामनगर येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात एड्स जनजागृती अभियान

संग्रामनगर, दि.०८ (प्रतिनिधी)– येथील शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग,शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र सोलापूर व आय.सी.टी.सी.उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने एच आय व्ही एड्स व स्वेच्छा रक्तदान जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानाच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय पोस्टर व शॉर्टफिल्म स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पोस्टर स्पर्धेत महाविद्यालयातील २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तर शॉर्ट फिल्ममध्ये तीन ग्रुपने सहभाग नोंदवला.निवड समितीमार्फत पोस्टर व शॉर्ट फिल्मचे मूल्यांकन करून प्रथम क्रमांकासाठी पाच हजार रुपये द्वितीय क्रमांकासाठी तीन हजार रुपये व तृतीय क्रमांकासाठी दोन हजार रुपये बक्षीस देण्याचे घोषित केले.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हा रुग्णालय अकलूज येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रवीण शिंदे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एस.बागडे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात एड्स जनजागृती व त्या आजारासंबंधी असणारे गैरसमज या विषयी माहिती दिली .महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बागडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात एड्स बद्दलची वेगवेगळ्या राज्यातील आकडेवारी स्पष्ट करून या आजाराविषयीची माहिती देऊन अनेक उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी डॉ.धनंजय दिक्षित,योगेश कांबळे,सुंदर गायकवाड राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सी.बी. लोंढे,डॉ.सौ.एस.एम.प्रा.रविराज सोनवणे महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.लोंढे.यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.सविता सातपुते यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नागनाथ साळवे यांनी केले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library



# शंकरराव मोहिते महाविद्यालयात एड्स् जनजागृती अभियान

✔ सुराज्य/अकलूज : अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग, शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र, सोलापूर व आय. सी. टी. सी. उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने एचआयव्ही एड्स व स्वेच्छा रक्तदान जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानाच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय पोस्टर व शॉर्टफिल्म स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पोस्टर स्पर्धेत महाविद्यालयातील २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तर शॉर्ट फिल्ममध्ये तीन ग्रुपने सहभाग नोंदवला. निवड समितीमार्फत पोस्टर व शॉर्ट फिल्मचे मूल्यांकन करुन प्रथम क्रमांकासाठी पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी तीन हजार रुपये व तृतीय क्रमांकासाठी. दोन हजार रुपये बक्षीस देण्याचे घोषित केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हा रुग्णालय अकलूज येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण शिंदे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. बागडे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात एड्स जनजागृती व त्या आजारासंबंधी असणारे गैरसमज या विषयी माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बागडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात एड्स बद्दलची वेगवेगळ्या राज्यातील आकडेवारी स्पष्ट करुन या आजाराविषयीची माहिती देऊन अनेक उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी डॉ. धनंजय दीक्षित, योगेश कांबळे, सुंदर गायकवाड राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सी.बी. लोंढे, डॉ. सौ. एस. एम. प्रा. रविराज सोनवणे महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. लोंढे. यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सविता सातपुते यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नागनाथ साळवे यांनी केले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library



# सेवानिवृत्त प्राचार्यांना सर्वोच्च न्यायालयाकडून न्याय

## आठ वर्षांच्या लढ्यानंतर सेवानिवृत्त प्राचार्यांचा सुटला प्रश्न

**तुळजापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील सेवानिवृत्त प्राचार्यांनी देण्यात आलेल्या मुदतवाढीसाठी प्राचार्यांनी दिल्लीच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याबाबत कोर्टाने विचार विनिमय करून सेवानिवृत्त प्राचार्य यांच्या बाजूने निकाल दिल्यामुळे राज्यातील सेवानिवृत्त प्राचार्यांना ८ वर्षांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर दिलासा मिळाला आहे. सेवानिवृत्त प्राचार्य संघटनेचे प्रतिनिधी डॉ. बी. एन. इंगोले यांनी जोरदार स्वागत केले आहे. प्रतिष्ठित असणाऱ्या प्राचार्य मंडळींना नाहक त्रास देणाऱ्या या प्रकरणांमधून सेवानिवृत्त प्राचार्य यशस्वीपणे बाहेर पडले आहेत.

महाराष्ट्र सरकारच्या ५ मार्च २०१३ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यभरात साठ वर्षे सेवा केलेल्या प्राचार्यांना ६२ वर्षे आणि ६५ वर्षे अशी मुदतवाढ देण्यात आली. राज्य सरकारने अनेक वेळा प्राचार्यांची पदे भरण्याचा प्रयत्न केला; परंतु प्राचार्यांची पदे भरली गेली नाहीत, त्यामुळे राज्य सरकारला कार्यरत असणाऱ्या प्राचार्यांना मुदतवाढ देण्याची गरज वाटली त्यामुळे कार्यरत असणाऱ्या प्राचार्यांना २०१३ मधील परिपत्रकाद्वारे मुदतवाढ देण्यात आली; परंतु ही मुदतवाढ मुंबई येथील खंडपीठाकडून रद्दबातल करण्यात आली होती. याविरोधात प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले नांदेड, प्राचार्य एस. डी. पेशवे नळदुर्ग, प्राचार्य डॉ क्रांतिकुमार पाटील (कोल्हापूर), प्राचार्य डॉ. किशोर पवार (नाशिक), प्राचार्य सुतरगाव (बार्शी), प्राचार्य देवरे, प्राचार्य डॉ. करंडे, प्राचार्य खांडगे (अहमदनगर) यांनी नवी दिल्लीच्या सुप्रीम कोर्टामध्ये मुंबई हायकोर्टाच्या निर्णयाच्या विरोधात फेरयाचिका दाखल केली आणि सर्वोच्च न्यायालयाला राज्य सरकारने २०१३ मध्ये काढण्यात आलेले परिपत्रक याशिवाय इतर महत्त्वाचे पुरावे सादर केले. प्राचार्यांच्या बाजूने सुप्रीम कोर्टामध्ये ॲड. डॉ. बाबू मारलापल्ले यांनी कामकाज पाहिले. ८ वर्षांनंतर सेवानिवृत्त प्राचार्य यांना कोर्टाकडून न्याय मिळाला त्यामुळे सेवानिवृत्त झालेल्या प्राचार्यांची मानहानी टळली आहे. मुंबई हायकोर्टाचा निकाल दिल्यानंतर प्रसारमाध्यमांमधून सेवानिवृत्त प्राचार्य यावर मानहानिकारक लेखन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर हा निकाल महत्त्वाचा मानला जात आहे.



> या प्राचार्यांना मुदतवाढ देताना राज्य सरकारच्या आणि विद्यापीठाच्या सर्व नियमांचे तंतोतंत पालन करण्यात आले होते, त्यामुळे मुदतवाढ करण्यात आलेल्या प्राचार्यांची सेवा निश्चितपणे कायदेशीर होती, त्यामुळे खंडपीठमध्ये प्राचार्यांना मिळालेला न्याय पुढे सर्वोच्च न्यायालयात मिळू शकला.
>
> **- व्ही. एन. इंगोले,** प्राचार्य, पिपल्स महाविद्यालय, नांदेड

प्राचार्य पदावर काम करणाऱ्या आम्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्रास सहन करावा लागला आहे, सेवानिवृत्त होण्याच्या अत्यंत नाजूक परिस्थितीमध्ये आमच्यावर न्यायालयामध्ये लढा देण्याची वाईट वेळ आली तरीही आम्ही खचून न जाता आमच्याकडे असणारे सर्व पुरावे सर्वोच्च न्यायालयासमोर मांडले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या दिवशी आम्हाला न्याय मिळाला, या दहा प्राचार्यांनी सरकारचे कोणतेही नुकसान केलेले नाही. त्यामुळे आगामी काळात सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल सर्वांसाठी मार्गदर्शक राहील. या प्रकरणांमध्ये राज्यभरातील अनेक ठिकाणी अशा स्वरूपाच्या केसेस दाखल करण्यात आल्या होत्या, त्यांची संख्या वाढत गेली शेवटी न्यायालयास या सर्व केसेस मुंबई उच्च न्यायालयात एकत्रित आणाव्या लागल्या, त्यानंतर मात्र सेवानिवृत्त प्राचार्यांनी कायदेशीर बाजू योग्य सांभाळल्यामुळे सुप्रीम कोर्टामध्ये सेवानिवृत्त प्राचार्यांना न्याय मिळाला आहे अशी भावना या सेवानिवृत्त प्राचार्यांनी व्यक्त केलेली आहे. या प्रकरणांमध्ये सुप्रीम कोर्टाचे वरिष्ठ ॲड. डॉ. बाबू मारलापल्ले यांनी अभ्यास करून सेवानिवृत्त प्राचार्यांना न्याय मिळवण्यासाठी निर्णायक यशस्वी लढा दिला आहे.



लोकमत
epaper.lokmat.com
सोलापूर, शुक्रवार, दि. १० डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# ऑनलाइन विद्यापीठ स्थापण्याच्या हालचाली

## डॉ. आर. के. शेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती स्थापन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे राज्य शासनाने ऑनलाइन विद्यापीठ स्थापन करण्याचा विचार सुरू केला असून, त्यादृष्टीने परिपूर्ण अभ्यास करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आर. के. शेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये ऑनलाइन शिक्षणाचा विचार केला आहे. त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना त्या पद्धतीचे शिक्षण देण्यासाठी काय करावे?, याबाबतचा अहवालसुद्धा या समितीकडून दिला जाणार आहे. ऑनलाइन विद्यापीठाच्या स्थापनेमुळे प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता भासणार नाही. त्याचप्रमाणे विद्यापीठ शुल्काव्यतिरिक्त निवासव्यवस्था, प्रवास इत्यादी बाबींचा अधिकचा खर्च त्यांना करावा लागणार नाही. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये ऑनलाइन व डिजिटल शिक्षणाचे महत्त्व विशद केले आहे. त्यामुळेच राज्य शासनाने समिती स्थापन केली आहे.

डॉ. आर. के. शेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या या समितीमध्ये पुणे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष रमान प्रीत, वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज अॅण्ड रिसर्चचे संचालक आनंदराव दादास, पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट विभाग प्रमुख डॉ. मनीष गोडसे, अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीचे अधिष्ठाता अंगप्पा गुनासेकरण, नागपूर येथील आय.आय.एम.चे संचालक भीमराय मेत्री, मुंबई विद्यापीठाचे आयटी विभागाचे प्रमुख श्रीवरमंगई रामानुजम, तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. समितीला अहवाल सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

### समिती काय करणार?

- प्रगत देशांमधील ऑनलाइन विद्यापीठांचा अभ्यास करून धोरण ठरवणार.
- सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार विद्यापीठ स्थापन करणे योग्य आहे किंवा नाही, ते ठरविणार.
- नवीन शैक्षणिक धोरणाच्या तरतुदीतील घटकांचा विचार करून विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण कसे द्यावे? ऑनलाइन विद्यापीठासाठी लागणारी मूलभूत आवश्यक सुविधा मनुष्यबळ साधन सामग्री काय असेल? त्यासाठी खर्च किती होईल? तसेच शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांचे गुणवत्तेचे निकष निश्चित करणे.
- अभ्यासक्रम, परीक्षा, परीक्षांचा निकाल, पदवी याबाबत अहवाल सादर करणे. शिक्षणाची वेळ, कालावधी, शुल्काबाबत शिफारस करणे.
- ऑनलाइन विद्यापीठे स्थापण्याऐवजी राज्यातील कृषी विद्यापीठांमार्फत ऑनलाइन शिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देता येईल का, याची चाचपणी करणे.

लोकसत्ता
संपादकीय
शुक्रवार, १० डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
* Akluj - 413101 *

# ऑनलाइन विद्यापीठासाठी अभ्यास समिती नियुक्त

## अहवाल सादरीकरणासाठी सहा महिन्यांची मुदत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोनामुळे शैक्षणिक क्षेत्र विस्कळीत झाल्याने राज्यात ऑनलाइन विद्यापीठाची स्थापना करण्याचा राज्य शासन विचार करत आहे. ऑनलाइन विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आर. के. शेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली असून ऑनलाइन विद्यापीठाअंतर्गत आवश्यक पायाभूत सुविधा अभ्यासक्रम, परीक्षा आणि निकाल, शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे निकष यांसह शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदी या संदर्भात अहवाल सादर करण्यासाठी समितीला सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

राज्यातील पारंपरिक सार्वजनिक विद्यापीठे आणि महाविद्यालये करोना काळात विविध संकेतस्थळे, उपयोजनांचा वापर करून ऑनलाइन शिक्षण देत आहेत. मात्र ज्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालय किंवा विद्यापीठात उपस्थित राहून शिकणे शक्य नाही त्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन विद्यापीठामुळे प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची गरज नाही. तसेच विद्यापीठ शुल्काव्यतिरिक्त निवास, प्रवास आदींसाठी खर्च करावा लागणार नाही. तसेच करोनासारख्या आपत्कालीन परिस्थितीत शैक्षणिक कामकाज विनाव्यत्यय सुरू ठेवता येऊ शकते. नव्या शैक्षणिक धोरणातही ऑनलाइन आणि डिजीटल शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून ऑनलाइन विद्यापीठाच्या स्थापनेसंदर्भात समिती स्थापन केली आहे.

डॉ. आर. के. शेवगावकर यांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये पुणे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष रमान प्रीत, वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रीसर्चचे संचालक आनंदराव दादास, पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट विभाग प्रमुख डॉ. मनीष गोडसे, अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठाचे अधिष्ठाता अंगप्पा गुनासेकरण, नागपूर आयआयएमचे संचालक भीमराय मेत्री, मुंबई विद्यापीठाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख श्रीवरमंगई रामानुजम, तंत्रशिक्षण संचालक यांचा समावेश आहे.



### समितीची कार्यकक्षा

- प्रगत देशांतील ऑनलाइन विद्यापीठांचा अभ्यास करून राज्यात यासंबंधी धोरण निश्चित करणे.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांच्या आधारे सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार ऑनलाइन विद्यापीठ स्थापन करता येईल किंवा नाही?
- नवीन शैक्षणिक धोरणाच्या तरतुदीतील घटकांचा विचार करून राज्यातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण कसे द्यावे?
- ऑनलाइन विद्यापीठासाठी आवश्यक पायाभूत साधनसामग्री, मनुष्यबळ, खर्च आदी तपशील देणे
- ऑनलाइन विद्यापीठातील शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या गुणवत्तेचे निकष, विद्यापीठातील अभ्यासक्रम, परीक्षा, परीक्षांचा निकाल, पदवी, शिक्षणाची वेळ, कालावधी, शुल्काबाबत शिफारस करणे.
- सध्याची पारंपरिक विद्यापीठे, मुक्त विद्यापीठे, त्यांचे कार्यक्षेत्र, अभ्यासक्रम, प्रात्यक्षिके आणि पदव्यांबाबत शिफारस करणे.
- ऑनलाइन विद्यापीठे स्थापन करण्याऐवजी राज्यातील अकृषी विद्यापीठांमार्फतच ऑनलाइन शिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे योग्य राहील किंवा कसे याबाबत शिफारस करणे.

पुण्य नगरी
SMART
शनिवार,१८ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# वेळापूर येथे श्री अर्धनारी नटेश्वर महाविद्यालयाच्या जागेची संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी केली पाहणी

अकलूज / प्रतिनिधी

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर महाविद्यालयास भेट देवून महाविद्यालयाच्या नवीन जागेची पाहणी केली.

वेळापूर येथील श्री महादेव देवालय देवस्थान ट्रस्टचे जागेत श्री अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय उभारणार आहे. हे महाविद्यालय तालुक्याच्या दक्षिण भागातील विद्यार्थ्यांची गरज ओळखून शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ संचालक व राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व मंडळाचे माजी अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी श्री महादेव देवालय देवस्थान ट्रस्टच्या जागेत महाविद्यालयासाठी अद्ययावत इमारत बांधण्याचा संकल्प केला आहे. त्या दृष्टीने या जागेची पाहणी मंडळाचे नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनीं केली.



याप्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अमरसिंह माने देशमुख व सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील विद्यालयाचे मुख्यध्यापक सुरेश साळुंखे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दत्तात्रय माने, विरकुमार दोशी, तुकाराम जगदाळे, आस्लम शेख, महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य दादा साठे, प्रा.बिटू मोलाणे-भोसले, प्रा.मनोज नांगरे, प्रा.अभिजीत घाडगे, प्रा.आशा गायकवाड, प्रा.उर्मिला कोडग, राजेंद्र बामने, रविंद्र साळुंखे इ. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. वेळापूर परिसरात महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे काम सुरू होत आहे त्याची पाहणी करून संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी काही मौलिक सूचनाही केल्या.

# जनमत सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

शनिवार १८ डिसेंबर २०२१


Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *



## संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची वेळापूर शाळेस सदिच्छा भेट

माळशिरस,दि. १७ (प्रतिनिधी) शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते–पाटील यांनी वेळापूर येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते–पाटील विद्यालयाला अचानक सदिच्छा भेट दिली.

शालेय कामकाज पाहून व स्वच्छ सुंदर परिसर पाहून समाधान व्यक्त केले.यावेळी केंद्र शासनाकडून मंजूर झालेल्या अटल टिंकरिंग लॅबची पाहणी केली. याप्रसंगी अर्धनारी नटेश्वर महाविद्यालयाचे सभापती अमरसिंह माने–देशमुख, मनोज रेळेकर,दत्तात्रय माने,तुकाराम जगदाळे,विरकुमार दोशी, अस्लम शेख,प्राचार्य दादासाहेब साठे,माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सुरेश साळुंखे,सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पुढारी
MY सोलापूर
मंगळवार, २१ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

संक्षिप्त



वेळापूर : येथील अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय जागेची पाहणी करताना संग्रामसिंह मोहिते-पाटील, अमरसिंह माने-देशमुख, वीरकुमार दोशी, दादा साठे आदी.

## संग्रामसिंह मोहिते-पाटील यांची वेळापूरच्या श्री अर्धनारी नटेश्वर महाविद्यालयास भेट

**वेळापूर :** शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय वेळापूरला सदिच्छा भेट दिली. यावेळी श्री महादेव देवालय देवस्थान ट्रस्टच्या जागेत श्री अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय उभारणार आहे. हे महाविद्यालय तालुक्याच्या दक्षिण भागातील विद्यार्थ्यांची गरज ओळखून शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ संचालक व राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील यांनी श्री महादेव देवालय देवस्थान ट्रस्टच्या जागेत महाविद्यालयासाठी अद्ययावत इमारत बांधण्याचा संकल्प केला आहे. त्यादृष्टीने या जागेची पाहणी मंडळाचे नूतन अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी केली. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अमरसिंह माने-देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दत्तात्रय माने, वीरकुमार दोशी, तुकाराम जगदाळे, अस्लम शेख, प्रभारी प्राचार्य दादासाहेब साठे, सुरेश साळुंखे, प्रा. बिटू मोलाणे-भोसले, प्रा. मनोज नांगरे, प्रा. अभिजित घाडगे, प्रा. आशा गायकवाड, प्रा. ऊर्मिला कोडग, राजेंद्र बामने, रवींद्र साळुंखे, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

जनसत्य

मंगळवार, दि. २१ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# सोलापूर विद्यापीठ यांच्यावतीने कबड्डी निवड चाचणी

जनसत्य प्रतिनिधी

अकलूज : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या वतीने सहकार महर्षि शंकरराव मोहिते - पाटील इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँण्ड रिसर्च,शंकरनगर अकलूज या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये आंतरमहाविद्यालयीन कबड्डी निवड चाचणी दि.१७ व १८ डिसेंबर २०२१ रोजी घेण्यात आली.दि. १७/१२/२०२१ रोजी आंतरमहाविद्यालयीन कबड्डीची मुलांची निवड चाचणी घेण्यात आली.तसेच आज आंतर महाविद्यालयीन मुलींची कबड्डी निवड चाचणी घेण्यात आली.सदर निवड



चाचणीसाठी प्रा.अरविंद वाघमोडे चेअरमन',कबड्डी स्पोर्टस् कौन्सिल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,सोलापूर विद्यापीठ, सोलापूर,डॉ.विजय पवार,प्रा.बी.जी. जाधव प्रा.एम.बी ढेंबरे, प्रा.कल्पना बागूल,प्राचार्य डॉ.इंद्रजीत यादव व प्रा.ए.ए.जाधव स्पोर्टस् इन्चार्ज, सहकार महर्षि शंकरराव मोहिते - पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी अँण्ड रिसर्च , शंकरनगर- अकलूज इत्यादी उपस्थित होते .

आंतर महाविद्यालयीन मुलांच्या कबड्डी निवड चाचणीसाठी शंकरराव मोहिते महाविद्यालय माळेवाडी, कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी , सहकार महर्षि शंकरराव मोहिते महाविद्यालय नातेपुते,देशभक्त गरड कॉलेज मोहोळ,संगमेश्वर कॉलेज सोलापूर,श्री संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा, एस.एम. महाविद्यालय सांगोला,आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेज,माढा इत्यादी महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. तसेच आंतर महाविद्यालयीन मुलींच्या कबड्डी निवड चाचणीसाठी संगमेश्वर कॉलेज सोलापूर , यशवंतराव चव्हाण महाविद्यालय.करमाळा,सांगोला कॉलेज सांगोला, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय सोलापूर इत्यादी महाविद्यालयातील विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

पुण्य नगरी
पुणे-सोलापूर गुरुवार, २३ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# शंकरराव मोहिते महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी बेमुदत संपावर

अकलूज / प्रतिनिधी

अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी बुधवार पासून बेमुदत संपावर गेल्यामुळे महाविद्यालयाचे कार्यालयीन कामकाज ठप्प झाले आहे.

महाराष्ट्र महाविद्यालय व विद्यापीठीय सेवक संयुक्त कृती समिती यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकेतरांच्या शासनाकडील प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभर पुकारण्यात आलेल्या संपामध्ये अकलूजमधील शंकरराव मोहिते महाविद्यालय येथील शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले आहेत. यामध्ये महाविद्यालय शिक्षकेतर महासंघ आयटक संलग्न विद्यापीठ व संलग्न महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटना, सोलापूर विद्यापीठ शिक्षकेतर संघटना सहभागी झाल्या आहेत.



आश्वसित प्रगती योजनेचे रद्द झालेला जीआर पुर्नजिवीत करावेत, दहा, वीस, तीस वर्ष लाभाची आश्वसित प्रगती योजना, ७८६ विद्यापीठ कर्मचारी पदांना ७ वा वेतन आयोग, ५८ महिन्यांचा फरक, पाच दिवसाचा आठवडा, रिक्त झालेली पदे त्वरीत भरावीत व इतर मागण्या संपामध्ये करण्यात आल्या असल्याचे संघटनेचे अध्यक्ष भारत जाधव, उपाध्यक्ष उदयसिंह माने देशमुख, सचिव सुनिता काटे यांनी सांगितले. आमच्या मागण्या जो पर्यंत मान्य होत नाही तो महाविद्यालयाचे कामकाज बंद ठेवून बेमुदत संप चालूच ठेवणार आहे, असे कर्मचाऱ्यांनी सांगितले.

जनमत
सर्वसामान्यांचे
संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे
गुरूवार २३ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी विविध मागण्यांसाठी आजपासून बेमुदत संपावर



संग्रामनगर दि.२२ (प्रतिनिधी)– अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा-यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आजपासून बेमुदत संपावर गेल्यामुळे महाविद्यालयाचे कार्यालयीन कामकाज आज ठप्प झाले आहे.

महाराष्ट्र महाविद्यालय व विद्यापीठीय सेवक संयुक्त कृती समिती यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकेतरांच्या शासनाकडील प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभर पुकारण्यात आलेल्या संपामध्ये अकलूजमधील शंकरराव मोहिते महाविद्यालय येथील शिक्षकेतर कर्मचारी आजपासून बेमुदत संप गेले आहेत.

यामध्ये महाविद्यालय शिक्षकेतर महासंघ आयटक संलग्न विद्यापीठ व संलग्न महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटना,सोलापूर विद्यापीठ शिक्षकेतर संघटना सहभागी झाल्या आहेत.

आश्वसित प्रगती योजनेचे रद्द झालेला जीआर पुर्नजिवीत करावेत,दहा,वीस,तीस वर्ष लाभाची आश्वसित प्रगती योजना,७८६ विद्यापीठ कर्मचारी पदांना ७ वा वेतन आयोग,५८ महिन्यांचा फरक,पाच दिवसाचा आंठवडा,रिक्त झालेली पदे त्वरीत भरावीत व इतर मागण्या संपामध्ये करण्यात आल्या असल्याचे संघटनेचे अध्यक्ष भारत जाधव,उपाध्यक्ष उदयसिंह माने देशमुख,सचिव सौ.सुनिता काटे सांगीतले आहे.आमच्या मागण्या जो पर्यंत मान्य होत नाही तो महाविद्यालयाचे कामकाज बंद ठेवून. बेमुदत संप चालूच ठेवणार आहे.असे कर्मचा-यांनी सांगितले.

सुराज्य सोलापूर

शुक्रवार, दि.२४ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library



# शंकरराव मोहिते महाविद्यालयात कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळा

✓ **सुराज्य/अकलूज :** शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना, विभाग व अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महिला कायदेविषयक मार्गदर्शन (कार्यशाळा) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून अकलूज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अरुण सुगांवकर व रमेश सुरवसे-पाटील हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बागडे डी. एस. हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते अरुण सुगांवकर यांनी महिला विषयक असणारे सायबर गुन्हे तसेच कायद्याविषयी माहिती दिली. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता सातपुते यांनी केले आभार प्रा.कोकाटे डी.ए. यांनी मानले. सूत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजनेचा, माजी विद्यार्थी किरण भांगे यांनी केले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.लोंढे, सी.बी.अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख प्रा. दमयंती कांबळे, डॉ. सुधा बनसोडे, प्रा. स्मिता पाटील उपस्थित होते.

जनमत सर्वसामान्यांचे
शुक्रवार, २४ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न




संग्रामनगर दि.२३ (प्रतिनिधी)- शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आज महिला कायदे विषयक मार्गदर्शन (कार्यशाळा) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून अकलूज पोलीस स्टेशनचे अरुण सुगावकर व रमेश सुरवसे -पाटील हे उपस्थित होते.तर कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एस. बागडे उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते अरुण सुगावकर यांनी महिला विषयक असणारे सायबर गुन्हे तसेच कायद्याविषयी माहिती दिली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे विषयक माहिती देऊन प्रत्येकाने कायद्याचे पालन करावे यासाठी आवाहन केले. तसेच पोलिस स्टेशनच्या माध्यमातून ग्रामसुरक्षा दल, ग्रामसुरक्षा यंत्रणा, ऑपरेशन परिवर्तन, विशाखा समिती ,पोस्को कायदा इत्यादी विषयी माहिती दिली. तर रमेश सुरवसे पाटील यांनी सायबर गुन्ह्यांमध्ये मोबाईल फसबूक व्हाट्सअप यावरून मोठ्या प्रमाणात छेडछाड केली केली जाते .यासाठी विविध माध्यमे वापरताना चांगल्या कारणासाठी व ज्ञानासाठी त्याचा उपयोग करावा त्याचा गैरवापर करू नका. त्याचा वापर आपल्या ज्ञानवृद्धी साठी करा असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. डी.एस. बागडे यांनी महाविद्यालयातील मुलींच्या सुरक्षिततेबद्दल माहिती दिली व महाविद्यालयातील मुलींच्या सेवा सुविधा बद्दल माहिती दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सौ.सविता सातपुते यांनी केले आभार प्रा.डी.ए.कोकाटे यांनी मानले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजनेचा, माजी विद्यार्थी किरण भांगे यांनी केले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सी.बी.लोंढे अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख प्रा. दमयंती कांबळे,डॉ. सुधा बनसोडे, प्रा. स्मिता पाटील,तसेच महाविद्यालयातील व राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसत्य

सोमवार, दि. २७ डिसेंबर २०२१

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळा

**अकलूज :** शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आज महिला कायदे विषयक मार्गदर्शन (कार्यशाळा) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून अकलूज पोलीस स्टेशनचे अरुण सुगावकर व रमेश सुरवसे -पाटील हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एस. बागडे उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते अरुण सुगावकर यांनी महिला विषयक असणारे सायबर गुन्हे तसेच कायद्याविषयी माहिती दिली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे विषयक माहिती देऊन प्रत्येकाने कायद्याचे पालन करावे यासाठी आवाहन केले. तसेच पोलिस स्टेशनच्या माध्यमातून ग्रामसुरक्षा दल, ग्रामसुरक्षा यंत्रणा, ऑपरेशन परिवर्तन, विशाखा समिती, पोस्को कायदा इत्यादी विषयी माहिती दिली. तर रमेश सुरवसे पाटील यांनी सायबर गुन्ह्यांमध्ये मोबाईल फेसबूक व्हाट्सअप यावरून मोठ्या प्रमाणात छेडछाड केली केली जाते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.डी.एस. बागडे यांनी महाविद्यालयातील मुलींच्या सुरक्षिततेबद्दल माहिती दिली व महाविद्यालयातील मुलींच्या सेवा सुविधा बद्दल माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता सातपुते यांनी केले आभार प्रा.डी.ए. कोकाटे यांनी मानले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजनेचा, माजी विद्यार्थी किरण भांगे यांनी केले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सी.बी. लोंढे अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख प्रा. दमयंती कांबळे, डॉ.सुधा बनसोडे, प्रा. स्मिता पाटील, तसेच महाविद्यालयातील व राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर

मंगळवार, दि. २८ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# अकलूज येथे वेटलिफ्टिंग संघ निवड चाचणी शिबिर

✔ सुराज्य/अकलूज

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर आंतर महाविद्यालयीन वेटलिफ्टिंग (मुली) संघ निवड चाचणी संपन्न झाली. याचे आयोजन अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाने केले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन विद्यापीठ निवड समितीचे चेअरमन डि.के. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डी.एस. बागडे हे उपस्थित होते.

यावेळी पात्रता समितीचे प्रा.एम्.बी. ढेंबरे, पंच प्रा.यु.एम. भिंगे, प्रा.आर.एस. लोंढे, डॉ.जगदीश झाडबुके, प्रा.एस.



व्ही.मोरे, प्रा.शेषराज याडगे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा संचालक प्रा.ए.पी.वायमोडे यांनी केले तर आभार बी.एस. भोसले यांनी मानले तर सूत्रसंचालन स्पर्धा सचिव प्रा.डी.एस.कोकाटे यांनी केले.

जनसत्य

बुधवार, दि. २९ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# आपला माणूस : संग्रामसिंह मोहिते पाटील

श्रेष्ठ अभिव्यक्ती म्हणून काही असते का ? असतेच असते. विचार ही सर्वश्रेष्ठ अभिव्यक्ती आहे पण नुसते विचार नव्हे तर विचार आणि त्यापाठोपाठ विचारानुकूल कृती ही श्रेष्ठ अभिव्यक्ती असते. आणि ही कृती विचारानुकूल कार्य आणि त्या कृती कार्यातील सातत्य ही सर्वश्रेष्ठ अभिव्यक्ती म्हणावी लागते. श्री संग्रामसिंह मोहिते पाटील आपल्या सर्वांचे आण्णासाहेब हे विचार आणि कृती या दोन्ही माध्यमातून व्यक्त होणारे बहुपरिचीत व्यक्तीमत्व. जनतेच्या जीवनात सुखाचे, दुःखाचे, अपयशाचे, आशेचे, निराशेचे असे अनेक प्रसंग येतात पण विचारांचा भक्कम पाया असणारी माणसं कुठल्याही प्रसंगी आपल्या माणसाच्या मागे ठामपणे उभी राहतात. अशा माणसात प्रथम स्थान कुनाचे तर आण्णासाहेबांचे. स्वतः मात्र प्रसिध्दीपासून दूर राहून माळशिरस तालुक्यातील गरजूंना वेगवेगळ्या पध्दतीने निःस्वार्थपणे आजही गाजावाजा न करता मदत करत असतात.

सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते, माळावरच्या नंदनवनाचे स्वप्न अस्तित्वात उतरवणारे, ग्रामीण भागाचा विकास व कल्याणाचा ध्यास घेणारे, सहकाराचा महामेरू स.म. शंकरराव मोहिते पाटील, महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा.श्री. विजयसिंह मोहिते पाटील व शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.श्री. जयसिंह मोहिते पाटील अशा या तत्वनिष्ठ, गुणांनी, विचारांनी, समाजाला प्रेरणा देणारे, कार्याने अतिशय उंची गाठलेल्या लोकांचे संस्कार, वारसा लाभलेले व त्यांच्या कामातून घडत गेलेले आण्णासाहेब यानी आपल्या सामाजिक व राजकीय कारकिर्दीत २००५ पासून



आशिया खंडातील सर्वात मोठी असलेली अकलूज ग्राम पंचायतीत सदस्य, उपसरपंच आणि सरपंच पद भूषवून अकलूजच्या विकासाला गती देऊन अकलूजचा चेहरामोहराच बदलून टाकला.

स्वतः चे घर असावे प्रत्येकाचे स्वप्न असते. अकलूजमधील गरीब, कष्टकरी, कामगारांचे हे स्वप्न घरकुलांच्या माध्यमातून आण्णासाहेबांनी पूर्ण केले. विकासनगर झोपडपट्टीत लाईट, पाणी व रस्ता या सुविधा दिल्या. गावातील लोकांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी घरपोच म्हणजे वॉटरसप्लाय सुरू केली. सिमेंट रस्ते, भव्य अशी ग्रामपंचायत इमारत उभी केली. तसेच मध्यमवर्गातील लोकांना व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गाळे बांधून दिले. शिवसृष्टी उद्घाटन सोहळा, गौरव मराठी मातीचा, गौरव भारतीय लोककलेचा, प्रजासत्ताक दिन अशा वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमात आपले मोलाचे योगदान. तसेच ग्रामीण भागातील मुलांना खेळाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळावे म्हणून अद्ययावत इंडोर स्टेडियम उभारले.

कोरोना काळात निसर्गालाच माणूस नकोसा झाला असं वाटत होतं. कुटुंबातील कितीजण मृत्यू पावले व किती राहिले काहिच कळू दिले नाही. पेशंटला बेड मिळत नव्हते, औषधे, उपचार मिळत नव्हते. अशा परिस्थितीत अनेक लोकांना आण्णासाहेबांनी मदत केली. पै पै जोडून उभा केलेला संसार अचानक एका रात्रीत महापूराने विसकटू टाकलेल्या कुटुंबातील लोकांना आधार देऊन जिवनावश्यक वस्तूंची मदत केली. माणसांच्या या गर्दीत अनेक चेहरे भेटतात. काही चांगले, काही वाईट काही कधीच लक्षात न राहणारे आणि काही कायमचे मनात घर करणारे. त्यातीलच आपण, कायम आठवणीत सर्वांच्या राहणारे, काम करणारे...... म्हणूनच, या वाढदिवसानिमित्त तुम्हाला आमच्या सर्वांकडून आपुलकीच्या शुभेच्छा !

-प्रा. तात्यासाहेब शिवाजी काटकर ९२२६१४४८३६

पुण्य नगरी SMART
बुधवार,२९ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj - 413101

# अर्धनारी नटेश्वर महाविद्यालयामुळे विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय : मोहिते-पाटील

**अकलूज / प्रतिनिधी**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील, सूर्यकांतदादा माने देशमुख यांचे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून प्रयत्न होते. ते प्रयत्न आता साकार झाले असून येत्या वर्षभरात या महाविद्यालयाचे बांधकाम पूर्ण होईल, असा विश्वास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

शिक्षण प्रसारक मंडळाच्या वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर महाविद्यालयाच्या नविन शैक्षणीक संकुलाचा भूमीपूजन समारंभ मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या शिक्षण संकुलाचे काम हाती घेण्यात आले आहे. वेळापूरातील अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय व सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील कनिष्ठ महाविद्यालयासाठी हे नवीन शैक्षणीक संकुल निर्माण होत आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सह. साखर कारखान्याचे संचालक शंकरराव माने-देशमुख हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचा सत्कार अमरसिंह माने-देशमुख यांनी केला. अर्धनारी नटेश्वर महाविद्यालयाचे सभापती अमरसिंह माने-देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले.



या सोहळ्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सभापती सतिशराव माने-देशमुख, महादेव देवालय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आनंदराव माने देशमुख, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक सुभाष दळवी, वसंत जाधव, रामचंद्र गायकवाड, महादेव देवालय देवस्थानचे विश्वस्त पांडुरंग भाऊ माने देशमुख, वेळापूर विकास सोसायटीचे व्हा. चेअरमन महादेव ताटे, माजी सरपंच हनुमंत साळुखे, शंकर काकुळे, दत्तात्रय माने, विरकुमार दोशी, डॉ. हनुमंत आवताडे, अशोक साबळे, चंद्रकांत आडत, तुकाराम जगदाळे, अमोल व्होरा, चंद्रकांत क्षीरसागर, रणजित माने देशमुख, अस्लम शेख, शंकर माने, मुख्याध्यापक सुरेश साळुंखे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा.रविंद्र माने तर सुत्रसंचालन प्रा. आशा गायकवाड यांनी केले.

सुराज्य सोलापूर
बुधवार, दि.२९ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# अर्धनारीनटेश्वर महाविद्यालयामुळे उच्च शिक्षणाची सोय : मोहिते-पाटील

✓ सुराज्य/वेळापूर

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील, सूर्यकांतदादा माने देशमुख यांचे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून प्रयत्न होते. ते प्रयत्न आता साकार झाले असून येत्या वर्षभरात या महाविद्यालयाचे बांधकाम पूर्ण होईल, असा विश्वास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

शिक्षण प्रसारक मंडळाच्या वेळापूर येथील अर्धनारीनटेश्वर महाविद्यालयाच्या नवीन शैक्षणिक संकुलाचा भूमिपूजन समारंभ मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या शिक्षण संकुलाचे काम हाती घेण्यात आले आहे. वेळापूरातील अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय व सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालयासाठी हे नवीन शैक्षणिक संकुल निर्माण होत आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सह. साखर कारखान्याचे संचालक शंकरराव माने-देशमुख हे होते.

अर्धनारीनटेश्वर महाविद्यालयाचे सभापती अमरसिंह माने-देशमुख म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणासाठीची संख्या दिवसेंदिवस



वाढत आहे. या विद्यार्थ्यांना अद्यावत शैक्षणिक संकुल असावे असा मानस होता. त्यादृष्टीने विजयदादा व बाळदादा यांच्या मार्गदर्शनाखाली अद्यावत शैक्षणिक संकुलाचे भूमिपूजन करण्यात आले आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे संग्रामसिह मोहिते पाटील यांचा सत्कार अमरसिंह माने-देशमुख यांनी केला.

या सोहळ्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सभापती सतिशराव माने-देशमुख, महादेव देवालय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आनंदराव माने देशमुख, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक सुभाष दळवी, वसंत जाधव, रामचंद्र गायकवाड, महादेव देवालय देवस्थानचे विश्वस्त पांडुरंग भाऊ माने देशमुख, वेळापूर विकास सोसायटीचे व्हा. चेअरमन महादेवभाऊ ताटे, माजी सरपंच हनुमंत साळुखे, भाजप ओबीसी सेल ता. अध्यक्ष शंकर काकुळे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दत्तात्रय माने, विरकुमार दोशी, डॉ. हनुमंत आवताडे, अशोक साबळे, चंद्रकांत आडत, तुकाराम जगदाळे, अमोल व्होरा, चंद्रकांत क्षीरसागर, रणजीत माने देशमुख, अस्लम शेख, शंकर माने, मुख्याध्यापक सुरेश साळुंखे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रवींद्र माने यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. आशा गायकवाड यांनी केले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj - 413101



# आपलं माणूस : संग्रामसिंह मोहिते पाटील



श्रेष्ठ अभिव्यक्ती म्हणून काही असते का ? असतेच असते. विचार ही सर्वश्रेष्ठ अभिव्यक्ती आहे पण नुसते विचार नव्हे तर विचार आणि त्यापाठोपाठ विचारानुकूल कृती ही श्रेष्ठ अभिव्यक्ती असते. आणि ही कृती विचारानुकूल कार्य आणि त्या कृती कार्यातील सातत्य ही सर्वश्रेष्ठ अभिव्यक्ती म्हणावी लागते. श्री संग्रामसिंह मोहिते पाटील आपल्या सर्वांचे आण्णासाहेब हे विचार आणि कृती या दोन्ही माध्यमातून व्यक्त होणारे बहुपरिचीत व्यक्तीमत्व. जनतेच्या जीवनात सुखाचे, दुःखाचे, अपयशाचे, आशेचे, निराशेचे असे अनेक प्रसंग येतात पण विचारांचा भक्कम पाया असणारी माणसं कुठल्याही प्रसंगी आपल्या माणसाच्या मागे ठामपणे उभी राहतात. अशा माणसात प्रथम स्थान कुनाचे तर आण्णासाहेबांचे. स्वतः मात्र प्रसिध्दीपासून दूर राहून माळशिरस तालुक्यातील गरजूंना वेगवेगळ्या पध्दतीने निःस्वार्थपणे आजही गाजावाजा न करता मदत करत असतात.

सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते, मळावरच्या नंदनवनाचे स्वप्न अस्तित्वात उतरवणारे, ग्रामीण भागाचा विकास व कल्याणाचा ध्यास घेणारे, सहकाराचा महामेरू स.म. शंकरराव मोहिते पाटील, महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा.श्री. विजयसिंह मोहिते पाटील व शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.श्री. जयसिंह मोहिते पाटील अशा या तत्वनिष्ठ, गुणांनी, विचारांनी, समाजाला प्रेरणा देणारे, कायनि अतिशय उंची गाठलेल्या लोकांचे संस्कार, वारसा लाभलेले व त्यांच्या कामातून घडत गेलेले आण्णासाहेब यानी आपल्या सामाजिक व राजकीय कारकिर्दीत २००५ पासून आशिया खंडातील सर्वात मोठी असलेली अकलूज ग्रामपंचायतीत सदस्य, उपसरपंच आणि सरपंच पद भूषवून अकलूजच्या विकासाला गती देऊन अकलूजचा चेहरामोहराच बदलून टाकला.

स्वतः चे घर असावे प्रत्येकाचे स्वप्न असते. अकलूजमधील गरीब, कष्टकरी, कामगारांचे हे स्वप्न घरकुलांच्या माध्यमातून आण्णासाहेबांनी पूर्ण केले. विकासनगर झोपडपट्टीत लाईट, पाणी व रस्ता या सुविधा दिल्या. गावातील लोकांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी घरपोच म्हणजे वॉटरसप्लाय सुरू केली. सिमेंट रस्ते, भव्य अशी ग्रामपंचायत इमारत उभी केली. तसेच मध्यमवर्गातील लोकांना व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गाळे बांधून दिले. शिवसृष्टी उद्घाटन सोहळा, गौरव मराठी मातीचा, गौरव भारतीय लोककलेचा, प्रजासत्ताक दिन अशा वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमात आपले मोलाचे योगदान. तसेच ग्रामीण भागातील मुलांना खेळाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळावे म्हणून अद्ययावत इंडोर स्टेडियम उभारले.

इनोव्हेशन आणि इन्व्हेन्शन दोन्हीही गोष्टी विद्यार्थ्यांना मारूनमुटकून शिकवून जमत नसतात. त्या चौकसबुद्धी, चुणचुणीतपणा आणि मेहनतीचा परिपाक असतात. प्रश्न शोधण्याची नजर आणि उत्तर शोधण्याची चिकाटी ओळखून केंद्र सरकारच्या मदतीने तीन विद्यालयात अटल टिंकरिंग लॅबोरेटरीज' (ATL) सुरू केल्या. शालेय विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मितीची संस्कृती (इनोव्हेशन) बिंबवणे हा त्यांचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच शारिरीक विकास व्हावा यासाठी आपले प्रयत्न दिसतात. ६३९० खेळाडूंना सहभागी करून पारंपरिक खेळ लेझीम भव्यदिव्य प्रदर्शन केले. ग्रीनीज वर्ल्ड बुकमध्ये त्याची नोंद झाली.

आपली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली आणि सर्वात जास्त आनंद माळशिरस तालुक्यातील सामान्य जनता व शिक्षक शिक्षकेतर सेवकांना झाला. सामाजिक बांधिलकी जंपत मित्रमंळाच्या सहाय्याने २००३ पासून सलग सतरा वर्षे रक्तदान शिबिर आयोजित करून हजारो लोकांना संजीवणी दिली. ४५ हजार पेक्षा जास्त खेळाडूंना लेझीम चे प्रशिक्षण दिले. तसेच वृक्षारोपण, ग्राम स्वच्छता अभियान, अस्थिरोग व दंतरोग तपासणी उपचार, अवयवदान नोंदणी शिबीर, व्यसनमुक्ती शिबीरे आयोजित केली. तसेच लेझीम, बॅडमिंटन, बुद्धिबळ, लेदर व टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा, कबड्डी खुला गट, बालक्रीडा अशा अनेक खेळांचे राज्यस्तरीय स्पर्धांचे यशस्वीपणे आयोजन, नियोजन केले.

कोरोना काळात निसर्गालाच माणूस नकोसा झाला असं वाटत होतं. कुटुंबातील कितीजण मृत्यू पावले व किती राहिले काहिच कळू दिले नाही. पेशंटला बेड मिळत नव्हते, औषधे, उपचार मिळत नव्हते. अशा परिस्थितीत अनेक लोकांना आण्णासाहेबांनी मदत केली. पै पै जोडून उभा केलेला संसार अचानक एका रात्रीत महापूराने विसकटू टाकलेल्या कुटुंबातील लोकांना आधार देऊन जिवनावश्यक वस्तूंची मदत केली. माणसांच्या या गर्दीत अनेक चेहरे भेटतात. काही चांगले, काही वाईट काही कधीच लक्षात न राहणारे आणि काही कायमचे मनात घर करणारे. त्यातीलच आपण, कायम आठवणीत सर्वांच्या राहणारे, काम करणारे...... म्हणूनच, या वाढदिवसानिमित्त तुम्हाला आमच्या सर्वांकडून आपुलकीच्या शुभेच्छा !

**प्रा. तात्यासाहेब शिवाजी काटकर, मो.९२२६१४४८३६**
**(क.बा.पा विद्यालय व ज्यु कॉलेज सदाशिवनगर)**

जनसत्य
गुरुवार, दि. ३० डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# महाविद्यालयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय

जनसत्य प्रतिनिधी

**वेळापूर :** सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील, सूर्यकांतदादा माने देशमुख यांचे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून प्रयत्न होते. ते प्रयत्न आता साकार झाले असून येत्या वर्षभरात या महाविद्यालयाचे बांधकाम पूर्ण होइल असा विश्वास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

शिक्षण प्रसारक मंडळाच्या वेळापूर येथील अर्धनारीनटेश्वर महाविद्यालयाच्या नविन शैक्षणीक संकुलाचा भूमीपुजन समारंभ मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या शिक्षण संकुलाचे काम हाती घेण्यात आले आहे.

या सोहळ्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचीव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सभापती सतिशराव माने-देशमुख, महादेव देवालय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आनंदराव माने देशमुख, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक सुभाष दळवी, वसंत जाधव, रामचंद्र गायकवाड , महादेव देवालय देवस्थानचे विश्वस्त पांडुरंग भाऊ माने देशमुख, वेळापूर विकास सोसायटीचे व्हा. चेअरमन महादेव ताटे, हनुमंत साळुखे, शंकर कांकुळे, दत्तात्रय माने, विरकुमार दोशी, डॉ. हनुमंत आवताडे, अशोक साबळे, चंद्रकांत आडत, तुकाराम जगदाळे , अमोल व्होरा, चंद्रकांत क्षीरसागर, रणजित माने देशमुख अस्लम शेख, शंकर माने, मुख्याध्यापक सुरेश साळुंखे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थीत होता.

पुढारी
MY सोलापूर
गुरुवार, ३० डिसेंबर २०२१

# 'अर्धनारीनटेश्वर'मुळे उच्च शिक्षणाची सोय : संग्रामसिंह मोहिते-पाटील



वेळापूर : येथे अर्धनारीनटश्वर महाविद्यालयाच्या शिक्षण संकुलाचे भूमिपूजन करताना संग्रामसिह मोहिते-पाटील, अभिजित रणवरे, हर्षवर्धन खराडे, सतीश माने-देशमुख, अमरसिंह माने-देशमुख आदी.

**वेळापूर : पुढारी वृत्तसेवा**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील, सूर्यकांतदादा माने- देशमुख यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी, म्हणून प्रयत्न केले. ते प्रयत्न आता साकार झाले असून येत्या वर्षभरात या महाविद्यालयाचे बांधकाम पूर्ण होईल, असा विश्वास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केला.

शिक्षण प्रसारक मंडळाच्या वेळापूर येथील अर्धनारीनटेश्वर महाविद्यालयाच्या नवीन शैक्षणिक संकुलाचा भूमिपूजन समारंभ मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाला. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखालीयाशिक्षणसंकुलाचेकाम हाती घेण्यात आले आहे. वेळापुरातील अर्धनारीनटेश्वर महाविद्यालय व सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील कनिष्ठ महाविद्यालयासाठी हे नवीन शैक्षणिक संकुल निर्माण होत आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सह. साखर कारखान्याचे संचालक शंकरराव माने-देशमुख हे होते.

यावेळी बोलताना अर्धनारीनटेश्वर महाविद्यालयाचे सभापती अमरसिंह माने-देशमुख म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणासाठीची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या विद्यार्थ्यांना अद्ययावत शैक्षणिक संकुल असावे असा मानस होता. त्यादृष्टीने विजयदादा व बाळदादा यांच्या मार्गदर्शनाखाली अद्ययावत शैक्षणिक संकुलाचे भूमिपूजन करण्यात आले आहे.

यावेळी सहकार महर्षी संचालक शंकरराव माने-देशमुख, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सभापती सतीशराव माने-देशमुख, सोसायटी चेअरमन अमरसिंह माने-देशमुख, महादेव देवालय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख, बाजार समिती संचालक आनंद माने-देशमुख, धनंजय माने-देशमुख, संचालक सुभाष दळवी, वसंत जाधव, रामचंद्र गायकवाड, विश्वस्त पांडुरंगभाऊ माने-देशमुख, व्यापारी वीरकुमार दोशी, महादेव ताटे, शंकर काकुळे, सदस्य दत्तात्रय माने, हणमंत साळुंखे, हनुमंत आवताडे, अशोक साबळे, चंद्रकांत आडत, तुकाराम जगदाळे, अमोल व्होरा, चंद्रकांत क्षीरसागर, रणजित माने देशमुख, अस्लम शेख, शंकर माने, मुख्याध्यापक साळुंखे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रवींद्र माने यांनी व सूत्रसंचालन प्रा. आशा गायकवाड यांनी केले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

जनमत सर्वसामान्यांचे
रविवार, २६ डिसेंबर २०२१

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्त महिलांसाठी मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन



अकलूज, दि.२५ (प्रतिनिधी)- शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अकलूज येथील शिवनिर्णय संघटना व शेटे मॅटरनिटी होम यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत हिमग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवनिर्णय संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उत्कर्ष शेटे यांनी दिली. ते पुढे बोलताना म्हणाले कि, स्त्रीच शारीरिक आरोग्य आणि मानसिक आरोग्य उत्तम असेल तरच कुटूंबाचा पर्यायाने समाजाचा खऱ्या अर्थाने विकास होईल. धावपळीच्या जीवनात महिलांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. स्त्रीच शारीरिक आरोग्य जपण्यासाठी सर्वात महत्वाचे शरीरातील रक्ताचं योग्य प्रमाण असणं हे होय.

याकरिता मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, मोफत औषधउपचार करण्यात येणार आहेत. सदर शिबीर रविवारी दि.२६डिसेंबर २०२१रोजी सकाळी १०-३०वाजता डॉक्टर विनोद शेटे यांच्या शुभहस्ते अकलूज येथील चांगोजीराव देशमुख सभागृह, अकलूज नगरपरिषद, विठ्ठल चौक अकलूज येथे आयोजित करण्यात आले असून, या शिबिरासाठी डॉक्टर वैष्णवी शेटे, महादेव पाटील, संदीप नरुळे, आकाश कापसे, उमेश गुळवे, प्रथमेश उरवणे, जालिंदर लिगाडे, देविदास राजमाने आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अकलूज आणि परिसरातील महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा. असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

जनमत सर्वसामान्यांचे

शुक्रवार, ०७ जानेवारी २०२२

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात माझी वसुंधरा व पत्रकार दिन कार्यक्रमाचे आयोजन

संग्रामनगर दि.६ (प्रतिनिधी)– शंकरराव मोहिते महाविद्यालयात माझी वसुंधरा व पत्रकार दिन साजरा करण्यात आला. पर्यावरण अभ्यास विभाग अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माजी वसुंधरा अभियानांतर्गत श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालय अकलूज येथील प्रा. अमित घाडगे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे हे उपस्थित होते. प्रमुख व्याख्यात्यांनी आपल्या भाषणात माझी वसुंधरा या विषयावर वेगळ्या प्रकारची उदाहरणे देऊन पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने या अभियानाची सुरुवात आपल्या घरापासून करावी.कारण हे परिवर्तन फक्त विद्यार्थीच करू शकतात. त्यामुळे अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याचे काम केले जात आहे. प्राचीन आणि जुन्या झाडांचे जतन करा त्यांना मित्र बनवा व त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले. अध्यक्षीय मनोगतात डॉ.डी.एस.बागडे यांनी वृक्षतोडीमुळे निर्माण झालेल्या समस्या,पाणीटंचाई इत्यादी विषयी माहिती देऊन पर्यावरणाचे रक्षण करणे आणि वसुंधरा वाचवणे हे प्रत्येकाचे आद्यकर्तव्य आहे.त्यादृष्टीने विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत. त्याचबरोबर आपल्या आसपासच्या भागात व परसबागेत वेगवेगळी फळे व पालेभाज्या,यांची लागवड करून त्याचे जतन करण्याचे आव्हान केले. त्याच बरोबर आज पत्रकार दिनाचे औचित्य साधून माळशिरस तालुक्यातील सर्व दैनिकांचे,मासिकांचे पाक्षीकांचे ,साप्ताहिकांचे पत्रकार, रिपोर्टर विविध वृत्तवाहिन्यांचे संपादक यांना आमंत्रित करून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार भाग्यवंत नायकुडे व चंद्रकांत कुंभार यांनी आपली मनोगते व्यक्त केली .या कार्यक्रमाच्या वेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापुर व डापकु कार्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने



आयोजित करण्यात आलेल्या शॉर्टफिल्म स्पर्धेत प्रथम क्रमांक नागनाथ संपत साळवे, द्वितीय क्रमांक वैभव सुनील गुजर व तृतीय क्रमांक प्रशांत शिवाजी वाघमारे या विद्यार्थ्यांचा सत्कार ज्येष्ठ पत्रकार व, महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व प्रास्ताविक पर्यावरण विषयाचे प्रा.बाळासाहेब साळुंखे यांनी केले. तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सी.बी.लोंढे यांनी मानले.या कार्यक्रमासाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. हनुमंत आवताडे,वनस्पती शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.राम लिंग सावळजकर,तर्कशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.बाळासाहेब मुळीक डॉ. चंद्रशेखर ताटे,डॉ.सविता सातपुते प्रा.दादासाहेब कोकाटे,कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे,भारत लावंड व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनमत

मंगळवार ११ जानेवारी २०२२

# सयाजीराजे पार्कमध्ये 'फ्लायकॅचर्स' पक्ष्यांची मांदियाळी!



टिकेलचा निलिमा · पिवळी लिटकुरी · तांबुला · नीलांग · स्वर्गीय नर्तक

अकलूज, दि.१०(प्रतिनिधी)-हिमालयाच्या कुशीत तसेच भूतान, तिबेट, बांगलादेश व ईशान्येकडील राज्यांमधील घनदाट झाडींचे साक्षीदार म्हणून ओळखले जाणारे व माशांना कर्दनकाळ ठरणारे रंगीबेरंगी अनेक मनमोहक पक्ष्यांनी, येथील सयाजीराजे पार्क मध्ये येऊन गर्दी केली आहे. फ्लायकॅचर्स या सामान्य नावाने ओळखत असलेले नीलांग, टिकेलचा निलिमा, तांबुला, पिवळी लिटकुरी हा इवलेसा रंगीत पक्षी याठिकाणी प्रथमच आढळून आले आहेत. या फ्लायकॅचर पक्ष्याबरोबर थिरथिरा पक्षी व स्वर्गीय नर्तक हे पक्षी सालाबादाप्रमाणे हिवाळी पाहुणे म्हणून आले आहेत. या सर्व पाहुण्यापक्ष्यांची नोंद अकलूज येथील ऋतुराज कुंभार, दिग्विजय देशमुख आणि प्रसाद काशीद या पक्षी निरीक्षकांनी केली आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे 'वर्क फ्रॉम होम' प्रणालीत अकलूजमध्ये वास्तव्याला असलेले हे संगणक अभियंता अकलूज परिसरातील निरनिराळ्या ठिकाणी पक्षी निरीक्षण करण्यात व्यस्त आहेत.

नीलांग (व्हर्डीटर फ्लाय कॅचर), टिकेलचा निलिमा (टिकेल्स ब्ल्यू फ्लाय कॅचर), तांबुला (रेड ब्रीस्टेड फ्लाय कॅचर) पिवळी लिटकुरी (कॅनरी फ्लाय कॅचर) हे रंगीबेरंगी दुर्मिळ पक्षी येथे पहिल्यांदाच पक्षी निरीक्षकांना दिसून आले आहेत. गेल्या दहा-बारा वर्षांपासून पार्कमध्ये सातत्याने हिवाळ्यात न चुकता ठरलेल्या वेळेत व ठरलेल्या ठिकाणी येऊन दाखल होणाऱ्या थिरथिरा (रेड स्टार्ट) व स्वर्गीय नर्तक (पॅराडाईज फ्लाय कॅचर) या पक्ष्यांबरोबर हिमालयातून नव्याने या वर्षी हे पक्षी येथे आले आहेत. हे पाहुणेपक्षी घरचिमणी, साळुंकी व दयाळ या पक्ष्यांच्या आकाराचे असून त्यांना निसर्गाने विविध रंग बहाल केले आहेत. आकर्षक रंगसंगती मुळे हे पक्षी पक्षीप्रेमी व पर्यटकांना मोहात टाकतात.

हे पक्षी सकाळी व संध्याकाळी भक्ष्य मटकवण्यात क्रियाशील असतात. दुपारच्या वेळी हे पक्षी झाडांच्या दाटीवाटीत सुरक्षित जागा निवडून विश्रांती घेतात. यांचे प्रमुख खाद्य उडणाऱ्या माशा व कीटक असून त्यांना टिपण्यासाठी सदैव धडपडत असतात. झाडाझुडुपांमध्ये सतत हालचाल करत असल्यामुळे त्यांना कॅमेऱ्यात टिपणे जिकिरीचे काम असते. शीतकाल सरतेसमयी हे पक्षी आपापल्या मूळठिकाणी म्हणजेच हिमालयाच्या पर्वतश्रेणी व पायथा, भूतान, तिबेट व ईशान्येकडील राज्यांतील पहाडी भागात वंशाभिवृद्धीसाठी निघून जातात.

हिमालयाच्या पर्वतश्रेणतील घनदाट जंगलात 'फ्लाय कॅचर' म्हणून ओळखले जाणाऱ्या पक्ष्यांचा एक वर्ग आहे. प्रामुख्याने हे पक्षी माशांवर उपजीविका चालवतात. हिवाळ्यात या ठिकाणी बर्फवृष्टी होत असल्यामुळे या पक्ष्यांच्या उदरनिर्वाहाच्या संकटाला सामोरे जावे लागते. अन्नाच्या शोधार्थात हे पक्षी या दिवसांत भारतातील पठारी प्रदेशाकडे स्थलांतर करतात. हे पक्षी ,महाराष्ट्रातील जंगल व घनदाट झाडांनी व्यापलेल्या प्रदेशात राहणे पसंत करतात. विशेष करून बागा, उपवने इत्यादी ठिकाणी हे तीन-चार महिन्यांसाठी वास्तव्याला असतात.

**: डॉ.अरविंद कुंभार, ज्येष्ठ पक्षी अभ्यासक**

सयाजीराजे पार्कमध्ये दरवर्षी अनेक हिवाळ्यात अनेक प्रकारचे विदेशी पक्षी स्थलांतर करून येऊन येथील स्थानिक पक्ष्यांबरोबर मिसळून काही महिन्यांसाठी वास्तव्याला असतात. यंदा स्थलांतरित पक्ष्यांमध्ये नवनवीन प्रजातीचे मनमोहक पक्षी आल्यामुळे पार्कमधील पक्षी वैभवात भर पडली आहे. या पक्ष्यांच्या सुरक्षित वास्तव्यासाठी पार्क व्यवस्थापन विशेष लक्ष देत आहे.

**: स्वरूपाराणी मोहिते-पाटील, पार्क व्यवस्थापिका**

पुण्य नगरी
SMART
मंगळवार,११ जानेवारी २०२२

# अकलूजच्या सयाजीराजे पार्कमध्ये 'फ्लायकॅचर्स' पक्ष्यांची मांदियाळी








## सयाजीराजे पार्कच्या वैभवात भर

सयाजीराजे पार्कमध्ये दरवर्षी हिवाळ्यात अनेक प्रकारचे विदेशी पक्षी स्थलांतर करून येऊन येथील स्थानिक पक्ष्यांबरोबर मिसळून काही महिन्यांसाठी वास्तव्याला असतात. यंदा स्थलांतरित पक्ष्यांमध्ये नवनवीन प्रजातीचे मनमोहक पक्षी आल्यामुळे पार्कमधील पक्षी वैभवात भर पडली आहे. या पक्ष्यांच्या सुरक्षित वास्तव्यासाठी पार्क व्यवस्थापन विशेष लक्ष देत आहे.

– स्वरूपाराणी मोहिते-पाटील, पार्क व्यवस्थापिका

## अन्नाच्या शोधार्थ होते स्थलांतर

हिमालयाच्या पर्वतश्रेणतील घनदाट जंगलात 'फ्लाय कॅचर' म्हणून ओळखले जाणाऱ्या पक्ष्यांचा एक वर्ग आहे. प्रामुख्याने हे पक्षी माशांवर उपजीविका चालवतात. हिवाळ्यात या ठिकाणी बर्फवृष्टी होत असल्यामुळे या पक्ष्यांच्या उदरनिर्वाहाच्या संकटाला सामोरे जावे लागते. अन्नाच्या शोधार्थात हे पक्षी या दिवसांत भारतातील पठारी प्रदेशाकडे स्थलांतर करतात. हे पक्षी, महाराष्ट्रातील जंगल व घनदाट झाडांनी व्यापलेल्या प्रदेशात राहणे पसंत करतात. विशेष करून बागा, उपवने इत्यादी ठिकाणी हे तीन-चार महिन्यांसाठी वास्तव्याला असतात.

-डॉ. अरविंद कुंभार, ज्येष्ठ पक्षी अभ्यासक.

कॅचर), तांबुला (रेड ब्रीस्टेड फ्लाय कॅचर), पिवळी लिटकुरी (कॅनरी फ्लाय कॅचर) हे रंगीबेरंगी दुर्मिळ पक्षी येथे पहिल्यांदाच पक्षी निरीक्षकांना दिसून आले आहेत. गेल्या दहा-बारा वर्षांपासून पार्कमध्ये सातत्याने हिवाळ्यात न चुकता ठरलेल्या वेळेत व ठरलेल्या ठिकाणी येऊन दाखल होणाऱ्या थिरथिरा (रेड स्टार्ट) व स्वर्गीय नर्तक (पॅराडाईज फ्लाय कॅचर) या पक्ष्यांबरोबर हिमालयातून नव्याने या वर्षी हे पक्षी येथे आले आहेत. हे पाहुणेपक्षी घरचिमणी, साळुंकी व दयाळ या पक्ष्यांच्या आकाराचे असून त्यांना निसर्गाने विविध रंग बहाल केले आहेत. आकर्षक रंगसंगती मुळे हे पक्षी पक्षीप्रेमी व पर्यटकांना मोहात टाकतात.

प्तप्तहे पक्षी सकाळी व संध्याकाळी भक्ष्य मटकवण्यात क्रियाशील असतात. दुपारच्या वेळी हे पक्षी झाडांच्या दाटीवाटीत सुरक्षित जागा निवडून विश्रांती घेतात. यांचे प्रमुख खाद्य उडणाऱ्या माशा व कीटक असून त्यांना टिपण्यासाठी सदैव धडपडत असतात. झाडाझुडुपांमध्ये सतत हालचाल करत असल्यामुळे त्यांना कॅमेऱ्यात टिपणे जिकिरीचे काम असते. शीतकाल सरतेसमयी हे पक्षी आपापल्या मूळठिकाणी म्हणजेच हिमालयाच्या पर्वतश्रेणी व पायथा, भूतान, तिबेट व ईशान्येकडील राज्यांतील पहाडी भागात वंशाभिवृद्धीसाठी निघून जातात.

जनमत सर्वसामान्यांचे

शनिवार, १५ जानेवारी २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांची १०४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी



संग्रामनगर, दि १४ (प्रतिनिधी) अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये सहकार महर्षी शंकराव मोहिते पाटील यांची १०४ वी जयंती मोठ्या उत्स–हात साजरी करण्यात आली. कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या कार्य कर्तृत्वाचा आढावा घेऊन सहकार महर्षी यांच्या शैक्षणिक,सहकार,राजकीय व सामाजिक कामगिरीचा आढावा घेऊन त्यांचे अष्टपैलू व्यक्तीमत्व कसे होते याची जाणीव करून दिली.त्याच बरोबर सहकार महर्षींनी समाजात एकोपा राहण्याच्या दृष्टिकोनातून सोशल इंजिनीअरिंगचा प्रयोग यशस्वीपणे राबवला.हे त्यांच्या कार्यातून दिसून येतो.

या कार्यक्रमासाठी म हाविद्यालयातील विविध विषयाचे विभाग प्रमुख, डॉ. रामलिंग सावळजकर, डॉ. दत्तात्रय बारबोले, प्रा. विष्णू सुर्वे, खटउ विभाग सम न्वयक डॉ. हनुमंत आवताडे,डॉ. शिवप्रसाद टिळेकर, डॉ.चारूदत्त पवार, डॉ.सतीश देवकर,डॉ. विश्वनाथ आवड, ग्रंथपाल दत्तात्रय पाटील, डॉ.बाळासाहेब मुळीक, डॉ. सुधा बनसोडे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.रत्नदीप गायकवाड, ज्युनिअर विभाग सुपरवायझर प्रा.आर.के.इंगोले,प्रा.मोटे सर,त्याच बरोबर कार्यालयीन अधिक्षक युवर–ाज मालुसरे,भारत लावंड,रणजीत गायकवाड,नाना साठे,अविनाश पत्ताळे तसेच कार्यालयीन कर्मचारी वृंद उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविके प्रा.डॉ.जनार्धन परकाळे यांनी केले.उपस्थितांचे आभार अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. अण्णासाहेब नलवडे यांनी मानले.

जनसत्य
सोमवार, दि. २४ जानेवारी २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# सेवापुस्तिका अपूर्ण असल्यास मिळणार नाही वेतन

## शिक्षणाधिकाऱ्यांचे नवे आदेश!



शिक्षकांनी रजेसह इतर नोंदी वेळोवेळी करणे अपेक्षित आहे. परंतु, यापूर्वी सेवापुस्तिका अद्ययावत करण्यासाठी मुदत देऊनही ते अपूर्णच आहेत. त्यामुळे आता २८ जानेवारीपर्यंत आणखी एक संधी दिली आहे. अपूर्ण सेवापुस्तक असलेल्या शिक्षकांना फेब्रुवारीचा पगार मिळणार नाही.

**- किरण लोहार, प्राथमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर**

जनसत्य प्रतिनिधी

**सोलापूर :** जिल्ह्यातील अनुदानित व विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दुबार सेवापुस्तिका अद्ययावत करावी लागणार आहे. २८ जानेवारीपर्यंत सेवापुस्तिका अद्ययावत केल्याशिवाय फेब्रुवारीचा पगार मिळणार नाही, असे आदेश प्राथमिक शिक्षणाधिकारी किरण लोहार यांनी काढले आहेत.

दुबार सेवापुस्तिका अद्ययावत करताना मूळ सेवापुस्तिकेवरील जन्म तारखेची नोंद पडताळावी, जातवैधता प्रमाणपत्राच्या पडताळणीची तारीख, नावात बदल असल्यास त्याचे गॅझेट, प्रथम नियुक्तीचा आदेश, नियमित वार्षिक वेतनवाढ, रजा, या सर्व बाबींच्या नोंदी कराव्या लागणार आहेत. तसेच त्यांची शैक्षणिक कागदपत्रेदेखील त्यासोबत जोडावी लागणार असून स्वत:च्या स्वाक्षरीने ती कागदपत्रे प्रमाणित करावी, असेही आदेशात म्हटले आहे. तत्पूर्वी, शिक्षणाधिकाऱ्यांनी त्या शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवापुस्तिका अद्ययावत करण्याचे आदेश दिले होते. परंतु, बहुतेक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही. त्यामुळे आता २८ जानेवारीपर्यंत सेवापुस्तिका अद्ययावत न केल्यास त्या शाळेचे (शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी) पगारपत्रक स्वीकारले जाणार नाही, असेही शिक्षणाधिकारी लोहार यांनी आदेशातून स्पष्ट केले आहे. संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांनी त्यांच्याकडील सर्व कर्मचाऱ्यांची दुबार सेवापुस्तके अद्ययावत करून संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्याची पोहोच ठेवावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या आहेत. त्यांनी वेतन अधीक्षकांनाही तसे पत्र पाठविले असून दुबार सेवापुस्तक अद्ययावत करून कर्मचाऱ्यांना ते दिल्याची पोहोच सादर केल्याशिवाय पुढील वेतन देऊ नये, असे कळविले आहे.

रजा घेऊनही नोंद होत नसल्याचा संशय कोरोना काळात शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाचे धडे दिले जात आहेत. त्यासाठी शिक्षकांना शाळेत येणे बंधनकारक आहे.

पुण्य नगरी
SMART
सोमवार,२४ जानेवारी २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# डॉ.आंबेडकर यांची ग्रंथसंपदा म्हणजे समृध्द विचारांचा वारसा : प्रा.देशमुख

अकलूज / प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यात विपुल प्रमाणात लेखन केले. त्यामध्ये बुध्द आणि त्याचा धम्म, प्रॉब्लेम ऑफ रुपी, जातिव्यवस्था, शूद्र कोण होते, रानडे, गांधी व जिना, इस्ट इंडिया कंपनी, थॉट्स ऑन पाकिस्तान अशी त्यांची ग्रंथसंपदा समृद्ध विचारांचा वारसा होय, असे मत प्रा. रोहित देशमुख यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर संलग्नित, शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज राज्यशास्त्र व सामाजिक शास्त्रे असोसिएशन आयोजित संविधान दिनानिमित्त आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा राष्ट्रीय प्रमाणपत्र अभ्यासक्रमामध्ये रविवारी नववे व्याख्यानपुष्प गुंफताना ते बोलत होते.

प्रा.देशमुख म्हणाले, डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेल्या सर्व ग्रंथांना दिलेले मौलिक संदर्भ, त्यानुसारच केलेली मांडणी, प्रदीर्घ प्रस्तावना व अचूक संदर्भ असे त्यांचे वैशिष्ट्य होते. तुमच्याकडे दोन रुपये असतील तर त्यातील एक रुपयाची पुस्तके घ्या, असे सांगणारे डॉ. बाबासाहेब हे विद्वत्तेचा सूर्य होते. प्रतिभा, कल्पना, रम्यता यापेक्षा वस्तुस्थितीचा, परिस्थितीचा अभ्यास करून सत्य स्थितीच्या अंगाने डॉ. बाबासाहेबांनी मांडणी केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील इंग्रजी विभागातील डॉ. शिरीष शिंदे होते. सूत्रसंचलन नागन्नाथ साळवे यांनी केले. प्रास्ताविक प्रमुख पाहुणे अमोल खरात यांनी केले. ऑनलाईन व ऑफलाईन व्याख्यानास महाराष्ट्रातील अनेक नामवंत अभ्यासक, महाविद्यालयातील समन्वयक, प्राध्यापक व विचारधारा अभ्यासक्रमामध्ये सहभागी झालेले बहुसंख्य सदस्य सहभागी झाले होते.

जनसत्य
सोमवार, दि. २४ जानेवारी २०२२ 8

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची ग्रंथसंपदा म्हणजे समृध्द विचारांचा वारसा : प्रा. रोहित

**अकलूज :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठ सोलापूर संलग्नित, शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शंकरराव मोहिते म हाविद्यालय अकलूज राज्यशास्त्र व सामाजिक शास्त्रे असोशिएशन आयोजित संविधान दिनानिमीत्त आयोजित डॉ बाबासाहेब आंबेडकर विचारधारा राष्ट्रीय प्रम णपत्र अभ्यासक्रमामध्ये दिनांक २२.१.२२ रोजी नववे व्याख्यानपुष्प गुंफताना ते बोलत होतें



डॉ बाबासाहेबांनी आपल्या आयुष्या विपुल प्रमाणात लेखन केले. त्याम ध्ये बुध्द आनि त्याचा धम्म, प्रॉब्लेम ऑफ रुपी, जातीव्यवस्था, शुद्र कोण होते, रानडे, गांधी व जिना, इस्ट इंडिया कंपनी, थॉटस ऑन पाकीस्तान अशा विविध पुस्तकांचा आढावा घेतला.

डॉ बाबासाहेंबाच्या लेखनिचे वैशिष्टेच असे आहे कि त्यांनी लिहलेलल्या सर्व ग्रंथाना दिलेले मौलिक संदर्भ, त्यानुसारच केलेले मांडणी, प्रदिर्घ प्रस्तावना व अचुक संदर्भ. तुमच्याकडे दोन रूपये असतील त्यातला एक रूपयाची पुस्तके घ्या असे सांगनारे डॉ बाबासाहेब विद्वत्वतेचा सुर्य होते.

प्रतिभा, कल्पना, रम्यता यापेक्षां वस्तुस्थिचीच्या, परीस्थितीचा अभ्यास करून सत्य स्थितीच्या अंगाने बाबासाहेबांनी मांडनी केली.

बुध्द व कार्ल मार्क्स यांचीही तुलना करताना आगोदर दोघांना सनजून घ्यावे लागेल जेणेकरून त्या विचारापर्यत तरी आपण पोहचू शकू. अतिषय सविस्तर व समर्पक विषयास न्याय देणारी मांडणी प्रा रोहित देशमुख यांनी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविदयालयातील इंग्रजी विभागातील डॉ शिरीष शिंदे सर होते. सुत्रसंचलन नागन्नाथ साळवे यांनी केले प्रास्ताविक व प्रमुख पाहुणे अमोल खरात यांनी केले. ऑनलाईन व ऑफलाईन व्याख्यानास महाराष्ट्रातील अनेक नामवंत अभ्यासक, म हाविदयालयातील समन्वयक, प्राध्यापक व विचारधारा अभ्यासक्रमामध्ये सहभागी झालेले बहुसंख्य सदस्य सहभागी झाले होते.

जनसत्य
■ सोलापूर-उस्मानाबाद-गुलबर्गा जिल्ह्यातून एकाचवेळी वितरीत होणारे दैनिक
● Email : jansatya2013@gmail.com
● शुक्रवार, दि. २८ जानेवारी २०२२ ●

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
* Akluj - 413101 *

# डॉ.आंबेडकरांनी देशाच्या अर्थकारणाला नवदिशा देवून त्याचा पाया घातला

जनसत्य प्रतिनिधी



**अकलूज** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठ सोलापूर संलग्नित, शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज राज्यशास्त्र व सामाजिक शास्त्रे असोशिएशन आयोजित संविधान दिनानिमीत्त आयोजित डॉ बाबासाहेब आंबेडकर विचारधारा राष्ट्रीय प्रमाणपत्र अभ्यासक्रमामध्ये समारोप व्याख्यानपुष्प गुंफताना ते बोलत होतें

बाबासाहेबांच्या आर्थीक विचाराची उंची हि त्यांच्या लेखनातूनच समजून येते. या देशाची अवहेलना करणारी इस्ट इंडिया कंपनी असो किंवा या देशातल्या सामाजीक व्यवस्था असो त्या सर्वाचा अभ्यास करून देशाला अर्थकारणात मजबुत करण्यासाठीची विविध प्रबंध त्यांनी लिहले.

रिझर्व बँक असेल किंवा विमा कंपन्या असतील या सर्व बाबींचा विचार करता बाबासाहेबांच्या दूरदृष्टीची कल्पना येते.

देशाचे अर्थकारण सुधारायचे असेल तर शेतकरी, कामगार यांच्यासाठीच्या योजना अंमलात आल्या पाहिजेत. असेही त्यांनी सांगीतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाना वरून बोलताना महाविदयालयातील इंग्रजी विभागातील डॉ हणमंत आवताडे म्हणाले कि बाबासाहेबांच्या चतुरस्त्र भुमीकांचा अभ्यास व्हायला हवा महनीय असलेल्या व्यक्तीमत्वाने अनेक प्रकारचे कार्य केलेले आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ विश्वनाथ आवड यांनी केले तर प्रास्ताविक व प्रमुख पाहुणे डॉ आण्णासाहेब नलावडे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागन्नाथ साळवे अमोल खरात, अर्णव खरात, विनायक खरात व टेक्नीकल शेषनसाठी रूद्रप्रताप आवड यांनी प्रयत्न केले.

ऑनलाईन व ऑफलाईन व्याख्यानास महाराष्ट्रातील अनेक नामवंत अभ्यासक, महाविदयालयातील समन्वयक, प्राध्यापक व विचारधारा अभ्यासक्रमामध्ये सहभागी झालेले बहुसंख्य सदस्य सहभागी झाले होते.

सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. २९ जानेवारी २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# डॉ. आंबेडकरांनी अर्थकारणाला दिशा दिली : डॉ. बागडे

✓ सुराज्य/अकलूज

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर संलग्नित, शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज राज्यशास्त्र व सामाजिक शास्त्रे असोशिएशन आयोजित संविधान दिनानिमित्त आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा राष्ट्रीय प्रमाणपत्र अभ्यासक्रमामध्ये समारोप व्याख्यानपुष्प गुंफताना प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे बोलत होते.

बाबासाहेबांच्या आर्थिक विचाराची उंची ही त्यांच्या लेखनातूनच समजून येते. या देशाची अवहेलना करणारी ईस्ट इंडिया कंपनी असो किंवा या देशातल्या सामाजिक व्यवस्था असो त्या सर्वाचा अभ्यास करुन देशाला अर्थकारणात मजबूत करण्यासाठीची विविध प्रबंध त्यांनी लिहले. रिझर्व बँक असेल किंवा विमा कंपन्या असतील या सर्व बाबींचा विचार करता बाबासाहेबांच्या दूरदृष्टीची कल्पना येते.

देशाचे अर्थकारण सुधारायचे असेल तर शेतकरी, कामगार यांच्यासाठीच्या योजना अंमलात आल्या पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना महाविद्यालयातील इंग्रजी




विभागातील डॉ. हणमंत आवताडे म्हणाले की, बाबासाहेबांच्या चतुरस्त्र भूमिकांचा अभ्यास व्हावला हवा महनीय असलेल्या व्यक्तिमत्त्वाने अनेक प्रकारचे कार्य केलेले आहे. सूत्रसंचालन डॉ. विश्वनाथ आवड यांनी केले तर प्रास्ताविक व प्रमुख पाहुणे डॉ. आण्णासाहेब नलावडे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागन्नाथ साळवे, अमोल खरात, अर्णव खरात, विनायक खरात व टेक्निकल शेषनसाठी रुद्रप्रताप आवड यांनी प्रयत्न केले. ऑनलाईन व ऑफलाईन व्याख्यानास महाराष्ट्रातील अनेक नामवंत अभ्यासक, महाविद्यालयातील समन्वयक, प्राध्यापक व विचारधारा अभ्यासक्रमामध्ये सहभागी झालेले बहुसंख्य सदस्य सहभागी झाले होते.

सुराज्य सोलापूर

बुधवार, दि. २ फेब्रुवारी २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
* Akluj - 413101 *



# अकलूज येथील काव्य मैफिलित रसिक मंत्रमुग्ध

✓ **सुराज्य/अकलूज :** शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालय मराठी विभाग, राज्यशास्त्र विभाग व मराठी साहित्य परिषद शाखा अकलूज यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा पंधरवडा संवर्धन कार्यक्रमाअंतर्गत आयोजीत 'कवी आपल्या भेटीला' कार्यक्रम पार पडला. यामध्ये सादर झालेल्या कवितांमधून रसिक मंत्रमुग्ध झाले. डॉ. बारबोले यांनी केलेले प्रस्ताविक केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी आपल्या भाषा जर नाही जपल्या तर त्या संपून जातील म्हणूनच अशा उपक्रमांचे आयोजन आवश्यक ठरते असे मत व्यक्त केले. डॉ. परकाळे यांनी प्रमुख पाहुण्यांची करून दिलेली ओळख व कार्यक्रमाचे नेमकेपणाने प्रा. विनायक सूर्यवंशी यांनी मानलेले आभार व डॉ. विश्वनाथ आवड यांचे सूत्रसंचालन या औपचारिकतेने हा कार्यक्रम सुरू झाला. कविवर्य सुनील जवंजाळ यांनी कवी संमेलनाची सूत्रे हाती घेतली. हणमंत शिंदेची कविता सादर केली. दोन तास रंगलेली मैफिल सरल दळण या कवितेने संपली. काव्य संमेलनाचा समारोप डॉ. बारबोले यांच्या मामाच्या पोरीला या कवितेने करण्यात आला.

सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. ५ फेब्रुवारी २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# ... आणि संग्रामसिंह विद्यार्थी दशेतील आठवणीत रमले

अकलूज : लहानपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा.. लहानपणीच्या आठवणीने प्रत्येक माणूस अगदी हरवून जातो अशाच एका प्रसंगात महर्षी प्रशाला अकलूज येथे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील हे विद्यार्थी दशेतील आठवणी सांगत असताना स्वतः हरवून गेले निमित्त होते महर्षी प्रशाला अकलूज येथील पत्रकार परिषदेचे. महर्षी चषक लेदर बॉल भव्य क्रिकेट स्पर्धेची पत्रकार परिषद संपल्यानंतर उपस्थित पत्रकार बांधव आणि शिक्षण प्रसारक



मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील हे विद्यार्थीदशेच्या आठवणीत रंगून गेले. शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी ते विराजमान झाल्यापासून विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देत असताना दिसत आहेत. जयसिंह मोहिते पाटील यांचा वारसा ते अगदी सहकार महर्षी यांच्या विचाराने समर्थपणे सांभाळताना दिसत आहेत. आपले शालेय जीवन सांगताना ते भरभरून बोलून गेले. बी.के. मुळे या शिक्षकाच्या काळ्या छडी ची आठवण त्यांनी याप्रसंगी सांगितली. शाळा सुटल्यानंतर घरी जायची किती ओढ असते असे प्रसंगही त्यांनी सांगितले. लहान असताना वडिलांनी मोठमोठे कार्यक्रम आयोजित केले आणि त्या काळात आम्ही भारावून जायचो अशाही त्यांनी भावना व्यक्त केल्या. लहान असताना जबाबदारी नसते मोठे झाल्यावर मात्र जबाबदारी स्वीकारावी लागते अशा भावना व्यक्त करीत त्यांनी आपल्या शब्दांना वाट मोकळी करून दिली.

पुढारी

संस्थापक – संपादक कै. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव,
मुख्य संपादक – डॉ. प्रतापसिंह ग. जाधव (पद्मश्री पुरस्काराने सन्मानित)

माघ शु. ४, शके १९४३, श्री शिवशक ३४८
शुक्रवार, ४ फेब्रुवारी २०२२

६

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# अकलूज येथे लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**अकलूज : पुढारी वृत्तसेवा**

येथील संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्रमंडळाच्या वतीने ७ फेब्रुवारीपासून १९ वर्षांखालील मुलांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

स्पर्धेचे उद्घाटन मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते व सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंतनगर येथे होणार आहे. स्पर्धेत अकलूजचे दोन संघ, सोलापूरचे दोन संघ, पुण्याचे तीन संघ, नांदेडचे दोन संघ, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर येथील प्रत्येकी एक संघ, अशा एकूण १२ संघांनी सहभाग घेतला आहे. स्पर्धेत सहभागी असणाऱ्या सुमारे १८० खेळाडूंची निवास, भोजन, वाहतूक व्यवस्था व रंगीत किट मित्रमंडळाने मोफत पुरवली आहेत. यावेळी मनोज रेळेकर, सचिव संजय राऊत, अनिल जाधव यांच्यासह मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

लोकमत
शुक्रवार ०४.०२.२०२२
हॅलो सोलापूर
epaper.lokmat.com

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# महर्षी चषक लेदरबॉल क्रिकेट स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**अकलूज :** येथील संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळातर्फे अकलूज येथे ७ फेब्रुवारीपासून १९ वर्षाखालील मुलांच्या लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती संग्रामसिंह मोहिते-पाढील मित्र मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

उद्घाटन मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते व सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे. या स्पर्धेत नांदेड, सोलापूर, पुणे, सांगली, कोल्हापूरसह महाराष्ट्रातील १२ संघांनी सहभाग घेतला आहे. हे सामने साखळी पद्धतीने होणार आहेत. यासाठी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे तज्ज्ञ पंच म्हणून काम पाहणार आहेत.

स्पर्धेसाठी प्रायोजक म्हणून कृष्णप्रिया मल्टिफंक्शनल हॉल, सयाजीराजे वॉटर पार्क, जयस्टिल यांचे सहकार्य लाभले.

संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळाने नेहमी सामाजिक बांधीलकी जोपासून रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती शिबिरे राबविली आहेत. स्पर्धेसाठी मित्र मंडळाचे सर्व सदस्य, विविध कमिटीतून सक्रिय सहभागी आहेत. २० फेब्रुवारीला सायंकाळी ४ वाजता स्पर्धेचा समारोप महर्षी शंकरराव मोहित प्रशाला यशवंतनगर येथे होणार आहे.

सुराज्य सोलापूर
शुक्रवार, दि. ४ फेब्रुवारी २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# महर्षी चषक लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेचे अकलूजला आयोजन

✔ सुराज्य/अकलूज

अकलूज येथील संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळाच्या वतीने सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटीलयांच्या जयंतीनिमित्त सोमवार दि. ७ फेब्रुवारी पासून १९ वर्षाखालील मुलांच्या लेदर बॉल भव्य क्रिकेटस्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

सदर स्पर्धेचे उद्‌घाटन मंडळाचे मार्गदर्शक सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते व सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंतनगर येथे सोमवार दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता संपन्न होणार आहे. स्पर्धेत नांदेड, सोलापूर, पुणे, सांगली, कोल्हापूर अशा महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील १२ संघांनी सहभाग घेतला असून, प्रत्येक सामना ४० षटकांचा आहे. सदरचे सामने साखळी पद्धतीने होणार आहेत. याकरिता जिल्हा क्रिकेट असोशिएशनचे तज्ज्ञ पंच म्हणून काम पाहणार आहेत. या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकास महर्षी चषकासह रोख रुपये ३५,०००, द्वितीय क्रमांकास रुपये २५,००० तृतीय क्रमांकास १५,००० शिवाय मॅन ऑफ दि सिरीज ५००० हजार, अंतिम सामना मॅन ऑफ दि मॅच २००० अशी एकूण सुमारे ८३ हजार रुपयांची रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

स्पर्धेत सहभागी असणाऱ्या सुमारे १८० खेळाडूंची निवास, भोजन, वाहतूक व्यवस्था मित्र मंडळाने मोफत पुरवली आहे. मंडळामार्फत खेळाडूंना रंगीत कीट मोफत दिले आहे. या स्पर्धेसाठी प्रायोजक म्हणून कृष्णप्रिया मल्टीफंक्शनल हॉल, सयाजीराजे वॉटर पार्क, जयस्टिल यांचे मोलाचे आर्थिक सहकार्य लाभले आहे. संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्रमंडळाने नेहमीच सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. राज्यस्तरीय लेझीम स्पर्धेतून हजारो मुले खेळाडू म्हणून तयार केली आहेत. प्रशिक्षण शिबिरे आयोजीत केली आहेत. तर अकलूजच्या लेझीमची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे.

संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळाने नेहमीच समाजासाठी सामाजिक बांधीलकी जोपासून रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती शिबिरे राबवली आहेत.

स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार समारंभ, गरीब विद्यार्थ्यांना मदत, गरिबांना वैद्यकीय आर्थिक मदत, वेटलिफिटिंग (भारत्तोलन) स्पर्धा आदी उपक्रम राबविले आहेत. सदरच्या स्पर्धेसाठी मित्र मंडळाचे सर्व सदस्य, विविध कमिटीतून सक्रिय सहभागी आहेत. रविवार दि. २० फेब्रुवारी २०२२ रोजी सायंकाळी ४ वाजता स्पर्धेचा समारोप महर्षी शंकरराव मोहित प्रशाला यशवंतनगर येथे होणार आहे.



ग्रामीण भागातील खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवर चमकावे यासाठीच अशा स्पर्धांचे आयोजन केले जात असून यातून राष्ट्रीय-पातळीवर खेळणारा खेळाडू निर्माण व्हावा, हेच उद्दिष्ट आहे.

संग्रामसिंह मोहिते-पाटील
(अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज)

जनमत सर्वसामान्यांचे

शुक्रवार, ०४ फेब्रुवारी २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळाच्या वतीने अकलूज येथे सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती निमित्त महर्षि चषक लेदरबॉल भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन



अकलूज,दि. ३ (प्रतिनिधी) अकलूज येथील संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळाच्या वतीने अकलूज येथे सोमवार दिनांक ७ फेब्रुवारी पासून १९ वर्षाखालील मुलांच्या लेदर बॉल भव्य क्रिकेटस्पर्धेचे आयोजन केले असल्याची मांहिती शिक्षण प्रसारक मंडळाचे व संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांनी दिली. सदर स्पर्धेचे उद्घाटन मंडळाचे मार्गदर्शक सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील यांचे शुभहस्ते व सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंतनगर येथे सोमवार दि.७फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता संपन्न होणार आहे. स्पर्धेत नांदेड, सोलापूर , पुणे , सांगली , कोल्हापूर अशा महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील १२ संघांनी सहभाग घेतला असून, प्रत्येक सामना ४० षटकांचा आहे. सदरचे सामने साखळी पद्धतीने होणार आहेत.

याकरीता जिल्हा क्रिकेट असोशिएशनचे तज्ञ पंच म्हणून काम पाहणार आहेत. या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकास महर्षि चषकासह रोख रुपये ३५,०००/-, द्वितीय क्रमांकास रुपये २५,०००/ तृतीय क्रमांकास १५,०००/ शिवाय ऑफ मॅन ऑफ दि सिरिज ५००० हजार, अंतिम सामना मॅन ऑफ दि मॅच २०००/अशी एकूण सुमारे ८३ हजार रुपयांची रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

स्पर्धेत सहभागी असणाऱ्या सुमारे १८० खेळाडूंची निवास, भोजन, वाहतुक व्यवस्था मित्र मंडळाने मोफत पुरवली आहे. स्पर्धेत सहभागी प्रत्येक संघास. रु १५,०००/प्रवेश फी ठेवण्यात आली आहे . मंडळामार्फत खेळाडूंना रंगीत कीट मोफत दिले आहे.

या स्पर्धेसाठी प्रायोजक म्हणून कृष्णप्रिया मल्टीफंक्शनल हॉल, सयाजीराजे वॉटर पार्क, जयस्टिल यांचे मोलाचे आर्थिक सहकार्य लाभले आहे. संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळाने नेहमीच सामाजिक, सांस्कृतीक, कला , क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे . राज्यस्तरीय लेझीम स्पर्धेतून हजारों मुले खेळाडू म्हणून तयार केली आहेत.प्रशिक्षण शिबीरे आयोजीत केली आहेत.तर अकलूज च्या लेझीमची गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली आहे.

संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळाने नेहमीच समाजासाठी सामाजीक बांधीलकी जोपासून रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण , व्यसनमुक्ती शिबिरे राबदली आहेत. स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार समारंभ , गरीब विद्यार्थ्यांना मदत, गरीबांना वैद्यकीय आर्थिक मदत, वेटलिफिरंग (भारत्तोलन ) स्पर्धा आदी उपक्रम राबविले आहेत. सदरच्या स्पर्धेसाठी मित्र मंडळाचे सर्व सदस्य, विविध कमिटीतून सक्रीय सहभागी आहेत. रविवार दि २० फेब्रुवारी २०२२ रोजी सायंकाळी ४ वाजता स्पर्धेचा समारोप महर्षि शंकरराव मोहित प्रशाला यशवंतनगर येथे होणार आहे.

सदरच्या स्पर्धा सर्व कोरोना नियमांचे पालन करून संपन्न होणार आहेत.

त्याचप्रमाणे,सदर स्पर्धा ही १९ वर्षाखालील मुलांना व्यासपीठ मिळून त्यातून मुलांना पुढे भारतीय संघात स्थान मिळावे म्हणून आयोजित केल्या आहेत. असे स्पर्धेचे संयोजक संग्रामसिंह मोहिते पाटील यांनी सांगितले.

दैनिक दिव्य मराठी
सोलापूर जिल्हा
सोलापूर. शुक्रवार, ४ फेब्रुवारी २०२२ | माघ शु. ४, शके १९४३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# अकलूजला ७ ते २० फेब्रुवारी दरम्यान क्रिकेट स्पर्धा

प्रतिनिधी । अकलूज

मुंबई क्रिकेट नियामक मंडळाशी संलग्नित महर्षी चषक लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे अकलूज येथे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते यांनी पत्रकार परिषदेत दिली. ग्रामीण भागातून आयपीएल व राष्ट्रीय स्तरावर क्रिकेटपटू जावेत यासाठी या स्पर्धांचे आयोजन केले असल्याचे संग्रामसिंह यांनी सांगितले. सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या क्रिकेट स्पर्धा मुंबई क्रिकेट नियामक मंडळाच्या नियमानुसार होतील. या स्पर्धा १९ वर्षे वयोगटातील खेळाडूंमध्ये होणार आहेत. प्रत्येक सामना ४० षटकांचा राहील. ७ ते २० फेब्रुवारी दरम्यान हे क्रिकेट सामने अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालय व शंकरनगर येथील महर्षी प्रशालेच्या मैदानावर खेळविण्यात येतील. सामन्यांसाठी अकलूज येथून २ संघ, सोलापूरचे २ संघ, पुणे ३ संघ, नांदेड २ संघ, औरंगाबाद ,नागपूर आणि कोल्हापूर प्रत्येकी एक संघ असे बारा संघ सहभागी झाले आहेत. प्रत्येकी सहा संघ घेऊन अ आणि ब अशी वर्गवारी करून या दोन गटात हे सामने होतील. या क्रिकेट सामन्याचे उद्घाटन सहकार महर्षी कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते आदींच्या उपस्थितीत होईल.

संचार आरोग्य
सोलापूर, शनिवार, ५ फेब्रुवारी २०२२ पान ६

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# अकलूज येथे सोमवारपासून लेदरबॉल क्रिकेट स्पर्धा



**संचार वृत्तसेवा**

**अकलूज, दि. ४** - अकलूज येथे सोमवार, ७ फेब्रुवारीपासून १९ वर्षांखालील मुलांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

या स्पर्धेचे उद्घाटन मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते व सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सहकार महर्षी प्रशाला, यशवंतनगर येथे सोमवारी सकाळी १० वाजता होणार आहे.

या स्पर्धेत नांदेड, सोलापूर, पुणे, सांगली, कोल्हापूर येथील १२ संघांनी सहभाग घेतला असून प्रत्येक सामना ४० षटकांचा आहे. हे सामने साखळी पद्धतीने होणार आहेत. यासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे तज्ज्ञ पंच काम पाहणार आहेत. यात प्रथम क्रमांकास महर्षी चषकासह रोख रुपये ३५ हजार, द्वितीय क्रमांकास २५ हजार, तृतीय क्रमांकास १५ हजार, मॅन ऑफ दि सीरिज ५ हजार, अंतिम सामना मॅन ऑफ दि मॅच २ हजार अशी एकूण सुमारे ८३ हजार रुपयांची रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत.

स्पर्धेत सहभागी असणाऱ्या सुमारे १८० खेळाडूंची निवास, भोजन, वाहतूक व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक संघास १५ हजार रुपये प्रवेश फी ठेवण्यात आली आहे. मंडळामार्फत खेळाडूंना रंगीत किट मोफत दिले आहे. या स्पर्धेसाठी प्रायोजक म्हणून कृष्णप्रिया मल्टिफंक्शनल हॉल, सयाजीराजे वॉटर पार्क, जयस्टिल यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. या स्पर्धेचा समारोप २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता यशवंतनगर येथे होणार आहे.

सुराज्य सोलापूर
रविवार, दि. १३ फेब्रुवारी २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र

सुराज्य/अकलूज

अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या वतीने एक दिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर प्रायोजित इमर्जिंग ट्रेन्डस इन केमिस्ट्री या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

चर्चासत्राचे उद्घाटन सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. व्ही. बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. एम.टी. बचुटे प्राचार्य, सांगोला महाविद्यालय सांगोला हे होते. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी आपले विचार मांडले. चर्चासत्राचे प्रास्ताविक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश देवकर यांनी केले. चर्चासत्राचे उद्घाटक डॉ. व्ही.बी. पाटील यांनी आपल्या बीज भाषणात नॅनोतंत्रज्ञानाच्या विविध क्षेत्रात होणाऱ्या वापराविषयी सखोल मार्गदर्शन केले. विशेषतः गॅस सेन्सर्स, ऊर्जा साठवणूक व प्रतिजैविके म्हणून होणाऱ्या वापराविषयी माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बचुटे यांनी नॅनोतंत्रज्ञानाच्या विविध क्षेत्रातील वापराविषयी मार्गदर्शन केले. उद्घाटन समारंभानंतर प्रथम सत्राची सुरुवात डॉ.प्रवीण जगदाळे (सीनिअर सायंटिस्ट इटालियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, टोरिनो,इटली) यांच्या वेस्ट टू बेस्ट: इको फ्रेंडली ग्रीन केमिस्ट्री या विषयाने झाली. त्यांचे व्याख्यान चर्चासत्रातील सहभागी सदस्यांना उपयुक्त व प्रेरणादायी होते. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. अनिल घनवट (रसायनशास्त्र संकुल सोलापूर विद्यापीठ, सोलापूर) हे होते. चर्चासत्रातील दुसरे सत्र डॉ. प्रकाश महानवर (डायरेक्टर,इन्स्टिट्यूट ऑफ डिस्टंस अँड ओपन लर्निंग, मुंबई विद्यापीठ) यांच्या ग्रीन पॉलिमर डीटिव्हस या विषयावरील व्याख्यानाने संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजयकुमार उबाळे प्राचार्य, दयानंद कॉलेज, सोलापूर हे होते. तिसरे सत्र संशोधकांच्या सादरीकरणासाठी ठेवण्यात आले होते. त्यात आठ संशोधकांने त्यांचे संशोधन कार्य सादर केले. अध्यक्षस्थानी डॉ. शशिकांत गायकवाड अध्यक्ष, रसायनशास्त्र अभ्यास मंडळ सोलापूर विद्यापीठ हे होते. या एक दिवसीय चर्चासत्राचा समारोप डॉ. शशिकांत गायकवाड यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या चर्चासत्रामध्ये २६७ सदस्यांनी सहभाग नोंदवला. हे राष्ट्रीय चर्चासत्र शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, संस्थेचे सचिव अभिजित रणवरे,सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.हनुमंत आवताडे व त्यांचे सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडले. सूत्रसंचालन प्रा. दमयंती कांबळे यांनी केले तर आभार प्रा. प्रीती पिसे यांनी मानले.

सुराज्य
सोलापूर

गुरूवार, दि. ३ मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



# शंकरराव मोहिते महाविद्यालयात शरीर सौष्ठव निवड चाचणी

✓ सुराज्य/अकलूज : अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर वेटलिफ्टींग, पॉवर लिफ्टिंग व शरीर सौष्ठव विद्यापीठ संघाची निवड चाचणी संपन्न झाली. या निवड चाचणीचे उद्घाटन विद्यापीठ निवड समिती, वेटलिफ्टींग असोसिएशनचे सचिव एस. एस. गवळी यांचे हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे होते. यावेळी विद्यापीठ पात्रता समिती सदस्य एस. व्ही मोरे, डॉ.. एम् बी. ढेंबरे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ.. बापू मोहिते, बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे प्रमोद काटे, गोरख गडशिंग, राजकुमार अलगुडे, व वेटलिफ्टींग, पॉवर लिफ्टिंग निवड चाचणीचे पंचाचे काम एंस.टी. राऊत, बी.बी. लोंढे, आर.एस. माने, समाधान याडगे, शेषराज कोकाटे, अविनाश कोकाटे यांनी पाहिले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संघात निवड झालेले वेटलिफ्टिंग खेळाडू - सूरज यादव, पांडुरंग गायकवाड, संकेत जांभळे, ज्ञानेश्वर जाधव, धिरज सरगर, क्षीरसागर शुभम, भोसले नवनाथ, काळे गणेश शरीर सौष्ठवमध्ये प्रथम खेळाडू-विर्जेंद्र बंबेवाले, शुभम बनसोडे, आकाश बनकर, आकाश सरवशे, शुभम जगताप यांची निवड झाली आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अरविंद वायमोडे यांनी केले तर आभार प्रा. बी.एस. भोसले यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. दादासाहेब कोकाटे यांनी केले.

सुराज्य सोलापूर

गुरुवार, दि. ३ मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी संशोधन करावे : डॉ. बागडे

✔ सुराज्य/अकलूज



अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी डॉ. सी. व्ही. रामन यांच्या संशोधन कार्याचा आढावा घेतला व विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून समाजोपयोगी संशोधन करण्याचे आव्हान केले.

अध्यक्षस्थानी रसायनशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सतीश देवकर हे होते. या कार्यक्रमात प्रा. दमयंती कांबळे, प्रा.लखन साळुंखे,प्रा.रणजीत सुर्वे यांनी आपले विचार मांडले.

कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. हनुमंत अवताडे उपस्थित होते. विज्ञान दिनानिमित्त बी.एस्सी.भाग तीन मधील विद्यार्थ्यांसाठी पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेमध्ये ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.पोस्टर स्पर्धेचे परीक्षण डॉ. संभाजीराव भोसले व डॉ.अप्पासाहेब बाबर यांनी केले. याप्रसंगी काही विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.उत्तम वाघमोडे, प्रा.स्नेहल पिसे, प्रा.कु.रोहिणी वसेकर, प्रा. प्रतीक्षा गायकवाड व प्रा.सौ.प्रीती पिसे यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन बी.एस्सी. भाग ३ मधील विद्यार्थी सौरभ कुंभार यांनी केले व आभार प्रदर्शन ईश्वरी झिरपे यांनी केली.

# जनसत्य

सोलापूर-उस्मानाबाद-गुलबर्गा जिल्ह्यातून एकाचवेळी वितरीत होणारे दैनिक

www.dainikjansat
epaperdai

Email : jansatya2013@gmail.com

मंगळवार, दि. १५ मार्च २०२२ • पाने : ८


Shankarrao Mohite Mahavidyalaya Akluj - 413101 Library



## अकलूजच्या गृहविज्ञान महिला महाविद्यालय गुणवत्ता यादीमध्ये

**जनसत्य प्रतिनिधी**

**अकलूज :** शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयाचा बी. एससी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचा एस.एन. डी. टी. महिला विद्यापीठाचा निकाल नुकताच जाहीर झाला. महाविद्यालयाचा बी. एससी. प्रथम वर्षाचा निकाल ९६.६६ टक्के, द्वितीय वर्षाचा निकाल ७२.३४ टक्के व तृतीय वर्षाचा निकाल ९५.२३ टक्के लागला असून विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महाविद्यालयातील तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. बतुल रौफ तांबोळी हिने बी. एससी. (होम सायन्स) पदवी परीक्षेत विद्यापीठात सर्वाधिक गुण (९३.८० टक्के) मिळवत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत द्वितीय क्रमांक पटकाऊन श्रीमती सुशीलाबाई डी. मोरारजी पारितोषिक प्राप्त केले.

कला, क्रीडा व सांस्कतिक क्षेत्रामध्ये एस.एन. डी. टी. महिला विद्यापीठात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या या महाविद्यालयाने यावर्षी देखील भरघोस यश संपादन केले. विद्यापीठ परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केलेली विद्यार्थिनी कू. बतूल रौफ तांबोळी हीचा सत्कार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, यांचे हस्ते करण्यात आला तसेच शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील, महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे व सहसचिव हर्षवर्धन खराडे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे, यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पुण्य नगरी
SMART
मंगळवार,१५ मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Akluj - 413101
Library



# श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयाचे यश

**अकलूज / प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयाचा बी.एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचा एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाचा निकाल नुकताच जाहीर झाला. महाविद्यालयाचा बी.एस्सी.प्रथम वर्षाचा निकाल ९६.६६ टक्के, द्वितीय ७२.३४ टक्के व तृतीय ९५.२३ टक्के लागला आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महाविद्यालयातील तृतीय वर्षाची विद्यार्थिनी बतुल रौफ तांबोळी हिने बी.एस्सी. (होम सायन्स) पदवी परीक्षेत विद्यापीठात सर्वाधिक गुण (९३.८० टक्के) मिळवत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत द्वितीय क्रमांक पटकाऊन श्रीमती सुशीलाबाई डी. मोरारजी पारितोषिक प्राप्त केले.

गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केलेली विद्यार्थिनी बतूल रौफ तांबोळी हिचा सत्कार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे व सहसचिव हर्षवर्धन खराडे, प्र.प्राचार्य डॉ.राहुल सुर्वे यांनी अभिनंदन केले.

सुराज्य सोलापूर
मंगळवार, दि. १५ मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Akluj - 413101
Library



# मोहिते-पाटील महाविद्यालयाचे यश

सुराज्य/अकलूज : शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयाचा बी. एससी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचा एस.एन. डी.टी. महिला विद्यापीठाचा निकाल नुकताच जाहीर झाला. महाविद्यालयाचा बी. एससी. प्रथम वर्षाचा निकाल ९६.६६ टक्के, द्वितीय वर्षाचा निकाल ७२.३४ टक्के व तृतीय वर्षाचा निकाल ९५.२३ टक्के लागला असून विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महाविद्यालयातील तृतीय वर्षाची विद्यार्थिनी बतुल रौफ तांबोळी हिने बी. ऐससी. (होम सायन्स) पदवी परीक्षेत विद्यापीठात सर्वाधिक गुण (९३.८० टक्के) मिळवत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत द्वितीय क्रमांक पटकावून श्रीमती सुशीलाबाई डी. मोरारजी पारितोषिक प्राप्त केले. कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या या महाविद्यालयाने यावर्षी देखील भरघोस यश संपादन केलेले आहे. विद्यापीठ परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केलेली विद्यार्थिनी बतूल रौफ तांबोळी हिचा सत्कार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते करण्यात आला. तसेच शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते-पाटील, महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील, सचिव अभिजित रणवरे व सहसचिव हर्षवर्धन खराडे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांनी अभिनंदन केले. तसेच तिचा एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाच्या ७१ व्या दीक्षांत समारंभात पारितोषिक राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती भगतसिंग कोश्यारी यांचे हस्ते व कुलगुरु डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांचे उपस्थितीत देऊन गौरव करण्यात आला.

सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. १९ मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101

# संशोधनात कठोर परिश्रमाला पर्याय नाही : डॉ. खांडेकर

✔ सुराज्य/अकलूज

अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या हिंदी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या संयुक्त विद्यमाने अनुसंधान प्रविधि और प्रक्रिया या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन संगमेश्वर कॉलेज, सोलापूर येथील हिंदी विभागाचे प्रो.डॉ. दादासाहेब खांडेकर यांच्या हस्ते झाले तर उद्घाटन सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. दत्तात्रय बागडे होते.

यावेळी प्रा.डॉ.दादासाहेब खांडेकर यांनी कार्यशाळेस मार्गदर्शन करताना म्हणाले की, संशोधनासाठी शोधार्थी आणि मार्गदर्शक दोघांसाठीही हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. शोध विषय आणि अभ्यासक्रम यातील अंतर समजण्यासाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयोगी असल्याचे ही त्यांनी सांगितले. संशोधन क्षेत्रातील वास्तव स्पष्टपणे सांगून विद्यार्थ्यांना कठोर परिश्रमाला पर्याय नसल्याचे स्पष्ट केले.अध्यक्षीय भाषणात प्रो. डॉ.बागडे यांनी संशोधनाची विषय निवड,शोध-प्रबंधाचे शीर्षक तसेच शोधकार्याची उद्दीष्टे स्पष्ट असणे आवश्यक असल्याचे सांगितले. संशोधन समाजोपयोगी, पारदर्शक असणे आवश्यक असल्याचे सांगून संशोधन नैतिक मूल्यांचे अनुसरण करणारे असावे.

प्रथम सत्रात डॉ. राजेंद्र वडजे (सोलापूर) यांनी संशोधन अर्थ, व्याख्या, स्वरुप, उद्दीष्टे आणि प्रकारांवर प्रकाश टाकला. दुसऱ्या सत्रात डॉ.नवनाथ शिंदे (सांगोला) यांनी संशोधन पद्धती, संशोधक आणि मार्गदर्शक यांच्या साठी आवश्यक असणारे गुण यांचे विश्लेषण केले. तिसऱ्या सत्रात प्रो.डॉ.दादासाहेब खांडेकर



(सोलापूर) यांनी संशोधनाची प्रकिया आणि सहाय्यक सामग्रीचे विवेचन केले. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी IQC चे डॉ. आप्पासाहेब बाबर,प्रा. प्रसाद लोहार, प्रा.रविराज सोनवणे, डॉ.पल्लवी मिसाळ, प्रा.विजया बागल, प्रा.स्मिता पाटील, डॉ.चंद्रशेखर ताटे-देशमुख, प्रा.अरविंद वायमोडे, डॉ. आण्णासाहेब नलवडे, डॉ.अनिल कांबळे, ग्रंथपाल डॉ.दत्तात्रय पाटील, सर्व ग्रंथालय स्टाफ, सलिम शेख, शुभम बनपट्टे, पूजा सुरवसे, कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे, बाळासाहेब काटे तसेच हिंदी विभागाचे आजी-माजी विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेसाठी इंदापूर, करमाळा, सांगोला येथील व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक, प्राध्यापिका बहुसंख्येने उपस्थित होते.या कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ.अपर्णा कुचेकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. निवृत्ती लोखंडे यांनी केले कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. आशा गायकवाड व डॉ. तायाजी लोंढे यांनी केले.

जनमत सर्वसामान्यांचे

शनिवार, १९ मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# संशोधनात कठोर परीश्रमाला पर्याय नाही : प्रो.डॉ.दादासाहेब खांडेकर

संग्रामनगर दि.१८ (प्रतिनिधी)- येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या हिंदी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQC) च्या संयुक्त विद्यमाने अनुसंधान प्रविधि और प्रक्रिया या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न झाली.या कार्यशाळेचे उद्घाटन संगमेश्वर कॉलेज, सोलापूर येथील हिंदी विभागाचे प्रो.डॉ. दादासाहेब खांडेकर यांच्या हस्ते झाले तर उद्घाटन सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ दत्तात्रय बागडे होते.

यावेळी प्रो.डॉ.दादासाहेब खांडेकर यांनी कार्यशाळेस मार्गदर्शन करताना म्हणाले की,संशोधनासाठी शोधार्थी आणि मार्गदर्शक दोघांसाठीही हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. शोध विषय आणि अभ्यासक्रम यातील अंतर सम जण्यासाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयोगी असल्याचे ही त्यांनी सांगितले.संशोधन क्षेत्रातील वास्तव स्पष्टपणे सांगून विद्यार्थ्यांना कठोर परिश्रमाला पर्याय नसल्याचे स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात प्रो.डॉ.बागडे यांनी संशोधनाची विषय निवड,शोध-प्रबंधाचे शीर्षक तसेच शोधकार्याची उद्दीष्टे स्पष्ट असणे आवश्यक असल्याचे सांगितले. संशोधन समाजोपयोगी, पारदर्शक असणे आवश्यक असल्याचे सांगून संशोधन नैतिक मूल्यांचे अनुसरण करणारे असावे.

प्रथम सत्रात डॉ राजेंद्र वडजे (सोलापूर) यांनी संशोधन अर्थ, व्याख्या, स्वरूप, उद्दीष्टे आणि



प्रकारांवर प्रकाश टाकला. दुसऱ्या सत्रात डॉ.नवनाथ शिंदे (सांगोला) यांनी संशोधन पद्धती,संशोधक आणि मार्गदर्शक यांच्या साठी आवश्यक असणारे गुण यांचे विश्लेषण केले. तिसऱ्या सत्रात प्रो.डॉ. दादासाहेब खांडेकर (सोलापूर) यांनी संशोधनाची प्रकिया आणि सहाय्यक सामग्रीचे विवेचन केले.

चौथ्या सत्रात डॉ.संजय मुजमूले (भोसे क.) यांनी वेगवेगळ्या साहित्य प्रकाराच्या दृष्टीने तुलनात्मक संशोधन करण्याच्या बाबतीत मार्गदर्शन केले. सांगता समारंभाचे अध्यक्ष खठउ चे समन्वयक डॉ. हनमंत अवताडे यांनी भाषेच्या दृष्टीने संशोधन होणे आवश्यक असल्याचे सांगितले तसेच सर्व भाषा समान असल्याचे प्रतिपादन केले यावेळी डॉ.पवार मॅडम (इंदापूर) व नसिमा तांबोळी (करमाळा) या सहभागींनी कार्यशाळेविषयी मनोगत व्यक्त केले.

हि कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी IQC चे डॉ. आप्पासाहेब बाबर, प्रा.प्रसाद लोहार, प्रा.रविराज सोनवणे, डॉ.पल्लवी मिसाळ, प्रा.विजया बागल, प्रा.स्मिता पाटील, डॉ.चंद्रशेखर ताटे-देशमुख,प्रा.अरविंद वाघमोडे, डॉ.आण्णासाहेब नलवडे, डॉ.अनिल कांबळे, ग्रंथपाल डॉ.दत्तात्रय पाटील, सर्व ग्रंथालय स्टाफ, सलिम शेख, शुभम बनपटटे,पूजा सुरवसे,कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे, बाळासाहेब काटे तसेच हिंदी विभागाचे आजी-माजी विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेसाठी इंदापूर, करमाळा, सांगोला येथील व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक, प्राध्यापिका बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ.अपर्णा कुचेकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.निवृत्ती लोखंडे यांनी केले कार्यशाळेचे सुत्र-संचालन प्रा.आशा गायकवाड व डॉ. तायाजी लोंढे यांनी केले.

# जनमत सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

मंगळवार २२ मार्च २०२२


Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

## शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे मौजे वाफेगाव येथे उद्घाटन संपन्न

संग्रामनगर दि.२१ (प्रतिनिधी)– शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन वाफगाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले.या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून वाफेगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दत्तात्रय सुखदेव हेंबाडे हस्ते करण्यात आले तर शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मारुती मनोहर घोडके हे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे हे उपस्थित होते.



कार्यक्रमाचे उद्घाटक प्रसंगी दत्तात्रय सुखदेव हेंबाडे यांनी आपल्या भाषणात असे सांगितले की, आपल्या महाविद्यालयातील स्वयंसेवकांच्या माध्यमातून गावांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीने एक मोठे काम हाती घेण्यात आले आहे. या कामात ग्रामस्थ देखील मोठ्या प्रमाणात आपल्यास मदत करतील तसेच एकजुटीने काम करण्याचे त्यांनी ग्रामस्थांना आवाहन केले. तसेच मारुती मनोहर घोडके यांनी आपल्या भाषणातून समाजकार्याच्या माध्यमातून जे अनुभव आहेत ते विद्यार्थ्यांना सांगितले व विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेत युवकांची भूमिका काय असते,राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट व कर्तव्य या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. चंद्रशेखर ताटे देशमुख,ग्रामस्थांमध्ये विठ्ठल गायकवाड,दत्तात्रय चव्हाण,संग्राम शिंदे, शंभूदेव सरवदे,दयानंद शिंदे,लखन हारगे,अंबादास गायकवाड,किसन गायकवाड,एकनाथ शिंदे, ग्रामसेवीका क्षिरसागर मॅडम,दत्ता देवकर,मधुकर जाधव,रघुनाथ शिंदे,दत्तात्रय मिसाळ उत्तम भोई व वाफेगाव मधील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.चंकेश्वर लोंढे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सविता सातपुते यांनी मानले, कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजनेचा माजी स्वयंसेवक किरण भांगे यांनी केले.

जनसत्य
■ सोलापूर-उस्मानाबाद-गुलबर्गा जिल्ह्यातून एकाचवेळी वितरीत होणारे दैनिक
Email : jansatya2013@gmail.com
गुरुवार, दि. २४ मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# सामाजिक समतेसाठी प्रयत्न करा: डॉ. आवड




**अकलूज :** शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे वाफेगाव याठिकाणी सुरू असून शिबिराच्या आजच्या चौथ्या दिवशी गाव समाज व राष्ट्र विकासातील युवकांची भूमिका या विषयावर डॉ. विश्वनाथ आवड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता सातपुते ह्या होत्या.

प्रमुख वक्त्यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिबिरामध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व गावा गावातील युवाशक्ती एकत्र आली तर समाजात भली मोठी ताकद निर्माण होऊ शकते .समाज कार्याच्या माध्यमातून चालत असणाऱ्या माणुसकीची खिडकी, माणुसकीची भिंत, पाटोदा एकं आदर्श गाव इ. योजनांची माहिती त्यांनी आपल्या व्याख्यानातून दिली. तसेच जातीपातीच्या भिंती नाहीश्यां करण्यासाठी अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन करणं खूप गरजेचं आहे. कारण प्रसार माध्यमाच्या साधनांनी नवीन पिढी बिघडत चालली आहे. पण या साधनांचा चांगल्या कार्यासाठी उपयोग केला तर नक्कीच त्याचा फायदा होईल, जर माणसाचे चरित्र शुद्ध असेल तर माणसं आपोआप जवळ येतात आणि म्हणून या शिबिराच्या माध्यमातून चारित्र्य संवर्धन आणि मूल्य संवर्धन करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर बाजारावर आधारित कौशल्य निर्माण करा असा संदेश त्यांनी आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना दिला. समाज माध्यमांचा वापर योग्य पद्धतीने करा याचा वापर चुकीच्या पद्धतीने झाला तर त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील. त्यामुळे चांगल्या वागणुकीने आपण मोठं होऊयात.

सुराज्य सोलापूर

गुरुवार, दि. २४ मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *




# समृद्ध समाजासाठी सामाजिक समता महत्त्वाची : डॉ.आवड

✓ सुराज्य/अकलूज : समृध्द समाजासाठी सामाजिक समता महत्त्वाची आहे. यासाठी जातीपातीच्या भिंती नष्ट करणे ही आता सर्वांची जबाबदारी आहे.गावा गावातील युवाशक्ती एकत्र आली तर समाजात भली मोठी ताकद निर्माण होऊ शकते.प्रसार माध्यमाच्या साधनांनी नवीन पिढी बिघडत चालली आहे. पण या साधनांचा चांगल्या कार्यासाठी उपयोग केला तर नक्कीच त्याचा फायदा होईल असे मत डॉ विश्वनाथ आवड यांनी व्यक्त केले. शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे वाफेगाव याठिकाणी सुरू असून शिबिराच्या चौथ्या दिवशी गाव समाज व राष्ट्र विकासातील युवकांची भूमिका या विषयावर डॉ. विश्वनाथ आवड यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता सातपुते ह्या होत्या.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ आवड पुढे म्हणाले की,जर माणसाचे चरित्र शुध्द असेल तर माणसं आपोआप जवळ येतात आणि म्हणून शिबिराच्या माध्यमातून चारित्र्य संवर्धन आणि मूल्य संवर्धन करणे गरजेचे आहे.समाज माध्यमांचा वापर योग्य पध्दतीने करा याचा वापर चुकीच्या पध्दतीने झाला तर त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील.या कार्यक्रमासाठी श्री.शंकर सहकारी साखर कारखाना सदाशिवनगर चे संचालक दत्तात्रय चव्हाण,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सी.बी लोंढे, प्रा.दादासाहेब कोकाटे व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उ थत होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक रामप्रसाद डोंगरे, सूत्रसंचलन ऋतुजा गायकवाड व आभार प्रदर्शन प्रशांत वाघमारे यांनी केले.

# जनमत

## सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०

सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

गुरूवार २४ मार्च २०२२


Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *




# सामाजिक समतेसाठी प्रयत्न करा: डॉ.विश्वनाथ आवड

संग्रामनगर दि.२३ (प्रतिनिधी)– शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे वाफ गाव याठिकाणी सुरू असून शिबिराच्या आजच्या चौथ्या दिवशी गाव समाज व राष्ट्र विकासातील युवकांची भूमिका या विषयावर डॉ.विश्वनाथ आवड यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ.सविता सातपुते ह्या होत्या. प्रमुख वक्त्यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिबिरामध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व गावा गावातील युवाशक्ती एकत्र आली तर समाजात भली मोठी ताकद निर्माण होऊ शकते.समाज कार्याच्या माध्यमातून चालत असणाऱ्या माणुसकीची खिडकी,माणुसकीची भिंत,पाटोदा एक आदर्श गाव इ.योजनांची माहिती त्यांनी आपल्या व्याख्यानातून दिली. तसेच जातीपातीच्या भिंती नाहीश्या करण्यासाठी अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन करणं खूप गरजेचं आहे.कारण प्रसार माध्यमाच्या साधनांनी नवीन पिढी बिघडत चालली आहे.पण या साधनांचा चांगल्या कार्यासाठी उपयोग केला तर नक्कीच त्याचा फायदा होईल,जर माणसाचे चरित्र शुद्ध असेल तर माणसं आपोआप जवळ येतात आणि म्हणून या शिबिराच्या माध्यमातून चारित्र्य संवर्धन आणि मूल्य संवर्धन करणे गरजेचे आहे.त्याचबरोबर बाजारावर आधारित कौशल्य निर्माण करा असा संदेश त्यांनी आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना दिला.समाज माध्यमांचा वापर योग्य पद्धतीने करा याचा वापर चुकीच्या पद्धतीने झाला तर त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील.त्यामुळे चांगल्या वागणुकीने आपण मोठं होऊयात.चांगलं काम करणारा युवक तुकारामांच्या गाथे प्रमाणे असतो. समाज घडवत असताना आपले कुटुंब सुधारा गाव बदलतील आणि देशाचा विकास होईल यासाठी विकासाची सुरुवात आपल्या घरापासून करा.अशा प्रकारचे मत त्यांनी आपल्या व्याख्यानातून व्यक्त केले.

पुढारी
MY सोलापूर
शनिवार, २६ मार्च २०२२

# सामाजिक समतेसाठी प्रयत्न करा : डॉ. आवड

अकलूज : पुढारी वृत्तसेवा

शिक्षण प्रसारक मंडळाच्या शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर वाफेगाव येथे सुरू आहे. या शिबिरात 'गाव, समाज व राष्ट्र विकासातील युवकांची भूमिका' या विषयावर डॉ. विश्वनाथ आवड यांनी व्याख्यान दिले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता सातपुते या उपस्थित होत्या. डॉ. विश्वनाथ आवड म्हणाले, गावा-गावांतील युवाशक्ती एकत्र आली तर समाजात भली मोठी ताकद निर्माण होऊ शकते. समाजकार्याच्या माध्यमातून चालत असणाऱ्या माणुसकीची खिडकी, माणुसकीची भिंत, पाटोदा एक आदर्श गाव आदी योजनांची माहिती त्यांनी आपल्या व्याख्यानातून दिली. तसेच जातीपातीच्या भिंती नाहीशा करण्यासाठी अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन करणे खूप गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.




अकलूज : शिबिराप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. विश्वनाथ आवड.

या कार्यक्रमासाठी श्री शंकर सहकारी साखर कारखाना सदाशिवनगरचे संचालक दत्तात्रय चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सी.बी. लोंढे, प्रा. दादासाहेब कोकाटे व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामप्रसाद डोंगरे, सूत्रसंचालन ऋतुजा गायकवाड व आभार प्रशांत वाघमारे यांनी मानले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

सुराज्य सोलापूर
मंगळवार, दि. २९ मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Akluj 413101 Library



# शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर संपन्न

अकलूज : अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे वाफेगाव या ठिकाणी दिनांक २० मार्च २०२२ ते २६ मार्च २०२२ या कालावधीत संपन्न झाले. या शिबिराच्या समारोपासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांचे व ग्रामस्थांचे अभिनंदन केले. समाजकार्यात सहभागी होत असताना कोणतेही काम हे जीव ओतून केले तर ते काम पूर्णत्वास जाते असे सांगितले. त्यासाठी तरुण पिढीने गावातील आणि समाजातील समस्या ओळखून त्याची जाणीव ठेवून काम करावे, तरच खऱ्या अर्थाने गावाचा व देशाचा विकास होईल.तसेच विद्यार्थ्यांनी सोशल मिडियाचा सकारात्मक दृष्टीने वापर करुन त्याचा वापर आपल्या उन्नतीसाठी करावा, असे सांगितले. या शिबिरामध्ये योगा प्रशिक्षण, स्वच्छता अभियान, मंदिर स्वच्छता, स्मशानभूमी स्वच्छता, रस्ते निर्मिती, वृक्षारोपण, प्राचीन संस्कृती जपण्यासाठी महिला मेळाव्याचे आयोजन, मोफत आरोग्य शिबिर, शोषखड्डे, बौद्धिक व्याख्याने, भारुड सादरीकरण, पथनाट्याचे सादरीकरण, प्रभात फेरी इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सी.बी. लोंढे, प्रा.दादासाहेब कोकाटे, डॉ.सविता सातपुते, कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे मौजे वाफेगाव मधील सर्व ग्रामस्थ, जि.प.प्रा.शाळा वाफेगाव मधील सर्व शिक्षक व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सी.बी.लोंढे यांनी केले. सुत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचा माजी स्वयंसेवक नागनाथ साळवे यांनी केले तर आभार कु.प्रिया भाकरे हिने मानले. संपूर्ण शिबिर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या कु.स्वरुपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवक स्वयंसेविका यांचे सहकार्य लाभले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101






# शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर संपन्न

संग्रामनगर दि.२८ (प्रतिनिधी)– अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे वाफेगाव या ठिकाणी दिनांक २० मार्च २०२२ ते २६ मार्च २०२२ या कालावधीत संपन्न झाले.या शिबिराच्या समारोपासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते पाटील तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांचे व ग्रामस्थांचे अभिनंदन केले.व समाजकार्यात सहभागी होत असताना कोणतेही काम हे जीव ओतून केले तर ते काम पूर्णत्वास जाते असे सांगितले. त्यासाठी तरुण पिढीने गावातील आणि समाजातील समस्या ओळखून त्याची जाणीव ठेवून काम करावे,तरच खऱ्या अर्थाने गावाचा व देशाचा विकास होईल. तसेच विद्यार्थ्यांनी सोशल मिडियाचा सकारात्मक दृष्टीने वापर करून त्यांचा वापर आपल्या उन्नतीसाठी करावा असे सांगितले.

तर अध्यक्षीय भाषणात डॉ.दत्तात्रय बागडे यांनी महाविद्यालयाच्या वेगळ्या विभागाच्या माध्यमातून होत असलेल्या कार्याचा आढावा घेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. विद्यार्थ्यांना सामाजिक समस्यांची जाणीव होते व त्या समस्या सोडवण्यासाठी प्रत्येक गावातून विद्यार्थ्यांच्या सामाजिक चळवळी निर्माण होत असल्याचे सांगितले.

या शिबिरामध्ये योगा प्रशिक्षण,स्वच्छता अभियान,मंदिर स्वच्छता,स्मशानभूमी स्वच्छता,रस्ते निर्मिती,वृक्षारोपण,प्राचीन संस्कृती जपण्यासाठी महिला मेळाव्याचे आयोजन,मोफत आरोग्य शिबीर,शोषखड्डे,बौद्धिक व्याख्याने, भारुड सादरीकरण,पथनाट्याचे सादरीकरण,प्रभात फेरी इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सी.बी.लोंढे,प्रा.दादासाहेब कोकाटे,डॉ.सविता सातपुते, कार्यालयीन अधीक्षक युवराज मलुसरे मौजे वाफेगाव मधील सर्व ग्रामस्थ,जि.प.प्रा.शाळा वाफेगाव मधील सर्व शिक्षक व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सी.बी.लोंढे यांनी केले. सुत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजनेचा माजी स्वयंसेवक नागनाथ साळवे यांनी केले तर आभार कु.प्रिया भाकरे हिने मानले. संपूर्ण शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. संग्रामसिंह जयसिंह मोहिते पाटील, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या कु.स्वरुपाराणी जयसिंह मोहिते पाटील,महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजीत रणवरे,सहसचिव हर्षवर्धन खराडे –पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य,सर्व प्राध्यापक,राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवक स्वयंसेविका यांचे सहकार्य लाभले.

सुराज्य सोलापूर

बुधवार, दि. ३० मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



# केंद्र सरकार लागू करत असणारे शैक्षणिक धोरण महाविद्यालया पुढे आव्हाने : पद्मजादेवी

✔ सुराज्य/नातेपुते

अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर पदे भरण्यात यावीत; नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी कोर्सेस अभ्यासक्रम राबवावे, युजीसी कडून प्लॅन व नॉन प्लॅन अनुदान धोरण पुनश्च सुरु करण्यात यावेत, रुसा राष्ट्रीय शिक्षण आयोगाकडून सर्व महाविद्यालयांना मिळावेत तसेच चाळीस टक्के रकमेचा महाविद्यालयाचा हिस्सा रद्द करण्यात यावा व वेतनेतर अनुदान देण्यात यावेत, २००१ नंतर महाविद्यालयात सुरु असलेले विषय, तुकड्या, व विद्याशाखा यांना अनुदान देण्यात यावेत नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अनेक त्रुटी आहेत. केंद्र सरकार लागू करत असणारे शैक्षणिक धोरण महाविद्यालयांच्या पुढे आव्हाने असल्याचे मत उच्च शिक्षण संस्था चालक सेवाभावी संघटनेच्या अध्यक्षा पद्मजादेवी मोहिते-पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले.

त्या नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयात उच्च शिक्षण संस्था चालक सेवाभावी संस्था सोलापूर व सोलापूर जिल्हा प्राचार्य संघटना यांची २०२१-२२ मधील वार्षिक घेण्यात आलेल्या बैठक कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्याच्या प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष डॉ.आबासाहेब देशमुख, डॉ.पी.बी. रोंगे, उच्च शिक्षण संस्था चालक सेवाभावी संघटनेचे सचिव जयप्रकाश बिले, प्राचार्य संघटनेचे प्राचार्य जमादार व संस्था चालक डॉ.दीपक खाटकळे यांनी विविध विषयांवर व भविष्यात उद्‌भवणाऱ्या आव्हानांवर चर्चा करुन आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत कोळेकर यांनी केले.

या वार्षिक बैठकीला शिवाजी नाईट कॉलेजचे संस्थापक मनोहर सपाटे, सूरज रोंगे, मंगळवेढ्याचे किसनराव गवळी, बार्शीचे जयकुमार शितोळे, कार्यकारणी सदस्य दिलीपराव रेवडकर, डॉ.मगन सुरवसे, माढा शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त डॉ.आर.आर. पाटील, यु.एम. राव तसेच विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.प्रभूनाथ फुले, प्राचार्य विजयकुमार घाडगे, प्राचार्य दादासाहेब साळुंखे, डॉ.निवृत्ती पवार, डॉ. एस. बी. क्षीरसागर, डॉ.दत्तात्रय बागडे, मदन सुरवसे, प्राचार्य महेंद्र कदम, प्राचार्य धुतरगाव प्राचार्य राजमाने ही मान्यवर मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.बाळासाहेब निकम, प्रा.डॉ.. राजेंद्र खंदारे प्रा.रज्जाक शेख यांनी केले तर संस्था चालक मनोहर सपाटे यांनी आभार मानले.

पुढारी
MY सोलापूर
बुधवार, ३० मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिर

अकलूज : पुढारी वृत्तसेवा

अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर वाफेगाव येथे २० मार्च ते २६ मार्च या कालावधीत झाले.

या शिबिराच्या समारोपासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे हे उपस्थित होते.




अकलूज : श्रमसंस्कार शिबिरात मार्गदर्शन करताना जयसिंह मोहिते-पाटील. याप्रसंगी उपस्थित मान्यवर.

जयसिंह मोहिते-पाटील म्हणाले की, समाजकार्यात सहभागी होत असताना कोणतेही काम हे जीव ओतून केले तर ते काम पूर्णत्वास जाते. त्यासाठी तरुण पिढीने गावातील आणि समाजातील समस्या ओळखून त्याची जाणीव ठेवून काम करावे, तरच खऱ्या अर्थाने गावाचा व देशाचा विकास होईल. तसेच, विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा सकारात्मक दृष्टीने वापर करून त्याचा वापर आपल्या उन्नतीसाठी करावा असे सांगितले.

डॉ. दत्तात्रय बागडे यांनी महाविद्यालयाच्या वेगळ्या विभागाच्या माध्यमातून होत असलेल्या कार्याचा आढावा घेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. विद्यार्थ्यांना सामाजिक समस्यांची जाणीव होते व त्या समस्या सोडवण्यासाठी प्रत्येक गावातून विद्यार्थ्यांच्या सामाजिक चळवळी निर्माण होत असल्याचे सांगितले.

या शिबिरामध्ये योगा प्रशिक्षण, स्वच्छता अभियान, मंदिर स्वच्छता, स्मशानभूमी स्वच्छता, रस्ते निर्मिती, वृक्षारोपण, प्राचीन संस्कृती जपण्यासाठी महिला मेळाव्याचे आयोजन, मोफत आरोग्य शिबिर, शोषखड्डे, बौद्धिक व्याख्याने, भारुड सादरीकरण, पथनाट्याचे सादरीकरण, प्रभात फेरी आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सी.बी. लोंढे, प्रा. कोकाटे, डॉ. सविता सातपुते, कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन नागनाथ साळवे यांनी केले, तर आभार प्रिया भाकरे यांनी मानले.

# जनमत
## सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

बुधवार ३० मार्च २०२२


Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# नातेपुते येथे उच्च शिक्षण संस्था चालक सेवाभावी संघटना व सोलापूर जिल्हा प्राचार्य संघटनेची वार्षिक बैठक संपन्न



नातेपुते दि.२९ (प्रतिनिधी):– नातेपुते येथे सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयात उच्च शिक्षण संस्था चालक सेवाभावी संस्था सोलापूर व सोलापूर जिल्हा प्राचार्य संघटना यांची २०२१–२२ मधील वार्षिक बैठक संपन्न झाली.

२०२१–२२ मधील वार्षिक बैठक सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा पद्मजादेवी मोहिते पाटील यांच्या अध्यक्षेखाली संपन्न झाली. या बैठकीमध्ये अशासकीय अनुदानित विना अनुदानित महाविद्यालयाच्या विविध प्रश्नावर चर्चा करण्यात आली. केंद्र सरकारने लागू करण्यात येणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरणातून उद्भवणाऱ्या प्रश्नावर प्राचार्य महाराष्ट्र राज्याच्या प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. आबासाहेब देशमुख , डॉ. पी. बी. रोंगे, उच्च शिक्षण संस्था चालक सेवाभावी संघटनेचे सचिव जयप्रकाश बिले, प्राचार्य संघटनेचे प्राचार्य जमादार व संस्था चालक डॉ. दीपक खाटकळे या सर्वांनी शिक्षण क्षेत्रात बदलू पाहणाऱ्या विषयावर अभ्यासपूर्ण सखोल चर्चा केली. नवीन शैक्षणिक धोरण हे संस्था, प्राध्यापक आणि विद्यार्थी या सर्वांचे नुकसान करणार असल्याचे मत व्यक्त केले.

उच्च शिक्षण संस्था चालक सेवाभावी संघटनेच्या अध्यक्षा पद्मजादेवी मोहिते पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य व संस्था चालकांच्या संदर्भात बोलताना त्या म्हणाल्या, केंद्र सरकारने लागू करण्यात येणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरण हे ग्रामीण भागातील महाविद्यालयांच्या पुढे अनेक आव्हाने निर्माण करणारे आहे. त्यामध्ये प्रामुख्याने अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर पदे भरण्यात यावीत, नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी कोर्सेस अभ्यासक्रम राबविणे, युजीसी कडून प्लॅन व नॉन प्लॅन अनुदान धोरण पुनश्च सुरु करण्यात यावेत, रुसा राष्ट्रीय शिक्षण आयोगाकडून सर्व महाविद्यालयांना मिळावेत तसेच चाळीस टक्के रकमेचा महाविद्यालयाचा हिस्सा रद्द करण्यात यावा, वेतनेतर अनुदान देण्यात यावेत, २००१ नंतर महाविद्यालयात सुरु असलेले विषय, तुकड्या, व विद्याशाखा यांना अनुदान देण्यात यावेत या विविध विषयांवर व आव्हानांवर चर्चा करून सहभागी संस्था चालक व प्राचार्यांनीआपले विचार व्यक्त केले. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अनेक त्रुटी आहेत. त्यातून संस्था, प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्याविषयी नवे प्रश्न निर्माण होणार असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत कोळेकर यांनी केले. या वार्षिक बैठकीला शिवाजी नाईट कॉलेजचे संस्थापक मनोहर सपाटे, सूरज रोंगे, मंगळवेढ्याचे किसनराव गवळी, बार्शी चे जयकुमार शितोळे, कार्यकारणी सदस्य दिलीपराव रेवडकर, डॉ मगन सुरवसे, माढा शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त डॉ. आर आर पाटील, यु. एम. राव तसेच विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रभूनाथ फुले, प्राचार्य विजयकुमार घाडगे, प्राचार्य दादासाहेब साळुंखे, डॉ. निवृत्ती पवार, डॉ. एस. बी. क्षीरसागर, डॉ दत्तात्रय बागडे, मदन सुरवासे , प्राचार्य महेंद्र कदम, प्राचार्य धुतरगाव प्राचार्य राजमाने ही मान्यवर मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब निकम, प्रा. डॉ राजेंद्र खंदारे प्रा. रज्जाक शेख यांनी केले तर संस्था चालक मनोहर सपाटे यांनी आभार मानले.

सुराज्य सोलापूर
गुरुवार, दि. ३१ मार्च २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# अकलूज येथे चिमणी दिवसानिमीत्त कार्यशाळा



✓ सुराज्य/अकलूज

अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक चिमणी दिवसानिमित्त कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून सांगोला कॉलेजचे प्राणी शास्त्र विभागाचे प्रा.डॉ. विधिन कांबळे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे होते. या कार्यक्रमाची सुरुवात माळशिरस तालुक्याचे भाग्यविधाते सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील व अक्कासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील वनस्पती शास्त्र प्रमुख प्रा. रामभाऊ सावळजकर, प्रा. एस.यु. शिंदे, प्रा. अभिता रायपल्ली, प्रा. अर्चना पवार, प्रा. नूर मुजावर, प्रा. अप्पासाहेब व्यवहारे, गणपतराव लोंढे, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्राणी शास्त्र विभांग प्रमुख प्रा.डॉ.. सुधा बनसोडे यांनी केले सुत्रसंचलन प्रा. पुजा सावंत यांनी केले तर आभार प्रा. पद्मा रहाटे यांनी मानले.

सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. ९ एप्रिल २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# लंडनच्या जागतिक कार्यशाळेत अकलूजच्या प्रा.डॉ.बनसोडे यांचे व्याख्यान

✔ सुराज्य/अकलूज

अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुधा बनसोडे यांचे लंडन येथे जागतिक चर्चा सत्र मानवी आनुवंशिकता या विषयावर दि.२१ ते २४ रोजी होत आहे. या चर्चा सत्रामध्ये डॉ.सुधा बनसोडे यांचे मानवी आनुवंशिकता या विषयावर व्याख्यान देणार आहेत. तसेच डॉ.सुधा बनसोडे यांचे बरेच पेपर लंडन येथील वैद्यकीय पाठ्यपुस्तक धडे म्हणून स्वीकारले आहेत. यापूर्वी त्यांनी त्यांचे पोस्ट डॉक्टरेट रिसर्च अमेरिका येथील युनिव्हर्सिटी ऑफ कॉलफोर्निया येथून झाले आहे. आतापर्यंत त्यांचे संशोधनातील शोध निबंध अमेरिका, लंडन, दुबई, थायलंड, श्रीलंका, कॅनडा, नेदरलँड, पॅरिस, जपान इत्यादी ठिकाणी जाऊन त्यांनी सादर केलेले आहेत. त्यामुळे इंटरनॅशनल स्पिकर म्हणून डॉ.बनसोडे परिचित आहेत. त्यांचे आता पर्यंत ७ रेफरन्स बुक्स व ७५ इंटरनॅशनल जर्नलमध्ये पेपर प्रसिद्ध झालेले आहेत. तसेच अनेक जागतिक जर्नलच्या इडिटेरिल बोर्डवरती मेंबर काम पहातात तसेच उत्कृष्ट समीक्षक पण आहेत त्यामुळे त्यांना अनेक संशोधन संस्थांकडून उत्कृष्ट संशोधन पुरस्कार ही मिळालेले आहेत. आतापर्यंत शैक्षणिक, संशोधन, उत्कृष्ट शास्त्रज्ञ अशी वेगळ वेगळी देश विदेश पातळीवरून आतापर्यंत १५ पुरस्कार मिळालेले आहेत.



डॉ.सुधा बनसोडे यांना नेहमी शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या कु.स्वरुपाराणी मोहिते-पाटील, सचिव अभिजित रणवरे व सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळत आहे.

# जनमत
## सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

शनिवार ०९ एप्रिल २०२२


Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# अकलूजच्या प्रा.डॉ.सुधा बनसोडे यांचे लंडन येथील कार्यशाळेत व्याख्यान

संग्रामनगर दि.८ (प्रतिनिधी)– अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुधा बनसोडे यांचे लंडन येथे जागतिक चर्चा सत्र मानवी आनुवंशिकता या विषयावर दि.२१ ते २४ रोजी होत आहे.या चर्चा सत्रामध्ये डॉ. सुधा बनसोडे यांचे मानवी आनुवंशिकता या विषयावर व्याख्यान देणार आहेत.तसेच डॉ.सुधा बनसोडे यांचे बरेच पेपर लंडन येथील वैद्यकीय पाठ्यपुस्तक धडे म्हणून स्विकारले आहेत.यापुर्वी त्यांनी त्यांचे पोस्ट डॉक्टरेट रिसर्च अमेरिका येथील युनिव्हर्सिटी ऑफ कॉलफोर्निया येथून झाले आहे.आतापर्यंत त्यांचे संशोधनातील शोध निबंध अमेरिका,लंडन,दुबई,थायलंड, श्रीलंका,कॅनडा,नेदरलँड, पॅरिस,जपान,इत्यादी ठिकाणी जाऊन त्यांनी सादर केलेले आहेत.त्यामुळे इंटरनॅशनल स्पिकर म्हणून डॉ.बनसोडे मॅडम परिचीत आहेत.त्यांचे आता पर्यंत ७ रेफरन्स बुक्स व ७५ इंटरनॅशनल जर्नलमध्ये पेपर प्रसिद्ध झालेले आहेत.तसेच अनेक जागतिक जर्नलच्या इडिटेरिल बोर्डवरती मेंबर काम पहातात तसेच उत्कृष्ट समीक्षक पण आहेत त्यामुळे त्यांना अनेक संशोधन संस्थांकडून उत्कृष्ट संशोधन पुरस्कार हि मिळालेले आहेत.आतापर्यंत शैक्षणीक,संशोधन,उत्कृष्ट शास्त्रज्ञ अशी वेगळ वेगळी देश विदेश पातळीवरून आतापर्यंत १५ पुरस्कार मिळालेले आहेत.



डॉ.सुधा बनसोडे यांना नेहमी शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील,सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या कु.स्वरूपाराणी मोहिते पाटील,सचिव अभिजीत रणवरे व सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळत आहे.

पुण्य नगरी
SMART
शनिवार,९ एप्रिल २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# अकलूज येथे हृदयरोग व मधुमेह मार्गदर्शन शिबीर

अकलूज / प्रतिनिधी

शिक्षण प्रसारक मंडळ व संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळ, अकलूज यांचे वतीने शनिवार दि. ९ रोजी सकाळी ११ वाजता स्मृतीभवन येथे हृदयरोग व मधुमेह या आजारांवर सखोल माहिती, उपाययोजना व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांनी दिली. शिबीरात डॉ. संभाजी राऊत व डॉ. हर्षल एकतपुरे हे मार्गदर्शन करणार आहेत. याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन संग्रामसिंह मोहिते पाटील यांनी केले आहे. सहकार महर्षि सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर आयोजित केले आहे. यावेळी जि.प. सदस्या स्वरुपाराणी मोहिते पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे आदी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. ०९ एप्रिल २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# अकलूज येथे आज हृदयरोग व मधुमेह मार्गदर्शन शिबिर

✔ सुराज्य/अकलूज : शिक्षण प्रसारक मंडळ व संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळ, अकलूज यांच्यावतीने शनिवारी सकाळी ११ वाजता स्मृतिभवन येथे हृदयरोग व मधुमेह या आजारांवर सखोल माहिती, उपाययोजना व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी दिली. धकाधकीच्या व तणावग्रस्त जीवन शैलीमुळे सध्या समाजामध्ये हृदयरोग आणि मधुमेह होण्याचे प्रमाण वाढले आहे. अतिरिक्त तणाव आणि चुकीची आहार पद्धती, व्यायामाचा अभाव असल्यामुळे या समस्यांना सतत सामोरे जावे लागत आहे. याबाबत समाजाला परिपूर्ण माहिती मिळावी याकरिता डॉ.संभाजी राऊत (एमडी, कार्डीलॉजी) व डॉ.हर्षल एकतपुरे (एमडी, एंडोक्राइनोलॉजी, रुबी हॉस्पिटल, पुणे) हे मार्गदर्शन करणार आहेत. याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी केले आहे. सहकार महर्षी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित केले आहे. यावेळी जि.प. सदस्या स्वरुपाराणी मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे उपस्थित होते.

८ पुढारी शहर-जिल्हा सोलापूर, रविवार, १० एप्रिल २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library



अकलूज : हृदयरोग व मधुमेह मार्गदर्शन शिबिराचे दीप प्रज्वलन करुन उद्घाटन करताना संग्रामसिंह मोहिते-पाटील.

# अकलूज येथे हृदयरोग व मधुमेह मार्गदर्शन शिबिर

**अकलूज : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्रमंडळ यांच्यावतीने स्मृतिभवन शंकरनगर येथे हृदयरोग व मधुमेह या आजारांबाबत मार्गदर्शन शिबिर झाले. या शिबिराचे उद्घाटन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले.

या शिबिरासाठी हृदयरोग तज्ज्ञ डॉ. संभाजी राऊत, मधुमेह तज्ज्ञ डॉ. हर्षल एकतपुरे, माळशिरस तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. नितीन खराडे-पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, संचालक सुभाष दळवी, वसंतराव जाधव, पांडुरंग एकतपुरे, बाळासाहेब सणस, उत्कर्ष शेटे, रामचंद्र गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

हृदयरोग तज्ज्ञ डॉ. संभाजी राऊत म्हणाले, सध्या जगामध्ये दरवर्षी सुमारे २० लाख रुग्णांना हा आजार होत आहे. त्यापैकी १२ लाख रुग्ण या आजाराने मृत पावतात. पाच लाख रुग्ण हॉस्पिटलपर्यंतही पोहोचू शकत नाहीत. यामध्ये २५ टक्के रुग्ण चाळीस वर्षांपेक्षा आतली आहेत. महिलांपेक्षा पुरुषांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण दुप्पट आहे. मधुमेह या आजाराबाबत बोलताना डॉ. हर्षल एकतपुरे यांनी मधुमेहाची संकल्पना व त्यातील सत्य स्पष्ट केले. रुग्णांच्या बैठे कामामुळे शरीरामध्ये कॅलरीज वाढतात. लठ्ठपणा, पोटाचा वाढलेला घेर आदी गोष्टी मधुमेहाला कारणीभूत ठरतात. यासाठी साखर, रक्तदाब, कोलॅस्ट्रोल हे तीन घटक शरीरामध्ये प्रमाणित राखणे महत्त्वाचे आहे. निरोगी जीवन पद्धतीसाठी आहारात डाळी, उसळी, पालेभाज्या, फळे, दही, ताक यांचे सेवन करावे, दररोज व्यायाम करावा.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी यांनी केले, तर आभार अर्जुन बनसोडे यांनी मानले.

सुराज्य सोलापूर

रविवार, दि. १० एप्रिल २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library 413101



## व्यायामाने हृदयविकाराचा धोका कमी होतो : डॉ. राऊत

# अकलूज येथे हृदयरोग व मधुमेह मार्गदर्शन शिबिर

✓ सुराज्य/अकलूज

दररोज किमान चाळीस मिनिटे व्यायाम करणे, व तणावापासून दूर राहणे महत्त्वाचे आहे. व्यसन करु नये, मसालेदार खाऊ नये, आहारात फळांचा उपयोग जादा करावा. नियमित व्यायामामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो, असे प्रतिपादन डॉ.संभाजी राऊत यांनी केले.

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळ यांच्यावतीने स्मृती भवन शंकरनगर येथे हृदयरोग व मधुमेह या आजाराबाबत मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले. या शिबिराचे उद्‌घाटन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी डॉ.राऊत बोलत होते.

या शिबिरासाठी प्रसिध्द हृदयरोग तज्ज्ञ डॉ.संभाजी राऊत, मधुमेह तज्ज्ञ डॉ.हर्षल एकतपुरे, माळशिरस तालुका बार असोशिएशनचे अध्यक्ष ॲड. नितीन खराडे-पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, संचालक सुभाष दळवी, वसंतराव जाधव, पांडुरंग एकतपुरे, बाळासाहेब सणस, उत्कर्ष शेटे, रामचंद्र गायकवाड उपस्थित होते. शकील मुलाणी यांनी संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळाच्या कार्याचा आढावा घेतला. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी यांनी केले तर आभार अर्जुन बनसोडे यांनी मानले. प्रा.राजेंद्र धोत्रे लिखित 'विज्ञानाशी जडले नाते' या पुस्तकाचे प्रकाशनही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले.

जनमत सर्वसामान्यांचे

रविवार, १० एप्रिल २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library 413101

# अकलूज येथे हृदयरोग व मधुमेह मार्गदर्शन शिबीर संपन्न

अकलूज,दि. ९ (प्रतीनीधी) शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळ यांच्या वतीने स्मृती भवन शंकरनगर येथे हृदय रोग व मधुमेह या आजाराबाबत मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते झाले

या शिबिरासाठी प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. संभाजी राऊत, मधुमेह तज्ञ डॉ. हर्षल एकतपुरे, माळशिरस तालुका बार असोशियनचे अध्यक्ष ड. नितीन खराडे पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, संचालक सुभाष दळवी, वसंतराव जाधव, पांडुरंग एकतपुरे, बाळासाहेब सणस, उत्कर्ष शेटे, रामचंद्र गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. हृदयरोग तज्ञ डॉ. संभाजी राऊत म्हणाले, सध्या जगामध्ये दरवर्षी सुमारे २ लाख रुग्णांना हा आजार होत आहे. त्यापैकी १२ लाख रुग्ण या आजाराने मृत पावतात. तर पाच लाख रुग्ण हॉस्पिटल पर्यंतही पोहोचू शकत नाहीत. यामध्ये २५ टक्के रुग्ण चाळीस वर्षापेक्षा आतली आहेत. महिलांपेक्षा पुरुषांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण दुप्पट आहे.

त्याला कारण, बदललेली जीवनशैली, ताणतणाव, रक्तदाब,व वाढते वजन हे आहेत. यासाठी वेळीच उपचार व तपासण्या करून घेतल्या तर या आजाराला दुर ठेवता येते. यावर उपाय म्हणजे योग्य आहार घेणे, दररोज किमान



चाळीस मिनिटे व्यायाम करणे, व तणावापासून दूर राहणे महत्त्वाचे आहे. व्यसन करू नये, मसालेदार खाऊ नये, आहारात फळांचा उपयोग ज्यादा करावा. नियमित व्यायामामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो व आपले शरीर तंदुरुस्त राहते. यावेळी त्यांनी रुदयरोगाचे प्रकार, त्यावरील उपाय, आहाराचे महत्व हृदयविकाराच्या उपचार पद्धती स्पष्ट केल्या. हृदय विकाराचा झटका आल्यास रुग्णांना तात्काळ हॉस्पिटल मध्ये घेऊन जाणं गरजेचं असतं त्याच्यासाठी वेळ महत्वाची असते.

मधुमेह या आजाराबाबत बोलताना डॉ. हर्षल एकतपुरे यांनी मधुमेहाची संकल्पना व त्यातील सत्य स्पष्ट केले. रुग्णांच्या बैठीकामामुळे शरीरामध्ये कॅलरीज वाढतात. लठ्ठपणा, पोटाचा वाढलेला घेर, आदी गोष्टी मधुमेहाला कारणीभूत ठरतात. यासाठी साखर, रक्तदाब, कॅलसट्रोल हे तीन घटक शरीरांमध्ये प्रमाणित राखणे महत्त्वाचे आहे. निरोगी जीवन पद्धतीसाठी आहारात डाळी, उसळी, पालेभाज्या, फळे, दही, ताक यांचे सेवन करावे दररोज व्यायाम करावा प्रास्ताविकात सचिव अभिजीत रणवरे म्हणाले, शिक्षण प्रसारक मंडळाच्या ५५ शाखेतून ते ३३ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून १३०० स्टाफ कार्यरत आहे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था नेहमीच कार्यरत असते. संस्थेचे मार्गदर्शक संचालक माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते पाटील व विद्यमान अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था प्रगतिपथावर आहे. शकील मुलानी यांनी संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळाच्या कार्याचा आढावा घेतला. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी यांनी केले तर आभार अर्जुन बनसोडे यांनी मानले. प्रा. राजेंद्र धोत्रे लिखित विज्ञानाशी जडले नाते या पुस्तकाचे प्रकाशनही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# प्रा.रामलिंग सावळजकर यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त




अकलूज,दि. १० (प्रतिनिधी) अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा.रामलिंग सावळजकर यांना नुकताच *रयत सामाजिक प्रतिष्ठान बीड, महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार सोहळ्याप्रसंगी प्रमुख अतिथी माजी नगराध्यक्षा मा.प्राचार्या क्षीरसागर मॅडम,अध्यक्षा सौ,रोहिनीताई गणेश माने , यांचे शुभहस्ते मानाचा फेटा, सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन समाजातील विविध स्तरातील उल्लेखनीय कामगिरी करणार्यांना सन्मानित करण्यात आले. प्रा.रामलिंग सावळजकर हे शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज मध्ये वनस्पतिशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून सन १९८७ पासून कार्यरत आहेत. तसेच आत्तापर्यंत शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये त्यांनी काम केले असून अंधश्रद्धा निर्मूलन, व्यक्तिमत्व विकास, वैज्ञानिक दृष्टीकोन, वृक्षारोपण व्यसनमुक्ती, रक्तदान इत्यादी विषयांवर विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये सुमारे २०० हून जास्त प्रबोधनपर व्याख्याने देऊन समाजप्रबोधनाचे काम केले आहे. त्यांना आत्तापर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

सदर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेबद्दल सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा. जयसिंह मोहिते पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. संग्रामसिंह मोहिते पाटील, महाविद्यालय विकास समिती सदस्या सौ. ऋतुजा वहिनी मोहिते पाटील, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या मा.स्वरूपाराणी मोहिते पाटील, सचिव मा.अभिजीत रणवरे, सहसचिव मा.हर्षवर्धन खराडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे, कार्यालयीन अधिक्षक युवराज मालुसरे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सकाळ | सोलापूर
सोलापूर, शुक्रवार, १५ एप्रिल २०२२
TODAY

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



सोलापूर : आदर्श शिक्षक पुरस्कार स्वीकारताना प्रा. रामलिंग सावळजकर.

# प्रा. रामलिंग सावळजकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**सोलापूर, ता. १४ :** अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. रामलिंग सावळजकर यांना नुकताच वसुंधरा सामाजिक सेवाभावी संस्था, इचलकरंजी यांच्यातर्फे 'प्राइड ऑफ इंडिया' राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

एका कार्यक्रमात माजी खासदार निवेदिता माने, श्री संत गाडगेबाबा मठ चिखलीचे मठाधिपती तुकाराम बाबा महाराज, निवृत्त वायुसेना अधिकारी आर. बी. पाटील, मिसेस इंडिया शुभांगी शिंत्रे, संस्थेचे अध्यक्ष विक्रम तोडकर यांच्या हस्ते प्रा. रामलिंग सावळजकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रा. रामलिंग सावळजकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, व्यक्तिमत्त्व विकास, वैज्ञानिक दृष्टिकोन, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती, रक्तदान आदींवर त्यांनी २०० हून जास्त प्रबोधनपर व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या यशाबद्दल सहकार महर्षी शंकरराव मोहिते- पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते- पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते- पाटील, महाविद्यालय विकास समिती सदस्या ऋतुजा मोहिते- पाटील, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या स्वरूपाराणी मोहिते- पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे आदींनी अभिनंदन केले.

सुराज्य सोलापूर

सोमवार, दि. १८ एप्रिल २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101



# अकलूज येथे डॉ.आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धा

✔ सुराज्य/अकलूज

राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अकलूजमधील आझाद चौक येथे खुल्या राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धा पार पडल्या.

महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून रमामाता तरुण मंडळ व भीमसैनिक ग्रुप अकलूज यांच्या संयुक्त विद्यमानाने आझाद चौक या ठिकाणी भव्य खुल्या राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांचे विचार सर्वांपर्यंत पोहोचावेत व सामाजिक जनजागृती व्हावी, हा या मागचा मुख्य उद्देश होता. ही स्पर्धा पार पाडण्यासाठी रमामाता तरुण मंडळ व भीमसैनिक ग्रुप यांच्या कार्यकर्त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. या स्पर्धेचा प्रथम क्रमांक सिंहगड लॉ कॉलेज पुणे (डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महिला चळवळी) या संघाला दहा हजार रुपये रोख, प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देण्यात आले. तर द्वितीय क्रमांक विभागून परिवर्तन फाऊंडेशन सांगोला (डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळी) व शंकररांव मोहिते महाविद्यालय अकलूज (शूरवीरांचे एकच गाव भीमा कोरेगाव) या संघांना सात हजार रुपये रोख, प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देण्यात आला. तृतीय क्रमांक हौशी कलाकार्टी बारामती (ये आझादी झुठी है देश की जनता भुकी है) या संघाने पाच हजार रुपये रोख, प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच उत्कृष्ट लेखक प्रा.सिद्धार्थ सोरटे (नातेपुते), उत्कृष्ट दिग्दर्शक नागनाथ साळवे(अकलूज), सिंहगड लॉ कॉलेजचे दिग्दर्शक मारुती वायमोडे, उत्कृष्ट वादक सारंग झांबरे (सांगोला) तसेच उत्कृष्ट महिला अभिनय प्रज्ञा केंगार (सांगोला) व पूजा राठोड (पुणे) यांना विभागून देण्यात आला. तर उत्कृष्ट पुरुष अभिनय नागनाथ साळवे (अकलूज) व राहुल घोडके (बारामती) यांना विभागून देण्यात आला.

या स्पर्धेसाठी प्रा.पंकज पवार, प्रा.रोहित देशमुख तसेच प्रा.सुमित भोसले यांनी परीक्षक म्हणून काम केले. या स्पधसाठी पंचशील ग्रुप यांचे सहकार्य लाभले.

स्पर्धा पाहण्यासाठी प्रचंड भीमसैनिक आणि रसिक श्रोते उपस्थित होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण मोहन देवकर, कबीर मोरे, नाशिक सोनवणे, सचिन लोंढे यांच्या हस्ते संपन्न झाले.

सकाळ | सोलापूर
TODAY
सोलापूर, शुक्रवार, २२ एप्रिल २०२२

# महाविद्यालये व विद्यापीठ विकासासाठी 'रुसा' राबविणार 'फेज थ्री'ची नवी योजना

## डॉ. निपुण; सोलापूर विद्यापीठात प्राचार्य व शिक्षकांसाठी चर्चासत्र

सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. २१ : राज्यातील वरिष्ठ महाविद्यालये व विद्यापीठांच्या पायाभूत विकासासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) यांच्याकडून निधी देण्यासाठी नवीन 'फेज थ्री' योजना राबविण्यात येणार आहे. 'रुसा'च्या या नव्या 'फेज थ्री' योजनेची उद्दिष्टे व नियमावली स्पष्ट झाल्यानंतर प्रस्ताव मागवून निधी वाटप होणार असल्याची माहिती रुसाचे राज्य प्रकल्प संचालक, आयएएस अधिकारी डॉ. विनायक निपुण यांनी दिली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता प्रमाणीकरण कक्ष यांच्याकडून विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यापीठातील संकुलांच्या संचालकांसाठी एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रुसाचे राज्य प्रकल्प संचालक डॉ. निपुण यांनी मार्गदर्शन केले. चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस होत्या. याप्रसंगी उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, प्रभारी कुलसचिव डॉ. सुरेश पवार यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. विकास पाटील यांनी केले.

डॉ. निपुण म्हणाले, उच्च शिक्षण क्षेत्रात नवीन बदलाची गरज असून, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांमध्ये अनेक चांगले बदल केले आहेत. या धोरणाचा उच्च शिक्षणातील सर्व तज्ज्ञांसह प्राचार्य, संचालक, शिक्षकांनी सतत अभ्यास करावा. त्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देता येईल व त्यांचा विकास कसा साधता येईल, याचे नियोजन करण्याची आवश्यकता आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात नवीन कल्पना, नव्या गोष्टी राबविण्यासाठी प्राचार्य व शिक्षकांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कुलगुरू डॉ. फडणवीस यांनी यावेळी विद्यापीठ राबवत असलेल्या कौशल्याभिमुख अभ्यासक्रमांची माहिती दिली. प्रा. तेजस्विनी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी आभार मानले.

जनमत सर्वसामान्यांचे
शुक्रवार, २२ एप्रिल २०२२



# अकलुजची मोनाली फुले करणार सीमेचे रक्षण

गणेश जाधव

अकलूज,दि. २१ : कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी ध्येय निश्चित असल्यास यश मिळतेच हे सिद्ध करून दाखवलय अकलूजच्या मोनाली अरुण फुले हिने. तिची सशस्त्र सीमा बल यामध्ये नुकतीच निवड झाली असून ती आता भारतीय सीमेवर सीमांचे रक्षण करण्यासाठी रवाना झाली आहे.

मोनाली अरुण फुले ही चौंडेश्वरीवाडी–अकलूज येथे वडील अरुण फुले आणि वर्षा व स्वप्निल या भावंडासह चारी बाजूंनी पत्रा असणाऱ्या छोट्याशा घरात राहत असून तिचे वडील सहकार महर्षी कारखान्यात गेल्या वीस वर्षापासून मदतनीस या पदावर काम करीत आहेत. घरची परिस्थिती अतिशय हलाखीची असल्याने मोनाली ने जिल्हा परिषद शाळेत प्रवेश



घेतला. मोनाली जेमतेम पाचवीत असतानाच आईने कुटूंबाची साथ सोडून फारकत घेतल्याने तिच्यावर आपली दोन भावंडे व वडील या सर्वांची जबाबदारी येऊन पडली. घरातील स्वयंपाक, धुणीभांडी, झाडलोट, लहान भावांना तयार करणे ही सर्व जबाबदारी तिच्यावर येऊन पडली. लहान वयातच पडलेल्या मोठ्या जबाबदार्या पार पाडत तिने आपले सातवीपर्यंत शिक्षण जिल्हा परिषद शाळेत पुर्ण केले.त्यानंतर माळेवाडी येथील सावतामाळी विद्यालयात माध्यमिक शिक्षण तर शंकरराव मोहिते महाविद्यालयात उच्च शिक्षण घेतले. घरातील संपूर्ण जबाबदारी पेलत पेलत तिने आठवीपासूनच आपल्या मनात पोलीस अधिकारी होण्याचे एक स्वप्न पाहिलं. आणि आपला जिद्दीचा प्रवास सुरु केला. त्याचा पाया म्हणून तिने एनसीसी मध्ये भाग घेतला.वडिलांकडून सतत पाठिंबा मिळत होता.त्या जीवावर तिने एनसीसीतील विविध परीक्षा, प्रशिक्षणही देत, विविध तेरा कॅम्प ला हजेरी लावली.तीने एनसीसीतील 'सी सर्टिफिकेट' मिळविले. पदवीचे शिक्षण घेत असताना तिने अनेक कौशल्य प्रमाणपत्र मिळवली असून,पुणे येथे झालेल्या रायफल शूटिंग या स्पर्धेत रायफल शुटर मेडल मिळवलेले आहे. आपली पदवी पूर्ण होताच तिने स्टाफ सिलेक्शन कमिशन ने २०१८ साली आर्मी भरतीसाठी काढलेल्या परीक्षेत सहभाग घेतला.



अत्यंत खडतर अभ्यास करून पुणे येथे जाऊन लेखी परीक्षा दिली. लेखी परीक्षेत पास होताच मेडिकल व ग्राउंड टेस्ट झाल्या.या सर्व खडतर परीक्षांनंतर २० जानेवारी २१ रोजी स्टाफ सिलेक्शन कमिशन ने अंतिम यादी जाहीर केली. त्यात तिचे नाव पाहून तिचा आनंद गगनात मावेनासा झाला.आपल्या कष्टाचे कुठेतरी चीज होतंय या भावनेने ती आनंदून गेली.मार्च २१ मध्ये तिला जॉइनिंग लेटर मिळाले. जॉइनिंग लेटर मध्ये तिला सशस्त्र सीमा बलामध्ये निवड झाल्याचे समजले.आणि २० एप्रिल पासून भोपाळ येथे ट्रेनिंगला जावे लागले. अकरा महिन्यांच्या खडतर ट्रेनिंग संपवून १५ मार्च २० २२ रोजी शपथविधी झाला. त्यानंतर तिला पुढील नेमणुकीचे पत्र मिळाले. तिचे २३ मार्च ला उत्तर प्रदेशात पीलीभीत येथे पोस्टिंग झाले. आता तीची नेमणूक भारताच्या सीमेवर झाली असून, राष्ट्रविरोधी कोणत्याही शत्रुचा नायनाट करण्यासाठी ती सज्ज झाली आहे. सशस्त्र सीमा दलातील या पदावर न थांबता आर्मी कडून घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षा देत पदोन्नती करून घेण्याची तिची ठाम इच्छा आहे. आपले ध्येय निश्चित करून त्याला जिद्द चिकाटी व अविरत कष्टाची जोड दिल्यास परिस्थिती कधीच आडवी येत नाही यश मिळतेच.असे मोनाली आज ठामपणे सांगत आहे. आपण मदतनीस म्हणून कारखान्यात काम करून मुलीना शिकवले त्याचे तीने सार्थक केले याचा मला अभिमान असल्याचे तीचे वडील अरुण फुले गर्वाने सांगत आहेत. मोनाली फुले हिला पुढील उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा.

पुण्य नगरी
SMART
गुरूवार,२१ एप्रिल २०२२

# महाविद्यालये, विद्यापीठांच्या विकासासाठी रुसाकडून फेज थ्रीची नवी योजना येणार

सोलापूर / प्रतिनिधी

राज्यातील वरिष्ठ महाविद्यालये व विद्यापीठांच्या पायाभूत विकासासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) यांच्याकडून निधी देण्यासाठी नवीन 'फेज थ्री' योजना राबविण्यात येणार आहे. 'रुसा'च्या या नव्या 'फेज थ्री' योजनेचे उद्दिष्टे व नियमावली स्पष्ट झाल्यानंतर प्रस्ताव मागवून निधी वाटप होणार असल्याची माहिती रुसाचे राज्य प्रकल्प संचालक, आयएएस अधिकारी डॉ. विनायक निपुण यांनी दिली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता प्रमाणीकरण कक्ष यांच्याकडून विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यापीठातील संकुलांच्या संचालकांसाठी एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रुसाचे राज्य प्रकल्प संचालक डॉ. निपुण यांनी मार्गदर्शन केले. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस या होत्या. याप्रसंगी उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, प्रभारी कुलसचिव डॉ. सुरेश पवार यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. विकास पाटील यांनी केले. डॉ. निपुण म्हणाले की, उच्च शिक्षण क्षेत्रात नवीन बदलाची गरज आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांमध्ये अनेक चांगले बदल करण्यात आले आहेत. या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांचा उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्व तज्ज्ञ मंडळी, प्राचार्य, संचालक, शिक्षकांनी सतत अभ्यास करणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना चांगल्याप्रकारे कसे शिक्षण देता येईल व त्यांचा विकास कसा साधता येईल, यावर लक्ष देणे आवश्यक असल्याचे मत डॉ. निपुण यांनी यावेळी व्यक्त केले. उच्च शिक्षण क्षेत्रात नवीन कल्पना, नव्या गोष्टी राबविण्यासाठी प्राचार्य व शिक्षकांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तेजस्वीनी कांबळे यांनी केले. आभार सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी मानले.

जनमत सर्वसामान्यांचे
गुरूवार, २८ एप्रिल २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे विद्यार्थी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

संग्रामनगर दि.२७ (प्रतिनिधी) शिक्षण प्रसारक मंडळ,अकलूज संचलित शंकराव मोहिते महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ चर्चगेट,मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच संपन्न झाला.महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चा राज्यस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेविका पुरस्कार कु.स्वप्नाली दिलीप जाधव व शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार किरण तुकाराम भांगे या स्वयंसेवकांना देऊन सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयांमध्ये व महाविद्यालयाच्या बाहेर राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन सामाजिक प्रबोधनाचे काम केले.यामध्ये राज्य व राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन नवी दिल्ली येथील संचलनातील सहभाग,राष्ट्रीय एकात्मता शिबिर,आव्हान-आपत्ती व्यवस्थापन शिबिर,उत्कर्ष सामाजिक-सांस्कृतिक शिबिर,विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून स्वच्छता अभियान व समाज प्रबोधन, निर्मल वारी-हरित वारी-निसर्ग वारी, रक्तदान शिबिर,वृक्षारोपण,मतदान जनजागृती,स्त्री भ्रूण हत्या,पराभव महापुरुषांच्या विचारांचा इ.पथनाट्य सादरीकरण करून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल,तसेच नीरा नदीतील गणेश मूर्तीचे पूनरविसर्जन व नदीपात्र स्वच्छता मोहीम,प्राचीन बारवांची स्वच्छता,शिवकन्या सखुबाई महादजी निंबाळकर समाधी स्वच्छता (माळशिरस) व संताजी घोरपडे समाधी स्वच्छता (इस्लामपूर) इत्यादी ठिकाणच्या नाविन्यपूर्ण उपक्रमात अतुलनीय काम गिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यावतीने सर्वो त्कृष्ट स्वयंसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्राप्त स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात आला.तसेच शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते-पाटील,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या कु. स्वरूपाराणी जयसिंह म ोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील तसेच महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मनोज रेळेकर यांनी या यशाबद्दल अभिनंदन केले.

या स्वयंसेवकांच्या यशासाठी म हाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.आबासाहेब



देशमुख, प्र.प्राचार्य डॉ.दत्तात्रेय बागडे,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. चंद्रशेखर ताटे-देशमुख, प्रा. दादासाहेब कोकाटे,डॉ.चंकेश्वर लोंढे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

संचार सोलापूर
गुरुवार, १२ मे २०२२
संस्थापक : अप्पासाहेब काडादी संस्थापक-संपादक : रंगा वैद्य

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# इटली येथील स्पर्धेसाठी चाकोरेच्या वरकडची निवड

संचार वृत्तसेवा

अकलूज, दि. ११- येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयातील माजी ॲथलेटिक्स खेळाडू व माळशिरस तालुक्यातील चाकोरे येथील रहिवासी दत्ता वरकड याची इटली येथे होणाऱ्या जागतिक पॅराॲथलेटिक्स-ग्रॅण्डप्रिक्स इटालियन ओपन २०२२ स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाल्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. वरकड याची १०० मीटर धावणे व लांब उडी प्रकारात निवड झाली आहे.

या निवडीबद्दल सहकार महर्षी कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, क्रीडा शिक्षक प्रा.अरविंद वाघमोडे व महाविद्यालयाचे कार्यालयीन



अधीक्षक युवराज मालुसरे यांनी शुभेच्छा दिल्या.

ॲथलेटिक्स खेळाडू दत्ता वरकड याला पिंपरी चिंचवड शहर ॲथलेटिक्स संघटनेचे अध्यक्ष रामदास कुदळे, उपाध्यक्ष रूस्तुम पठाण, कार्याध्यक्ष चंद्रकांत पाटील, सचिव चंद्रशेखर कुदळे, खजिनदार मनिषा जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# पाण्यासाठी तहानलेल्या व भर उन्हात तडफणाऱ्या चिमणीला पाणी पाजून दिले जीवदान

## शंकरराव मोहिते महाविद्यालयातील दोन शिपायांनी वाचवले चिमणीचे प्राण



संग्रामनगर दि.१० (प्रतिनिधी)- सध्या सगळीकडेच उन्हाचा पारा वाढल्यामुळे दुपारी माणसांबरोबर पशु पक्षी व प्राण्यांची लाहीलही होवू लागली आहे.तर काही ठिकाणी तर पिण्याच्या पाण्यासाठी पक्षांवर तहान भागविण्यासाठी दूरवर जावे लागत आहे.

काल माळशिरस तालुक्याचे तपमान ४४ च्या वर गेल्यामुळे माणसांचा जीव कासाविस होत होता. त्याच बरोबर प्राणी व पक्षांना याचा खूप त्रास सहन करावा लागत आहे.काल शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या समोरील बागेमध्ये हिरवळीवर भर उन्हात एक चिमणीचे पाण्या वाचून तडफडताना महाविद्यालयातील शिपाई बाबा कदम व तात्या गोरे यांना दिसले क्षणाचा ही विलंब न लावता त्यांनी कागदी कपात पाणी आणून चिमणीला पाणी पाजले व नंतर थोडे राहिलेले पाणी त्या चिमणीच्या पंखावर व अंगावर शिंपडले.पोटभर पाणी पिल्यानंतर तीचा जीव शांत झाला व चिमणीने थोड्या वेळाच्या विश्रांती नंतर शरीरातील थकावट दुर झाल्याने या चिमणीने परत हवेत भरारी घेवून निघून गेली.

पाण्यासाठी आज पक्षी व प्राण्यांवर ही वेळ आली आहे. पुढे जर असाच काळ राहिला तर पक्षांबरोबर माणसांना ही पाण्यासाठी भटकंती करायला वेळ लागणार नाही यात शंकाच नाही, लोकांमध्ये आताच झाडे लावायचे व पाणी बचतीची जन जागृती करणे गरजेचे आहे.

पुढारी
MY सोलापूर
बुधवार, ११ मे २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



वेळापूर : डॉ. बाळासाहेब भोसले-मोलाणे यांचा सत्कार करताना प्रा. विष्णू सुर्वे, हणमंत आवताडे, डी. एस. पाटील, रवींद्र माने, मनोज नांगरे, रविराज सोनवणे आदी.

## बाळासाहेब भोसले-मोलाणे यांना पीएच.डी.

**वेळापूर :** येथील शि. प्र. मंडळ अकलूज संचलित अर्धनारी नटेश्वर महाविद्यालयातील शारिरीक शिक्षण संचालक बाळासाहेब भोसले-मोलाणे यांना कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेवर योगाचा होणारा परिणाम, या विषयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्याकडून पी.एच.डी पदवी प्रदान करण्यात आली. त्यांना अॅड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय आष्टा, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. संतोष वनगुजरे यांचे मार्गदर्शन लाभले. याबद्दल माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, महर्षी कारखाना चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, संस्था अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, संस्था सचिव अभिजीत रणवरे, सह सचिव हर्षवर्धन खराडे, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष अमरसिंह मानेदेशमुख, प्र प्राचार्य दादा साठे व सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी अभिनंदन केले. यावेळी प्रा. विष्णु सुर्वे, डॉ. हणमंतराव आवताडे, प्रा. डी. एस. पाटील, प्रा. रवींद्र माने, डॉ. मनोजकुमार नांगरे , प्रा. रविराज सोनावणे, प्रा. दादासाहेब कोकाटे, प्रा. नानासाहेब वरकड, प्रा. अतुल माने-देशमुख उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
गुरूवार, दि. १२ मे २०२२ 8

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



# भोसले यांना पीएच.डी प्रदान

✓ सुराज्य/वेळापूर : शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर येथील शारीरिक शिक्षण संचालक बाळासाहेब भोसले (मोलाणे) यांना कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेवर योगाचा होणारा परिणाम या विषयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्याकडून पी.एच.डी पदवी प्रदान करण्यात आली. त्यांचे मार्गदर्शक म्हणून अॅड. बी.डी. हंबर्डे महाविद्यालय आष्टा चे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. संतोष वनगुजरे हे होते. त्याच्या या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज चे मार्गदर्शक विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील,संस्थेचे सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अमरसिंह माने देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य दादा साठे यांनी प्रा. बाळासाहेब भोसले (मोलाणे) यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या यशाबद्दल शंकरराव मोहिते महाविद्यालयातील प्राध्यापक प्रा. सुर्वे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे डॉ एच के अवताडे , प्रा. डी एस पाटील प्रा. रवींद्र माने, डॉ. मनोज कुमार नांगरे पाटील, प्रा. रविराज सोनावणे, प्रा. दादासाहेब कोकाटे, प्रा. नानासाहेब वरकड, प्रा. अतुल माने देशमुख उपस्थित होते.

सकाळ » TODAY
एमएएचएमएआर/२००१/५०५२
सोलापूर, शुक्रवार, १३ मे २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library



वेळापूर (ता. माळशिरस) : बाळासाहेब भोसले यांचा सत्कार करताना मान्यवर.

## बाळासाहेब भोसले यांना पीएचडी

वेळापूर : वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक बाळासाहेब भोसले (मोलाणे) यांना कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेवर योगाचा होणारा परिणाम या विषयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून पीएचडी प्रदान करण्यात आली. त्यांचे मार्गदर्शक ॲड. बी. डी. हंबर्डे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. संतोष वनगुजरे हे होते. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, संस्थेचे सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, अमरसिंह माने-देशमुख, प्राचार्य दादा साठे आदींनी अभिनंदन केले. शंकराव मोहिते महाविद्यालयातील प्राध्यापक प्रा. विष्णू सुर्वे यांच्या हस्ते भोसले यां सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. एच. के. अवताडे, प्रा. डी. एस. पाटील, प्रा. रविंद्र माने, डॉ. मनोज कुमार नांगरे पाटील, प्रा. रविराज सोनावणे, प्रा. दादासाहेब कोकाटे, प्रा. नानासाहेब वरकड, प्रा. अतुल माने देशमुख आदी उपस्थित होते.

जनमत सर्वसामान्यांचे
गुरूवार, २६ मे २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# राष्ट्रीय छात्र सेनेचे वार्षिक सर्वसाधारण शिबिर अकलूज येथे संपन्न




संग्रामनगर दि.२५ (प्रतिनिधी)- ३८ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेना सोलापूरचे वार्षिक सर्वसाधारण शिबिर ७०२ हे सदाशिवराव माने विद्यालयाच्या माध्यमातून सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील इंजीनियरिंग कॉलेज शंकरनगर-अकलूज येथे पार पडले.

यामध्ये सोलापूर जिल्ह्यातून १० महाविद्यालय व १२ स्कूल मधून ४१६ राष्ट्रीय छात्र सेनाच्या कॅडेटनी सहभाग घेतला होता.हे शिबीर दिनांक ११ मे ते २० मे २०२२ या कालावधीत घेण्यात आले होते.या शिबिरामध्ये श्री नागेश साळवे व त्यांच्या सहकाऱ्यांनी भारुडाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचे संदेश दिले.तसेच डॉक्टर अतुल दोशी व टीमने सीपीआर डेमो व वैयक्तिक आरोग्य विषयक घ्यावयाची काळजी यावरती मोलाचे मार्गदर्शन केले.त्याच प्रमाणे लाईफ स्किल या विषयावरती डॉ.इंद्रजीत यादव यांनी मार्गदर्शन केले.तसेच या शिबिरांमध्ये विद्यार्थ्यांना फायरिंग,पीटी,ड्रिल,मॅप रिडिंग,युद्ध विद्या,भूमी विद्या,वेपन खोलने जोडणे व त्याची माहिती व सांस्कृतिक कार्यक्रम याचे शिक्षण देऊन नंतर "स्पर्धा पार पडल्या.या सर्व स्पर्धांमधून शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज हे सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून जनरल चॅम्पियनशिप चे मानकरी ठरले.

बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते पाटील उपस्थित होते.या शिबिराचे नेतृत्व ३८ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेनेचे कमांडिंग ऑफिसर कर्नल राजेश गजराज यांनी केले.या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम पाहून जयसिंह मोहिते पाटील यांनी शिबिरातील सर्व एनसीसी कॅडेटला व स्टाफला सयाजीराजे वॉटर पार्कमध्ये स्नेहभोजन व मनमुराद आनंद मोफत घेण्याची संधी उपलब्ध करून दिली.

हे शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील,अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या सिनेट सदस्या कु.स्वरुपाराणी मोहिते पाटील सचिव अभिजीत रणवरे,सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

पुढारी
MY सोलापूर
गुरुवार, २६ मे २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# राष्ट्रीय छात्र सेना शिबिरात मोहिते महाविद्यालय अव्वल

अकलूज : पुढारी वृत्तसेवा

३८ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेना सोलापूरचे वार्षिक सर्वसाधारण शिबिर शंकरनगर, अकलूज येथे पार पडले. या शिबिरात शंकरराव मोहिते महाविद्यालयाने अव्वलस्थान पटकावले. ११ ते २० मे या कालावधीत सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, शंकरनगर येथे आयोजित शिबिरात सोलापूर जिल्ह्यातून १० महाविद्यालये व १२ विद्यालयांमधून ४१६ राष्ट्रीय छात्र सेनाच्या कॅडेट्सनी सहभाग घेतला होता.

शिबिरामध्ये नागेश साळवे ग्रुपने भारुडाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश, तर डॉ. अतुल दोशी व टीमने सीपीआर डेमो व वैयक्तीक आरोग्यविषयक घ्यावयाची काळजी, तर लाईफ स्किल या विषयावर डॉ. इंद्रजित यादव यांनी मार्गदर्शन केले. या शिबिरांमध्ये विद्यार्थ्यांना फायरिंग, पीटी, ड्रील, मॅप रीडिंग, युद्धविद्या, भूमिविद्या, वेपन खोलण-जोडणे व त्याची माहिती व सांस्कृतिक कार्यक्रम यांचे शिक्षण देऊन स्पर्धा पार पडल्या. या सर्व स्पर्धांमधून शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज हे सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून जनरल चॅम्पियनशिपचे मानकरी ठरले. बक्षीस वितरणास सहकारमहर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते -पाटील उपस्थित होते.




अकलूज : यशस्वीतांचा सत्कार करताना जयसिंह मोहिते -पाटील.

या शिबिराचे नेतृत्व कमांडिंग ऑफिसर कर्नल राजेश गजराज यांनी केले. या शिबिरातील विद्यार्थ्यांना जयसिंह मोहिते-पाटील सयाजीराजे वॉटर पार्कमध्ये स्नेहभोजन व मनमुराद आनंद मोफत घेण्याची संधी उपलब्ध करून दिली. हे शिबिर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, सदस्या स्वरुपाराणी मोहिते-पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे- पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

असलेले दिगंबर करांडे पराभूत झाले.

महिम विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या निवडणुकीत श्रीकांत चौगुले, बाळासाहेब घोगरे, हनुमंत कारंडे, विष्णू बंडगर, गणपत पाटील, गणपत मरगर, नागनाथ लवटे, विठ्ठल कारंडे, सिंधू नानासाहेब चौगुले, शकुंतला भिवा शिरगिरे, संदीप शेंडे, दादासाहेब कोळेकर, सुरेश लक्ष्मण महापुरे निवडून आले आहेत. यावेळी बिभीषण पाटील, सीताराम नारनवर, दत्तात्रय घोगरे, सीताराम शिरगिरे, नानासाहेब जालिंदर बंडगर, सोमनाथ मरगर, संतोष चौगुले, शांतिनाथ घोगरे आदी उपस्थित होते.